मंगळवार, ७ फेब्रुवारी २०२३
⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१६५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक


● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 7 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-165 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-14 ● PRICE-5

# राम मंदिर ५० वर्षांनंतर पुन्हा पाडले जाऊ शकते

## डॉ. प्रवीण तोगडिया यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर : लोकसंख्येचे असंतुलन रोखले नाही तर ५० वर्षांनंतर अयोध्येतील राम मंदिराला पुन्हा धोका असेल. त्यामुळे केंद्र सरकारने लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी लोकसंख्या नियंत्रण कायदा तत्काळ तयार करावा, असे आवाहन आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे अध्यक्ष डॉ. प्रवीण तोगडिया यांनी केले. ते सोमवारी नागपूरमध्ये बोलत होते.**



लोकसंख्या नियंत्रण, काशी-मथुरा मंदिर, लव्ह जिहाद याविषयांवर कायदा करण्याच्या मुद्द्यावरून भाजपावर यावेळी डॉ. तोगडिया यांनी हल्लाबोल केला. ते म्हणाले की, आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेला वाटते की, देशात राम मंदिर निर्माण होत आहे. याचा आम्हाला आनंद आहे. मात्र, जर लोकसंख्येचे असंतुलन रोखले नाही, तर ५० वर्षांनंतर अयोध्येतील राम मंदिराला धोका असेल. त्यामुळे केंद्र सरकारने ही लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी लोकसंख्या नियंत्रण कायदा तात्काळ तयार करावा. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घरी जाऊन निश्चित करा. कायदा तयार होईल. त्यामुळेच सत्ताधाऱ्यांशी संबंधित लोक आंदोलन करतात तेव्हा थोडं हसू येते. घरात बसून कायदा करा, आंदोलनाची काय गरज आहे? असा प्रश्न प्रवीण तोगडीयांनी विचारला.



# हिंदू महासंघ संघटनेचे आनंद दवे कसबा पोटनिवडणूक लढणार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** भाजपाने कसबा पोटनिवडणुकीसाठी दिवंगत आमदार मुक्ता टिळक यांच्या कुटुंबियांपैकी कोणालाही उमेदवारी न देता हेमंत रासने यांना उमेदवारी दिली. कुटुंबियांपैकी कोणालाही संधी न दिल्याने शैलेश टिळक यांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर अनेक घडामोडींना वेग आला आहे. हिंदू महासंघ संघटनेचे आनंद दवे यांनी शैलेश टिळक यांची भेट घेतली. यानंतर त्यांनी आपण कसबा पोटनिवडणुकीसाठी उद्या उमेदवारी दाखल करणार असल्याचे म्हटले आहे.

कसबा पेठ विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मुक्ता टिळक आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. त्या निवडणुकीकरिता भाजपाकडून कसबा पेठ विधानसभा मतदारसंघासाठी हेमंत रासने, तर चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. मुक्ता टिळक यांच्या कुटुंबीयांपैकी कोणालाही संधी न दिल्याने शैलेश टिळक यांनी नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर अनेक घडामोडींना वेग आला असून, हिंदू महासंघ संघटनेचे आनंद दवे यांनी शैलेश टिळक यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी मुक्ता टिळक यांच्या प्रतिमेला अभिवादनदेखील केले. शैलेश टिळक यांची भेट घेतल्यानंतर आनंद दवे म्हणाले की, कसबा विधानसभा पोटनिवडणुकीसाठी मी उद्या उमेदवारी दाखल करणार आहे. आम्ही ही निवडणूक जिंकण्यासाठी लढणार असून, या मतदारसंघात विविध समाजाचे नागरिक राहतात, त्यामुळे आम्हाला निश्चित यश मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# अखेर पाच न्यायमूर्तींचा शपथविधी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयातील पाच न्यायमूर्तींचा शपथविधी सोमवारी पार पडला. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी त्यांना शपथ दिली. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या इशाऱ्यानंतर मोदी सरकारला नमती भूमिका घ्यावी लागली आहे. मोदी सरकारकडून सर्वोच्च न्यायालयातील पाच न्यायमूर्तींच्या नियुक्तीला अखेर हिरवा कंदील मिळाला. कायदे मंत्री किरण रिजीजू यांनी सातत्यानं सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमवरून वादग्रस्त वक्तव्यं केली होती. किरण रिजीजू यांच्या वक्तव्यांच्या मालिकेमुळे केंद्र सरकार आणि सर्वोच्च न्यायालयामध्ये चांगलाच वादाचा सामना रंगला होता. अखेर या सर्व प्रकरणाला पूर्णविराम मिळून पाच न्यायमूर्तींचा आज शपथविधी पार पडला. मोदी सरकारकडून होत असलेल्या विलंबामुळे सर्वोच्च न्यायालयाने निर्णय घेण्यास भाग पाडू नका, असा निर्वाणीचा इशारा दिला होता. यानंतर मोदी सरकारने पाच न्यायमूर्तींच्या नावावर शिक्कामोर्तब केला. त्यामुळे



सर्वोच्च न्यायालयाला आज (6 फेब्रुवारी) पाच नवे न्यायमूर्ती मिळाले आहेत. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी त्यांना शपथ दिली. या पाच जणांमध्ये राजस्थान उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पंकज मित्तल, पाटणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती संजय करोल, मणिपूर उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती पीव्ही संजय कुमार, पाटणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्ला आणि अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांचा समावेश आहे. पंकज मित्तल यांचे मूळ कॅडर अलाहाबाद उच्च न्यायालय. पंकज मित्तल यांनी 1985 मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयात प्रॅक्टिस सुरू केली आणि उत्तर प्रदेश गृहनिर्माण आणि विकास मंडळाचे स्थायी वकील म्हणून काम केले. 1990 ते फेब्रुवारी 2006 दरम्यान ते डॉ. बी. आर आंबेडकर विद्यापीठ, आग्राचे स्थायी वकील होते. न्यायमूर्ती मित्तल यांची 7 जुलै 2006 रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायमूर्ती म्हणून पदोन्नती झाली. 2 जुलै 2008 रोजी त्यांनी स्थायी न्यायमूर्ती म्हणून शपथ घेतली. त्यांनी 4 जानेवारी 2021 रोजी जम्मू आणि काश्मीर केंद्रशासित प्रदेश आणि लडाख या केंद्रशासित प्रदेशासाठी सामान्य उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून शपथ घेतली.

आज शपथ घेणारे दुसरे न्यायमूर्ती करोल आहेत, ज्यांचे मूळ उच्च न्यायालयाचे कॅडर हिमाचल प्रदेश आहे. पदोन्नतीच्या वेळी ते पाटणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती होते. न्यायमूर्ती करोल यांचा जन्म 23 ऑगस्ट 1961 रोजी झाला. न्यायमूर्ती करोल यांनी उच्च न्यायालयासह विविध न्यायालयात प्रॅक्टिस केली. राज्यघटना, कर आकारणी, कॉर्पोरेट, फौजदारी आणि दिवाणी या विषयांमधील तज्ज्ञ आहेत.

# आपण बाळासाहेबांच्या काँग्रेसचे काम करायचे, की नानांच्या?

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** पदवीधर मतदारसंघातील उमेदवारीवरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि काँग्रेसचे विधीमंडळ नेते बाळासाहेब थोरात यांच्यात संघर्ष पाहायला मिळत आहे. आधी ही केवळ तांबे कुटुंबाची बंडखोरी मानली जात होती. या काळात बाळासाहेब थोरात यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया आली नव्हती. मात्र, आता थोरात यांनीही सत्यजीत तांबेंची बाजू घेत राजकारण झाल्याचा आरोप केला. यानंतर आता महाराष्ट्र काँग्रेसचे कार्यकर्ते संभ्रमात पडलेले दिसत आहेत. याचीच प्रचिती करणारे ट्वीट काँग्रेसच्या सरचिटणी, प्रवक्त्या आणि नाशिकच्या नगरसेविका हेमलात पाटील यांनी केले आहे. हेमलता पाटील म्हणाल्या, आज सकाळी सकाळी फोन आला, ताई आपण बाळासाहेबांच्या काँग्रेसचे काम करायचे, की नानांच्या काँग्रेसचे?' आता काय उत्तर देऊ कप्पाळ?

# मंदिर संरक्षणासाठी 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'ची स्थापना!

## हिंदू मंदिरे सरकारीकरणातून मुक्त करण्यासह मंदिरांच्या रक्षणासाठीचे ठराव एकमताने संमत !

आधुनिक केसरी न्यूज

जळगाव : हिंदूंना आध्यात्मिक बळ देणारी 'भारतीय मंदिर संस्कृती' आज धर्मविहीन 'सेक्युलर' शासनतंत्रामुळे धोक्यात आली आहे. आपल्याला मिळालेला हा दैवी वारसा जपणे, त्याचे संवर्धन आणि संरक्षण करणे, हे प्रत्येक हिंदूचे धर्मकर्तव्य आहे. याच उद्देशाने दोन दिवसीय 'महाराष्ट्र मंदिर-न्यास परिषदे'ला आलेल्या 300 हून अधिक मंदिर विश्वस्त, पुरोहित, पुजारी, लेखापरीक्षक आणि अधिवक्ते यांनी एकत्र येत मंदिरांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. या परिषदेत मंदिर चळवळ उभारण्यासाठी 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'ची स्थापना उपस्थित विश्वस्तांच्या एकमताने करण्यात आली, अशी घोषणा हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक सुनील घनवट यांनी येथील 'पद्मालय विश्रामगृहा'त आयोजित पत्रकार परिषदेत केली. या वेळी महाराष्ट्र आणि गोवा बार काउन्सिलचे माजी अध्यक्ष अधिवक्ता भरत देशमुख, सातपुडा निवासिनी श्री मनुदेवी सेवा प्रतिष्ठानचे सचिव नीळकंठ चौधरी, जळगावचे ग्रामदैवत श्रीराम मंदिराचे श्री. श्रीराम जोशी महाराज, हिंदु जनजागृती समितीचे जळगाव समन्वयक प्रशांत जुवेकर उपस्थित होते.


मंदिरांची सुरक्षा, समन्वय, संघटन, संपर्क यंत्रणा आणि मंदिरे सनातन धर्मप्रचाराची केंद्र होणे, यांसाठी कार्य करण्याचा संकल्प केला. महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या माध्यमातून मंदिरांवरील सर्व प्रकारचे आघात, अडचणी आणि समस्या सोडवण्यासाठी संघटितपणे प्रयत्न केले जातील. मंदिरांचे सरकारीकरण होऊ न देणे, मंदिरांच्या प्रथा-परंपरा, धार्मिक कृत्ये शास्त्रीय पद्धतीने होण्यासाठी आग्रह धरणे, मंदिरांमध्ये कोणत्याही प्रकारे शासकीय-प्रशासकीय हस्तक्षेप होऊ न देणे, अशी भूमिका 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'च्या स्थापनेवेळी निश्चित करण्यात आली. मंदिरांमध्ये धर्मशिक्षणवर्ग करणे, मंदिरांमध्ये धर्मशास्त्रानुसार वस्त्रसंहिता लागू करणे, समाजाचे संघटन होण्यासाठी मंदिरांत सामूहिक गुढीपाडवा, सामूहिक शस्त्रपूजन, हनुमानचालिसा पठण, महाआरती आदी उपक्रम चालू करणे, मंदिरांवरील आघातांच्या विरोधात व्यापक आंदोलन उभारणे आदी कार्य महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने करण्यात येईल, अशी माहिती सुनील घनवट यांनी दिली.



या मंदिर परिषदेला श्रीक्षेत्र भीमाशंकर देवस्थान (पुणे), श्रीक्षेत्र घृष्णेश्वर देवस्थान (वेरुळ, संभाजीनगर),अष्टविनायक मंदिर ट्रस्ट, श्री तुळजापूर देवस्थान पुजारी मंडळ, श्री काळाराम मंदिर (नाशिक), श्री लक्ष्मण मंदिर (पंचवटी, नाशिक), श्री रेणुकामाता मंदिर (माहूर), श्री कानिफनाथ देवस्थान (गुहा), श्री गणपति मंदिर देवस्थान मंडळ (पद्मालय, जळगाव), श्रीराम मंदिर (जळगाव), श्री मंगळग्रह सेवा संस्थान (अमळनेर), अखिल भारतीय पद्मशाली पुरोहित संघ, सातपुडा निवासिनी श्री मनुदेवी सेवा प्रतिष्ठान, बालाजी मंदिर (पारोळा), नवकार जैन टेम्पल ट्रस्ट, श्री बालाजी महाराज संस्थान (देऊळगाव राजा) यांसह महाराष्ट्रातील विविध मंदिरांचे प्रतिनिधी या परिषदेला उपस्थित होते. काशी येथील 'ज्ञानवापी' मुक्तीसाठी लढा देणारे सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता विष्णु शंकर जैन, जैन इरिगेशनचे आणि श्री पद्मालय मंदिराचे अध्यक्ष श्री. अशोक जैन, सनातन संस्थेचे धर्मप्रसारक सदगुरु नंदकुमार जाधव, सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. चेतन राजहंस, तसेच हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते रमेश शिंदे हे मान्यवर उपस्थित होते, अशी माहिती प्रशांत जुवेकर यांनी दिली.

### 'मंदिर योद्धे' म्हणून सन्मान !

मंदिरांतील सरकारीकरण रोखणे, सरकारीकरण झालेल्या मंदिरांतील भ्रष्टाचारआदी अपप्रकार रोखण्यासाठी प्रयत्न करणे, मंदिरांतील प्रथा-परंपरा यांवरील घाला रोखणे, मंदिरांच्या जागेवरील अतिक्रमण हटवणे, मंदिरांमध्ये सुव्यवस्थापन आणणे आदी कार्य करणाऱ्या विश्वस्तांचा पद्मालय देवस्थानच्या वतीने ग्रंथ आणि सन्मानचिन्ह देऊन 12 जणांचा 'मंदिररक्षक योद्धा' म्हणून सन्मान करण्यात आल्याचे या वेळी सुनील घनवट यांनी सांगितले.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


## शिकण्याची प्रक्रिया..



आधुनिक केसरी

प्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईनने असं म्हटलं होत की ' Experience is learning and rest is just an information . ' हे विधान खरं म्हणजे आज धाडसी वाटण्याची शक्यता आहे. पण आईन्स्टाईनने हे आपल्याला शंभर वर्षांपूर्वी सांगितलं होतं. म्हणजे आईन्स्टाईन असं म्हणतो की आपण अनुभवातून जे शिकतो तेच खरं शिकणं किंवा ज्ञान आणि बाकीचं सगळं म्हणजे माहितीचं भांडार. काही दिवसांपूर्वी मी अमरावतीच्या शाश्वत स्कुलमध्ये गेलो होतो. तिथले संचालक अतुल गायगोले हे आपल्या विद्यार्थ्यांना शिकण्याचा प्रत्यक्ष अनुभव देण्याबद्दल आग्रही असतात. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी फार्म टू प्लेट हा उपक्रम राबवला होता. ती शाळा शेतातच वसलेली आहे. मुलांनी झाडांची, फळभाज्यांची देखरेख करायची. ती वाढवायची. ती कशी वाढतात याचे निरीक्षण करायचे. नंतर प्रत्यक्ष या भाज्या शिजवायच्या आणि त्या शिजवण्याच्या म्हणजेच स्वयंपाकाच्या प्रक्रियेचे ज्ञान मिळवायचे. स्वयंपाकात सुद्धा शास्त्र आहे, विज्ञान लपलेलं आहे. ते मुलांना अशा अनुभवातूनच कळते. यातून मुले काय शिकत नाहीत ? ते वनस्पतींची वाढ शिकतात, स्वयंपाक करताना जे विविध पदार्थ आपण वापरतो, त्यांची माहिती मिळवतात. त्यातली कला आणि त्यातले शास्त्र सुद्धा त्यांना कळते. वनस्पतीची वाढ होताना त्यांना अन्न , हवा, प्रकाश इ गोष्टींचे काय महत्व आहे हे त्यांच्या लक्षात येते. एकूणच विद्यार्थी अनुभवाने समृद्ध होत जातात. या उन्हाळयाच्या सुटीत सगळीकडे लॉकडाउन आणि ऑनलाईन शिक्षणाची चर्चा असताना, त्यांनी आपल्या दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी गृहपाठाचा एक वेगळाच प्रयोग राबवला. तो मधुमेहाच्या रुग्णांचा अभ्यास करण्यासंदर्भात होता. त्या मुलांना त्यांनी आधी सांगितलं की आज जगात गन पावडर ( दहशतवाद ) यामुळे साधारण २५००० लोकांचा मृत्यू होतो, तर शुगर पावडर ( साखर ) मुळे होणाऱ्या मृत्यूची संख्या सुमारे पस्तीस लाख आहे.

**क्रमशः**



## आनंदी पहाट

## आर्थिक कारणाने आयुष्य उज्ज्वल व्हावे, उद्ध्वस्त नव्हे

आधुनिक केसरी

सद्यःस्थितीत सोशल मिडिया, स्मार्ट फोन, मोबाईल नेटवर्क ह्यामुळे जनसंपर्क खूपच जलद होऊ लागला आहे. तंत्रज्ञान, संगणकीकरण, आधुनिकीकरण ह्याचा परिणाम जनमानसावर प्रचंड प्रमाणत झाला आहे. ह्याचा जितका उपयोग, फायदा होऊ लागला आहे, तितकाच त्याचा तोटा, नुकसान, फसवणूक होण्याचं प्रमाणही खूपच वाढत चाललं असल्याचं आपण अनुभवत आहोत. ह्या फसवणुकीच्या घटनांमुळे आपल्यापैकी किती जण सावध होतात ? किती सतर्क राहतात ? सुशिक्षित व्यक्तीच ह्यामध्ये मोठ्या रकमेच्या फसवणुकीच्या बळी पडल्याच्या घटना का बरं सतत घडत राहतात ? झटपट श्रीमंती हा त्या घटनांच्या मागील उद्देश असतो का ? ह्यांत बळी पडलेली आणि फसवणूक करणारी व्यक्ती परिणामांची जाणीव करून घेऊ शकत नाही का ? कि जाणीव न होणं हीच त्यांच्यात उणिव असते. सोशल मिडीयाच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक झाल्याच्या अनेक घटना सातत्याने घडत असूनही आपण सावध न झाल्यामुळे सावज होत आहोत, त्याचे बळी पडत आहोत. फेसबुकच्या माधमातून मैत्री करून आर्थिक फसवणूक, प्रत्यक्ष भेटून मानसिक आणि शारीरिक शोषण, अत्याचार घडत असल्याचं सातत्याने आपण ऐकत, वाचत असतो. काहीवेळा तर काही जणांना स्वतःचा जीव देखील गमवावा लागल्याचं उघड झालं आहे. फसवणूक होण्याइतके आपण अज्ञानी असतो का ? कशाचीच जाणीव का होत नाही अशावेळी ?



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या साधनालाच आपलं साध्य समजू लागलेल्या प्रत्येकाचा विचार, वर्तन आणि व्यवहार अभ्यासला तर असं लक्षांत येईल कि, केवळ पैसा मिळवणं हेच उद्दिष्ट त्यांचं असतं. तो कोणत्या मार्गानं, कोणत्या पद्धतीनं, किती हुशारीनं, कष्टानं, किती इमानदारीनं मिळवला ह्याकडे दुर्लक्ष होऊ लागल्याचं खेदजनक चित्र अनेक ठिकाणी अनेकांच्या बाबतीत दिसून येत असतं.



आधुनिक केसरी

## तुझ्या चरणाची | धूळ झालो ||

लागली रे गोडी | हरिच्या नामाची ||
संसार तापाची | होळी झाली ||१||
मुक्त झालो देवा | आता नाही चिंता ||
नाम तुझे घेता | आनंदलो ||२||
त्रीगुण सोयरे | सोडोनीया गेले ||
फुलोनीया आले | सुख दारी ||३||
ब्रह्मानंदी टाळी | लागता नामाची ||
तुझ्या चरणाची | धूळ झालो ||४||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**जय आणि पराजय हे एक अव्याहत चाकाप्रमाणे फिरत राहणारे द्वंद्व आहे. विजयाने उन्मत्त होणारे आणि पराभवाने खचून जाणारे यांचा विनाश अटळ असतो.**

**तुमच्याकडे एक गोष्ट अशी आहे की, जी तुम्हाला अनेक विरोधांपासून वाचवू शकते- ती म्हणजे मौन होय. जर मौन बाळगणे अवघड जात असेल तर नामस्मरण करा.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**बिज अधार में वृक्ष है, मन में जग विस्तार ।**
**मन मारे जग नहिं रहे,**
**शब्द में सुरति सम्हार ।।२७।। (स्वर्वेद पंचम मण्डल द्वितीय अध्याय) ०५/०२/२७**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

बीजामध्ये जसा वृक्ष आहे, त्याचप्रमाणे मनातच सर्व विस्ताराचं बीज आहे. मन मेल्यानंतर संसार (जग) रहात नाही म्हणजेच त्याचा उपद्रव होत नाही. म्हणून अनुभवी संत मन-मायेला सोडून शब्द परम पुरुषात (परमेश्वरात) आपल्या सुरतिचा (आत्म्याच्या चेतन शक्तीचा) निरोध (शक्तीला केंद्रीत) करतात.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

हे माझ्या सारख्या सामान्य माणसाला पचवायला खूप जड जातं कारण आपणं शुन्यत्व मिरवू शकत नाही. एक साधं आपल्या व्यवहारी जगात वावरत असताना मलाचं सगळ्यांनी चांगले म्हणले पाहिजे हा आपला अट्टाहास असतो. पण आपलं कार्य जर शुन्य असेल तर लोक मला का विचारतील हा विचार न करण्याची बुद्धी असल्या कारणाने खोटा अहंकार सतत मिरवत असल्याने आत्मसाक्षात्कार होत नाही. प्रारब्धकर्मे जशी असतील त्याप्रमाणे वर्तन घडते. एखादा ज्ञानी मौन धरतो तर दुसरा एखादा निरूपण सांगेल. हे दोघेही मुक्त असतात .कारणं त्यांच्या स्वानुभवात फरक नसतो. एखाद्या वेळी स्वरूपसाक्षात्कार होऊन आत्मज्ञान झाले की देह स्तब्ध होतो. .त्याचे कर्म करणे थांबते त्यालाच तटस्थ अवस्था म्हणतात. पण मित्रांनो तटस्थपणा &स्तब्धता यांचा देहाशी संबंध असतो. स्वस्वरूपाशी नसतो हे याठिकाणी लक्षात ठेवणे योग्य होय. परमार्थामध्ये स्वस्वरूपाच्या अनुभवाला परमोच्च स्थान आहे. बाकी गोष्टी गौण आहेत. म्हणून आपण स्वस्वरूप जाणावे व सतत समाधानी असावे. समजा मी पोटभर जेवण केले आहे आणि कुणीतरी येऊन तु खुपचं भुकेली आहेस असे म्हणते तर मी ऊद्विग्न किंवा अस्वस्थ होणार नाही कारणं मला माहिती आहे की मी भुकेली नाहीये.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## लोकांचे मन दुखविणे ही हिंसाच

आधुनिक केसरी

ही जी सृष्टी भगवंताने उत्पन्न केली आहे तिची नक्कल म्हणजे चित्रकला होय. चित्रकाराने रंगविलेले चित्र खोटे असून जे खर्यासारखे भासते, त्याला उत्तम चित्र असे म्हणतात. भगवंताचे होऊन जी कला येईल ती खरी. भगवंताने आपल्याकडून जे करवून घेतले ती कला समजावी. जे कर्म भगवंताकडे न्यायला मदत करते ती कलाच होय. या कलेमध्ये मनाला गुंतविणे आणि उद्योगात राहणे ही भगवत्सेवाच आहे. मन म्हणजे कल्पनांचे मूर्त स्वरूप. मन चंचल आहे तोपर्यंत देहालासुद्धा स्वस्थता नाही. मनाची चलबिचल होते म्हणूनच अभ्यास करायला पाहिजे. मनाला शिक्षण देणे याचे नाव अभ्यास करणे. मनाची विश्रांती हीच खरी विश्रांती होय.
सृष्टीमध्ये सर्व ठिकाणी वैचित्र्य आढळते. प्राण्यांच्या कितीतरी जाती आहेत. माणसेसुद्धा एकासारखी एक कुठे असतात ? पण सर्वांमध्ये भगवंत मात्र सारखाच ओवलेला आहे. जगामध्ये प्राणी एकमेकाला मारक असूनदेखील कसे जगतात, हे पाहिले म्हणजे आश्चर्य वाटते. जगामध्ये माणूस आणि वाघ दोघेही राहतात. परंतु दोघांनाही एकमेकांची भिती असते, म्हणून एक दुसर्याला सहसा मारीत नाही. ज्याच्यामुळे दुसर्याच्या हिताचा घात होतो, अशी कृती करणे म्हणजे हिंसेचे लक्षण समजावे. भगवंताच्या आड येणार्या वस्तूंची हिंसा करणे ही अहिंसाच होय. पण आपल्या स्वार्थाकरिता आणि बडेजावाकरिता लोकांचे मन दुखविणे, ही हिंसाच समजावी. दुसर्याचे मन दुखविणे म्हणजे भगवंताचे मन दुखविणे होय. आपल्या मनात आलेली गोष्ट आपल्या हातूनसुद्धा होत नाही, तर मग इतरांनी आपल्या मनासारखे वागावे असे म्हणणे हे काही बरोबर नाही. आपल्याकडे बायका चातुर्मासामध्ये नियम करतात. उदाहरणार्थ, रोज एक वात लावायची, उजव्या हाताने पाणी प्यायचे, वगैरे. वास्तविक हे नियम कसले ! तुम्ही एक वात लावली काय आणि दोन वाती लावल्या काय, शेवटी दिवा लावावा लागतोच ! त्यापेक्षा, ' कुणाचे अंतःकरण दुखविणार नाही' असा नियम करावा. प्रथम चार महिने करावा आणि मग वर्षभर पाळावा आणि नंतर जन्मभर ठेवावा. काही बायका चातुर्मासात मीठ सोडतात. असे अळणी खाणारी बाई जेवायला बसली असताना मीठ वाढायला आलेल्या बाईला दुरूनच ' नको नको ' म्हणते; कारण न जाणो, चुकून मीठ किंवा मिठाचा पदार्थ पानात पडायचा ! हे जसे ती सांभाळते, त्याचप्रमाणे आपण कुणाचे अंतःकरण न दुखविण्याचा नियम केला की, आपण किती बेताने बोलू आणि कोणी आले तर आपण किती काळजीपूर्वक वागू ! भगवंत चोहोकडे आहे असे आपण म्हणतो, पण त्याप्रमाणे वागत नाही, याला काय करावे ? भगवंताचे होऊन त्याच्या नामात राहणे हाच एक उत्तम मार्ग आहे.



## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

आतां तुम्हां पुढें जोडीतसें हात । नका कोणी अंत पाहों माझा ॥२॥
तुका म्हणे आम्ही बैसलों शेजारीं । करील तें हरी पाहों आतां ॥३॥
नये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाहीं देवें ॥१॥

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, ७ फेब्रुवारी २०२३

adhunikkesari.com | Adhunik Kesari



राजस्थानी मल्टीस्टेट (कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक)

**राजस्थानी मल्टीस्टेट**
**को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ**

बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स

मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188 | कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176,

टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking

आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे... राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल ४१८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य

**तात्काळ बँकिंग सुविधा**


रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा

* नियम व अटी लागू

कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा


# 'लोकनेते राजारामबापू पाटील राष्ट्रीय ललित कला सन्मान' पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** राजारामबापू पाटील ललित कला अकादमी, महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने स्वर्गीय बापूंच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात येणारे 'लोकनेते राजारामबापू पाटील राष्ट्रीय ललित कला सन्मान' अकादमीचे संस्थापक मार्गदर्शक, माजी मंत्री आमदार जयंतराव पाटील यांच्या अनुमतीने अकादमीचे निमंत्रक व महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य कवी प्रदीप पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे घोषित केले. सन्मान पुरस्काराचे हे पहिले वर्ष असून, माजी मंत्री आ. जयंतराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व कलाक्षेत्रांतील मान्यवरांच्या हस्ते पुणे येथे हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील, असे पाटील यांनी सांगितले.

साहित्य क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानासाठी प्रसिद्ध विचारवंत, संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे (पुणे) यांना 'लोकनेते राजारामबापू



पाटील राष्ट्रीय ललित कला जीवनगौरव सन्मान' जाहीर झाला असून, रू. ५० हजार, सन्मानचिन्ह व मानपत्र असे सन्मानाचे स्वरुप आहे. समकालीन चित्रकलेतील गुणवत्तापूर्ण योगदानाकरिता प्रसिद्ध चित्रकार मंगेश नारायणराव काळे (सोयगाव, औरंगाबाद), समकालीन कवितेतील गुणवत्तापूर्ण निर्मितीकरिता प्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव (परभणी) आणि कथा साहित्यातील गुणवत्तापूर्ण निर्मितीकरिता प्रसिद्ध कथालेखिका मोनिका गजेंद्रगडकर (मुंबई) यांची 'लोकनेते राजारामबापू पाटील राष्ट्रीय ललित कला सन्मान' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. प्रत्येकी रु. २५ हजार, सन्मानचिन्ह व मानपत्र असे या सन्मानाचे स्वरुप आहे. प्रदीप पाटील म्हणाले, "महाराष्ट्राच्या समाजकारणामध्ये आणि राजकारणामध्ये माणसाच्या हिताचा मूल्यात्मक विचार घेवून आपल्या रचनात्मक कार्याने शिक्षण, सहकार, कृषी, उद्योग अशा विविध क्षेत्रांचा विकास साधणाऱ्या राजारामबापू पाटील यांच्या विचारांची जोपासना व प्रसार राष्ट्रीय पातळीवर करण्याच्या भूमिकेतून अकादमीची स्थापना करण्यात आली आहे. साहित्यासह संगीत, चित्र, शिल्प, नृत्य अशा ललित कलांमधील व लोककलेतील कलावंतांचे योगदान विचारात घेवून प्रतिवर्षी हे सन्मान दिले जातील. साहित्याचे अभ्यासक डॉ. संजय करंदीकर, कासेगांव शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य आर. डी. सावंत, स्वीय सहाय्यक मोहन चव्हाण, प्रकाशक सुनिताराजे पवार, उद्योजक सुनिल चव्हाण, सतीश पाटील, साहित्यिक जगदीश कदम, डॉ. राजेंद्र माने, प्रा. मिलींद जोशी, उद्धव कानडे, डॉ. संदीप सांगळे, विश्वनाथ पाटसुते यांच्यासह महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील मान्यवरांचा अकादमीच्या कार्यकारिणी व सल्लागार समितीमध्ये समावेश आहे. अकादमीतील मान्यवर यांबरोबरच संजय ऐलवाड, वसंत पाटील, रघुराज मेटकरी, डॉ. अनिल मडके, अंजली कुलकर्णी, मनीषा पाटील, प्रा. संजीवनी वाघ, अनंत कदम, सुरेश आडके, सुभाष कवडे आदी परिश्रम घेत आहेत.

# खा. सुप्रिया सुळे यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** 'राजर्षी शाहू महाराज परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती'ही योजनेतील 'एटीकेटी'धारक विद्यार्थ्यांचा सहानुभूतीपुर्वक विचार करून या योजनेतील त्रुटी दुर कराव्यात तसेच त्या विद्यार्थ्यांना ६ महिन्यांचा शैक्षणिक भत्त्यासहित निधी त्वरीत उपलब्ध करून देण्याबाबतचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावेत अशी मागणी करणारे पत्र राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

महाराष्ट्र शासनाच्यावतीने अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील विद्यार्थ्यांसाठी 'राजर्षी शाहू महाराज परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती'ही योजना राबविण्यात येते. या योजनेमध्ये परदेशातील विद्यार्थ्यांची शिक्षण पूर्ण फी, आरोग्य विमा व व्हिसा शुल्क शिष्यवृत्तीधारकांना मिळते.तसेच विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी उत्तीर्ण होणे बंधनकारक असून तसा प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी दर ६ महिन्यांसाठी सादर करणे आवश्यक आहे.परंतु या योजनेत निवड झालेले विद्यार्थी हे पहिल्यांदाच परदेशात गेलेले असतात. त्यांना तेथील भौगोलिक परिस्थिती, वातावरण यांच्याशी एकरूप होण्यास वेळ लागतो. घरापासून दूर असल्यामुळे आजारपण व नव्या भाषेचेही मोठे दडपण त्यांच्यावर असते. याशिवाय जेवढा भत्ता या शिष्यवृत्तीद्वारे त्यांना मिळतो त्यामध्ये काटेकोरपणे त्यांना आपला खर्च भागवावा लागतो ही बाब खासदार सुप्रियाताई सुळे यांनी निदर्शनास आणून दिली आहे

# चला... 19 मार्च रोजी शेतकरी सहवेदनेसाठी उपवास करूया

## किसानपुत्र आंदोलनाचे नेते, ज्येष्ठ पत्रकार अमर हबीब यांचा आधुनिक केसरीशी संवाद

आधुनिक केसरी

**दर वर्षी 19 मार्च रोजी लाखो लोक उपवास करतात. हा उपवास महाराष्ट्रात होतो, देशात होतो तसेच विदेशात देखील अनेक किसानपुत्र करतात. शेतकरी आत्महत्या थांबाव्यात यासाठी केला जाणारा हा आगळावेगळा उपवास आहे. त्यात सर्वांनी सहभागी होणे आजच्या घडीला गरजेचे असल्याचे आवाहन किसानपुत्र आंदोलनाचे नेते जेष्ठ पत्रकार अमर हबीब यांनी आधुनिक केसरीशी संवाद साधत केले.**

19 मार्च 1986 रोजी चिलगव्हाण (जि. यवतमाळ)चे साहेबराव करपे व त्यांच्या कुटुंबीयांनी केलेल्या आत्महत्याने सारा महाराष्ट्र हादरला होता.

वीज बिल थकले होते. वीज कापली होती. उभे पीक करपत चालले होते. पुढचे वर्ष आ वासून उभे होते. साहेबरावनी अनेक विनवण्या केल्या पण उपयोग झाला नाही. शेवटी सगळे कुटुंब पवनार जवळच्या दत्तपुरला गेले. तेथे खोली घेतली. रात्री पावनारला जाऊन भजन म्हटले. सकाळी त्या खोलीतुन एका शेतकरी कुटुंबाच्या सहा जणांचे प्रेत बाहेर काढावे लागले. त्यात चार मुलं व दोघे आई बाप होते. साहेबराव करपे यांनी लिहिल्या चिठ्ठीत त्यांच्या मृत्यूने सरकार शेतकरी प्रश्नाकडे ध्यान देईल, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. झाले उलटे. सरकारने घ्यावी त्या गोष्टीची दाखल घेतली नाहीच. सरकारे बदलली पण शेतकरी आत्महत्या सारख्या गंभीर राष्ट्रीय आपत्तीकडे कोणत्याच सरकारने लक्ष दिले नाही. शेतकऱयांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत गेले. देशात सुमारे साडे चार लाख शेतकऱयांना मृत्यू कवटाळावा लागला. शीतल भिसे असो की धर्मा पाटील असो की सखाराम राठोड, रोज आत्महत्येची बातमी येते. या आत्महत्या थांबाव्यात यासाठी आपण काय करू शकतो? आपण सामान्य माणसे, आपल्या हातात शास्त्र नाहीत.




आपण सरकार नाहीत. सरकारला भाग पाडू शकू एवढी ताकदही आपल्याकडे नाही. अशा परिस्थितीत सामान्य माणूस काय विचार करतो? माझ्या घरात अशी घटना घडली तर मला घास जाणार नाही! हीच ती भावना 19 मार्चच्या उपोषण/उपवास/अन्नत्यागा मागे आहे. हा उपवास तुम्हाला शेतकरी स्वातंत्र्यासाठी बळ देणार आहे. हा उपवास कोणत्याही पक्ष किंवा संघटनेचा नाही.

हा ज्याने त्याने आपल्या मनाने केलेला उपवास आहे.

ह्या आत्महत्या कधी थांबतील? काय केले म्हणजे थांबतील? किसानपुत्रांनी याचा सखोल विचार केला आहे. शेतकरीविरोधी सीलिंग, आवश्यक वस्तू व अधिग्रहण हे नरभक्षी कायदे या आत्महत्यांचे मूळ कारण आहेत. ते रद्द करणे गरजेचे आहे. हे कायदे रद्द व्हावेत हा एक कलमी कार्यक्रम घेऊन शेकडो किसानपुत्र धडपड करीत आहेत. आज त्यांची शक्ती कमी आहे पण उद्या आपण सर्वजण मिळून कायद्यांच्या बेड्या तोडून शेतकऱयांना स्वतंत्र करणार आहोत. देश स्वतंत्र झाला पण शेतकरी गुलाम राहिला! ही परिस्थिती बदलून शेतकऱयांना देशाचे खरे नागरिकत्व मिळवून द्यायची जबाबदारी इतिहासाने तुमच्या-आमच्यावर सोपविली आहे.

**19 मार्चचा उपवास :** पहिल्या वर्षी (2017) साहेबराव करपे यांचे गाव चिल-गव्हाण (यवतमाळ) येथे उपवास सुरू करून महागाव येथे उपोषणाला बसलो. या वर्षी लाखो लोकांनी वैयक्तिक उपवास केला. येथूनच हा उपवास सुरू झाला. दुसऱ्या वर्षी (2018) साहेबराव करपे कुटुंबीयांनी जेथे आत्महत्या केली, त्या दत्तपुर (जि. वर्धा) ला भेट देऊन पवनार येथे उपोषण केले. तिसऱ्या वर्षी (2019) दिल्लीत म. गांधी समाधी (राजघाट) परिसरात उपवास केला. चौथ्या वर्षी (2020) मी व माझ्या अनेक किसानपुत्र मित्रांनी पुण्यात उपवास केला. या वर्षी करोनाचे संकट होते तरी लोकांनी घरो घरी उपवास केला. सहाव्या वर्षी (2021) पहिली पदयात्रा निघाली. औंढा ते चिलगव्हाण. चिलगव्हाण येथे उपवासाची सांगता करण्यात आली. सहाव्या वर्षी (2022) आंबाजोगाई (जि बीड) येथे सामूहिक उपवास केला. पानगाव ते आंबाजोगाई अशी पदयात्रा काढण्यात आली. यावर्षी वर्ष 7 वे (2023) खान्देशातील धुळे येथे उपवास करणार आहोत. किनगाव (जळगाव) ते धुळे अशी पदयात्रा निघणार आहे. तुम्हाला या आत्महत्यांचे ऐकून दुःख होत असेल तर 19 मार्च रोजी उपवास करा! आपले काम करीत हा उपवास करायचा आहे. शक्य होईल तेथे सामूहिक उपोषणाला बसा. ज्यांना शक्य असेल त्यांनी पदयात्रेत सामील व्हावे. मला माहित आहे की, एक दिवसाच्या उपवासाने सरकार बधणार नाही. पण यातून आपल्या संवेदना व्यक्त होतील. आपण शेतकऱयांच्या बाजूने आहोत हा निर्धार पक्का होईल. तोच शेतकऱयांच्या हातपायातील शुंखला तोडणारा ठरेल. शेतकऱयांच्या स्वातंत्र्यासाठी आपण करू एक दिवस उपवास! अन्नदात्यासाठी अन्नत्याग ! तो दिवस 19 मार्च आहे यात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन अमर हबीब यांनी आधुनिक केसरीशी संवाद साधत केले.



# टिळक यांची खंत

आधुनिक केसरी

पुण्यातल्या कसबा मतदार संघातल्या भाजपाच्या आमदार मुक्ता टिळक यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले. कर्करोगाशी त्यांची सुरू असलेली झुंज अखेर संपली. त्यानंतर आता या मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे. जेव्हा एखाद्या आमदाराचं निधन होतं त्यावेळी खरेतर ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी प्रयत्न केले जातात. तसेच शक्यतो जो आमदार गेला आहे त्या आमदाराच्या घरातल्या सदस्याला तिकिट दिले जाते असे राजकारणातले दोन अलिखित संकेत आहेत. मात्र मुक्ता टिळक यांचे पती शैलेष टिळक यांना भाजपाने तिकिट दिलेले नाही. त्यामुळे त्यांनी आपली खंत व्यक्त केली आहे. एवढेच नाही तर ही निवडणूक बिनविरोध होणार नाही कारण महाविकास आघाडीनेही या ठिकाणी उमेदवार दिला आहे. भाजपाने हेमंत रासने यांना उमेदवारी दिली आहे. अर्ज भरण्यासाठी चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते दाखल झाले होते. यामध्ये शैलेष टिळक यांचा सहभाग नव्हता. यानंतर शैलेष टिळक म्हणाले की आम्ही आधीही भूमिका मांडली आहे. पक्षाने जर आमच्या घरात तिकिट दिले असते तर बरे झाले असते. कारण ते झाले असते तर मुक्ता टिळक यांचं स्वप्न पूर्ण करण्याची संधी मिळाली असती. मुक्ता टिळक यांना ती खऱ्या अर्थाने श्रद्धांजली ठरली असती. पण ठीक आहे पक्षाने विचार करून निर्णय घेतला असावा त्यामुळे आम्ही त्या निर्णयाला विरोध करत नाही असेही शैलेष टिळक यांनी म्हटले आहे. आम्ही पक्षाच्या विरोधात जाणार नाही. पक्षासोबत राहणार असेही शैलेष टिळक यांनी म्हटले आहे. पक्षाने जो निर्णय घेतला त्यामुळे ब्राह्मण समाज नाराज आहे असे वाटतंय का हे विचारले असता कुणाल टिळक म्हणाले की सोशल मीडियावर आणि डिजिटल मीडियावर अशा प्रतिक्रिया येत आहेत. पण भाजपाने निर्णय घेतला आहे. त्याच निर्णयाचे आम्ही पालन करतो आहोत ते प्रत्येकाने करायला पाहिजे. नेशन फर्स्ट, पार्टी सेकंड आणि सेल्फ लास्ट असा भाजपाचा मंत्र आहे त्याचा विचार प्रत्येकानेच करायला पाहिजे असे कुणाल टिळक यांनी म्हटले आहे. आम्हीही याच उद्देशाने पुढे जाऊ. भाजपाने जो निर्णय घेतला त्याच्या पाठिशी आम्ही आहोत. मुक्ता टिळक यांना जाऊन एक महिना झाला आहे. पण घडामोडी अत्यंत वेगाने झाल्या. आम्हाला यातून थोडे बाहेर यायला वेळ लागेल. आम्ही पक्षाच्या विरोधात जाणार नाही असे मुक्ता टिळक यांचे पती शैलेष टिळक यांनी म्हटले आहे. आमची जी भूमिका होती ती पक्षाच्या नेत्यांना सांगितली आहे. आम्ही पक्षाच्या विरोधात जाणार नाही असेही शैलेष टिळक यांनी म्हटले आहे. एका मुलाखतीत शैलेष टिळक यांनी हे वक्तव्य केलें आहे.

# कारगिल युद्धाचे खलनायक मुशर्रफ कालवश



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**पाकिस्तानचे माजी हुकूमशहा व कारगिल युद्धाचे खलनायक जनरल परवेझ मुशर्रफयांचे दुबईत दीर्घ आजाराने निधन झाले. मुशर्रफ यांना हृदय आणि वयाशी संबंधित इतर अनेक आरोग्य समस्या होत्या. पाकिस्तानच्या सेनेत असो की राजकारणात त्यांची महत्त्वाची भूमिका राहली. कारगिल युद्धात सुद्धा त्यांनी खलनायकाची भूमिका घेतली होती. अनेकदा ते वेगवेगळ्या कारणाने चर्चेत आले. त्यातलंच एक कारण होतं जेव्हा बेनजीर भुट्टोंच्या हत्येचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता. १९९९ मध्ये परवेझ मुशर्रफ यांनीच तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांना न सांगता भारताविरुद्ध कारगिल युद्ध सुरू केले होते.**

लष्करप्रमुख असताना त्यांनी सत्तापालट करून पाकिस्तानात मार्शल लॉ जाहीर केला होता. परवेझ मुशर्रफ यांचा जन्म ११ ऑगस्ट १९४३रोजी झाला. ते पाकिस्तानचे राष्ट्रपती आणि लष्करप्रमुख राहिले आहेत. परवेझ मुशर्रफ हे एक नाव आहे ज्यांनी पाकिस्तानच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्याचा आतापर्यंतचा प्रवास सांगतो. नवाझ शरीफ यांना १९९७ मध्ये लष्करप्रमुख बनवण्यात आले होते.जेव्हा नवाझ शरीफ यांनी पाकिस्तानच्या सार्वत्रिक निवडणुकीत विजय मिळवला तेव्हा पंतप्रधान झाल्यानंतर नवाझ शरीफ यांनी जनरल परवेझ मुशर्रफ यांना लष्करप्रमुख म्हणजेच पाकिस्तानचे लष्करप्रमुख बनवले. लष्करप्रमुख म्हणून परवेझ मुशर्रफ हळूहळू शक्तिशाली झाले आणि त्यांचा सरकारमधील प्रभाव वाढला.

कारगिल युद्धासाठी जनरल परवेझ मुशर्रफ देखील जबाबदार मानले जातात. कारगिल युद्धाच्या वेळी ते पाकिस्तानच्या लष्कराचे प्रमुख होते. त्यावेळी त्यांनी तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांना न सांगता कारगिल युद्ध सुरू केले.

पाकिस्तानचे लष्करप्रमुख असताना परवेज मुशर्रफ यांनी कारगिल युद्धाची आगळीक केली होती. भारतीय सैनिकांनी कारगिल युद्धात असीम शौर्य दाखवले होते. तर याच युद्धाला मुशर्रफ यांचे कट कारस्थान म्हणून ओळखले जाते. आपल्या राजकीय इच्छा पूर्ण करण्यासाठी मुशर्रफ यांनी कारगिलचे युद्ध छेडले होते. आपले आत्मचरित्र "इन द लाइन ऑफ फायर" यामध्ये त्यांनी या युद्धाबाबत लिहिले की, पाकिस्तानी सैन्य युद्धात सहभागी होते, मात्र हे सत्य आम्ही लपवले. या युद्धातील पराभवाचे खापर मुशर्रफ यांनी तत्कालीन पंतप्रधान नवाज शरीफ यांच्यावर फोडले होते.

**नवाझ शरीफ यांचा सत्तापालट झाला**

सन १९९९ मध्ये जनरल परवेझ मुशर्रफ यांनी लष्करी बंड करून नवाझ शरीफ यांना सत्तेवरून हटवले. नवाझ शरीफ यांना याची आधीच कल्पना होती, त्यामुळे त्यांनी आधीच संशयाच्या आधारे मुशर्रफ यांना लष्करप्रमुख पदावरून हटवले होते. पण त्यांच्यानंतर मुशर्रफ यांच्या जागी लष्करप्रमुख बनलेले जनरल अझीझ हे मुशर्रफ यांचे निष्ठावंत निघाले. यानंतर नवाझ शरीफ यांची उचलबांगडी झाली. परवेझ मुशर्रफ यांना राष्ट्रपती म्हणून दीर्घकाळ सत्ता सांभाळल्यानंतर पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष घोषित करण्यात आले . परवेझ मुशर्रफ २००१ ते २००८ या काळात पाकिस्तानचे अध्यक्ष होते. मात्र, नंतर त्यांना पाकिस्तानच्या सरकारी यंत्रणेचे बळी व्हावे लागले. दुसऱ्या काश्मीर युद्धात खेमकरन सेक्टरसाठी लढताना मुशर्रफ यांचा पहिला युद्धभूमीचा अनुभव तोफखाना रेजिमेंटमध्ये होता. मुशर्रफ यांनी संघर्षाच्या वेळी लाहोर आणि सियालकोटच्या युद्धक्षेत्रातही भाग घेतला होता. त्यांना शौर्याबद्दल इम्तियाजी सनद पदक मिळाले. १९६५ चे युद्ध संपल्यानंतर लगेचच मुशर्रफ यांना उच्चभ्रू स्पेशल सर्व्हिसेस ग्रुपमध्ये समाविष्ट करण्यात आले. १९६६ ते १९७२ पर्यंत त्यांनी एसएसजीमध्ये सेवा बजावली. कारगिल युद्ध भडकवण्यात मुशर्रफ यांचे मोठे योगदान आहे तत्कालीन लष्करप्रमुख मुशर्रफ हे



कारगिल युद्धामागे प्रमुख रणनीतीकार होते. १९९९ मध्ये, मार्च ते मे पर्यंत, त्याने कारगिल जिल्ह्यात गुप्त घुसखोरीचे आदेश दिले. यानंतर भारताला याची माहिती मिळताच दोन्ही देशांमध्ये युद्ध सुरू झाले. या युद्धात पाकिस्तानला त्रास सहन करावा लागला आणि मुशर्रफ यांनाही खूप त्रास सहन करावा लागला.



पाकिस्तानचे अध्यक्ष नवाझ शरीफ यांनी हे ऑपरेशन त्यांच्या नकळत करण्यात आल्याचे म्हटले होते. मात्र, कारगिल ऑपरेशनपूर्वी आणि नंतर त्यांना लष्कराकडून मिळालेल्या ब्रीफिंगचा तपशील सार्वजनिक झाला. वृत्तानुसार, ऑपरेशनपूर्वी, जानेवारी ते मार्च दरम्यान, शरीफ यांना तीन वेगवेगळ्या बैठकांमध्ये ऑपरेशनची माहिती देण्यात आली होती.

**भारत आणि मुशर्रफ यांच्यातील संबंध**

कारगिल युद्ध दोन गोष्टींसाठी सर्वात चांगले लक्षात ठेवले जाते. एक भारतीय लष्कराच्या अदम्य शौर्यासाठी आणि दुसरे मुशर्रफ यांच्या कुटीलपणासाठी. मुशर्रफ यांनी आपल्या राजकीय आकांक्षा पूर्ण करण्यासाठी कारगिल युद्ध सुरू केल्याचे मानले जाते. त्यावेळी ते पाकिस्तानचे लष्करप्रमुख होते. 'इन द लाइन ऑफ फायर' या आत्मचरित्रात त्यांनी लिहिले आहे की, कारगिल युद्धात पाकिस्तानी सैन्य सहभागी झाले होते. मात्र, याआधी पाकिस्तानने हे तथ्य लपवून ठेवले होते. पराभवाचा पेच टाळण्यासाठी मुशर्रफ यांनी संपूर्ण जबाबदारी तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्यावर टाकली. नवाझ शरीफ यांनी कारगिल युद्धातून माघार घेण्यास सांगितले होते, असे ते म्हणाले.

२००१ मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि बळजबरीने राष्ट्रपती पदावर विराजमान झालेले मुशर्रफ यांची आग्रा येथे भेट झाली. या शिखर परिषदेत मुशर्रफ यांच्याशी काश्मीर प्रश्नावर कोणताही करार होऊ शकला नाही. मुशर्रफ यांच्या आडमुठेपणामुळे ही चर्चा रुळावर आली. वाजपेयींनी मुशर्रफ यांना काश्मीरमध्ये सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादी कारवाया थांबवण्यास सांगितले होते. २००१ मध्येच भारतीय संसदेवर हल्ला झाला होता. या हल्ल्यात पाकिस्तानने आर्थिक मदत करणाऱ्या लष्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-मोहम्मदसारख्या संघटनांचा हात होता. मुशर्रफ यांनी हल्ल्यानंतर अनेक वर्षांनी कबूल केले होते की ते त्यांच्या जागी दहशतवाद्यांना प्रशिक्षण देत आणि त्यांना भारतीय लष्कराशी लढण्यासाठी पाठवत असत.

पुलवामा हल्ल्यानंतर दोन्ही देशांमधील तणाव धोकादायक पातळीवर पोहोचल्याचे मुशर्रफ यांनी सांगितले होते. पाकिस्तानने आपल्या शेजारी देशावर एका अणुबॉम्बने हल्ला केला तर शेजारी देश आपल्याला वीस अणुबॉम्बने नष्ट करू शकतो, असे ते म्हणाले होते.

# हिमालयाची सावली : त्यागमूर्ती माता रमाई

आधुनिक केसरी

**२०१४ साली सत्तेवर आलेल्या मोदी सरकारचा दहावा आणि लोकसभा निवडणुकीपूर्वीचा शेवटचा नियमित अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारीला संसदेत सादर केला. पुढील वर्षी म्हणजे २०२४ च्या एप्रिल मे महिन्यात लोकसभा निवडणुका होतील त्यामुळे पुढील वर्षी अर्थमंत्र्यांना अंतरिम अर्थसंकल्प सादर करावा लागेल त्यामुळेच मोदी सरकारचा हा शेवटचा नियमित अर्थसंकल्प असल्याने या अर्थसंकल्पाकडे सर्व क्षेत्राचे लक्ष लागले होते. अर्थात निवडणूक डोळ्यासमोर ठेवूनच अर्थमंत्र्यांनी सर्व वर्गांना विशेषतः मध्यम वर्गांना खुश करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.**

आज ७ फेब्रुवारी, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची जयंती. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन! **श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

# 'केसीआर'चा आत्मघातकी निर्णय ?

आधुनिक केसरी

**तेलंगणा राज्याचे मुख्यमंत्री व भारत राष्ट्र समिती पक्षाचे संस्थापक के. चंद्रशेखर राव (कलवकुंतल के.चंद्रशेखर राव उर्फे केसीआर )यांनी पक्षाची बांधणीसाठी व सभा महाराष्ट्रात (नांदेड येथे) ५ फेब्रुववारी रोजी घेतली. केसीआर'ची केवळ सभा नसून त्यांची राष्ट्रीय राजकारणात उडी घेतली आहे,हे स्पष्ट दिसत आहे.त्यांनी यावेळी महाराष्ट्रात पक्षाच्या प्रचाराचा नारळ फोडला आहे.त्यांनी 'अब की बार किसान की सरकार' असा घोषणा केली आहे.म्हणजे 'केसीआर' च्या सल्यानुसार केंद्रात सरकार आणले जाणार आहे काय? त्यासाठी त्यांची व पक्षाची रणनीती तरी काय आहे?**

केंद्रातील मोदी सरकारचा,भाजपाचा विजयाचा वारू जो सुसाट धावत आहे,तो रोखण्यासाठी विरोधी पक्ष उतावीळ झाला आहे.पण विरोधी पक्षाला एकत्रित मोठ बांधता आलेली नाही.तर दुसरीकडे विरोधी पक्षात आम आदमी पक्षाचे केजरीवाल व समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव तर तेलंगणातील भारत राष्ट्र समितीचे 'केसीआर' यांनी मात्र भाजपा व काँग्रेस पक्षांना सत्तेपासून रोखण्यासाठी तिसरी आघाडी निर्माण केली आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री "केसीआर' यांची हट्टवादी,एकाधिकाशाही मुख्यमंत्री म्हणून ख्याती आहे. २०२३ मध्ये देशातील नऊ राज्यात विधानसभेच्या निवडणूक होणार आहेत.यात निगालँड,त्रिपूरा,मेघालय मिझोरामसह व मोठ्या राज्य राजस्थान,छत्तीसगड,मध्यप्रदेश, कर्नाटक, आणि विशेष म्हणजे तेलगंणा राज्याचा समावेश आहे.यात तेलंगणा राज्यात विधानसभेच्या एकूण ११९ जागा आहेत. या राज्यात भाजपाने लक्ष्य केंद्रित केले आहे. भाजपाचे राष्ट्रीय अधिवेशन हैद्राबादला घेतले गेले होते. भाजपाचे अध्यक्ष शहा व अध्यक्ष लड्डा हे तेलंगाणात सतत प्रचार दौरे करत आहेत. भाजपाने तेलंगणा राज्यातील ९० जागाच्या विजयाचे लक्ष्य ठेवले आहे. यावेळी तेलगंणाच्या 'केसीआर' ला २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत धक्का बसण्याची भीती वाटत लागली आहे. दुसरीकडे भाजपालाही शह द्यावा, या उद्देशाने त्यांनी तेलंगणा सीमेलगत असलेल्या नांदेड असलेल्या महाराष्ट्रात भारत राष्ट्र समिती पक्षाची मोर्चे बांधणीला सुरुवात केली. भारतीय लोकशाहीत कोणत्याही पक्षाला कोणत्याही राज्यात पक्ष वाढविणे व प्रचार करणे गैर नाही.पण अनेक प्रादेशिक पक्षाचे नेत्यांची मक्तेदारी वाढत चालली आहे. आपल्या राज्यात इतर पक्षाचे नेते प्रचाराला आले की, त्यांना मात्र 'बाहेरील' संबोधले जाते, ते अत्यंत चुकीचे आहे. यापूर्वी ए.आय.एम आय.एम.चे नेते असुदोद्दीन औवैसी यांनी नांदेड येथून महाराष्ट्राच्या राजकारणाला सुरुवात केली होती.,केसीआर' सुध्दा त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत आहेत.तेलंगणात निवडणुकीत भाजपा नव्हे तर तेलगू देशम, काँग्रेस व इतर पक्ष निवडणुकीत 'केसीआर'च्या विरोधात सर्व पक्ष विरोधात दंड थोपटणार आहेत,अशी परिस्थिती आहे.त्यामुळे येत्या विधानसभा निवडणुकीत भारत राष्ट्र समिती पक्षाची बहुमतासाठी कसोटी लागणार आहे. आपल्या पक्षाने कोणाशी मैत्री का? स्वतंत्रपणे निवडणूक लढवावी किंवा नाही, या व्दिधा मनः स्थितीत आहेत.यातून भाजपा पक्षाला शह देण्यासाठी महाराष्ट्रातील हिंदुतील तेलगू भाषिक मतदार भारत राष्ट्र समितीला जोडले गेले तर हिंदु मताची विभागणी होईल,यात भाजपाला फटका बसेल,असे त्यांना वाटते. त्यात औवेशी हे "केसीआर"सत्तेत मित्र पक्ष आहेत. त्यांच्या जीवावर मध्यंतरी हैद्राबादला भाजपाच्या नेत्याला जेलमध्ये टाकण्यासाठी धुडगूस घातला होता!या मित्र पक्षाचा मदतीचा महाराष्ट्रातील मुस्लिम 'व्होटबँक'चा पक्षाला फायदा होईल.असे राजकीय गणित आहे.

'केसीआर'एकाधिकारशाहीमुळे प्रशासनातील अधिकारी वैतागले आहेत. ते अंगावर धावून येतात, ते वाटेल ते बोलतात व फाईल फेकतात ,ते सत्तेसाठी तुष्टीकरणाचे राजकारण करतात,असा आरोप आहे. त्यांचे हैद्राबाद निजाम संस्थावरचे अजूनही प्रेम गेलेले नाही. ते "हुजूर - ए निजाम' त्यांचा गौरव केला जातोय.हैद्राबादच्या निजामाच्या इतिहासाचे पुनर्र लेखन केले जावे, अशी त्यांनी मागणी केली आहे. तसेच दुसरीकडे आंध्र प्रदेश मुख्यमंत्री जगमोहन रेड्डी यांनी तर हिंदुचे मंदिराचे सरकारच्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. परवा सर्वोच्च न्यायालयाने गेले धार्मिक सरकारने लुडबूड करू नये, अशा शब्दात नुकतेच फटकारले आहे. तेलंगणा व हैद्राबाद राज्यात हैद्राबाद मुक्तीसंग्राम दिन साजरा केला जात नाही,कारण 'केसीआरला' ला तर मुस्लिम समाज व औवेसीला गरज अधिक वाटते व त्यांची,भीती वाटते.शेवटचा निजाम मुर्करम जहा यांचे मृत्यूनंतर "सुपूर्द ए खाक' (दफनविधी) तेलंगणा राज्य सरकारने शासकीय इतमामात केला. ते निजामाच्या अत्यंदर्शनासाठी गेले होते. परवा 'तर केसीआर'ने सीमाच गाठली.त्यांनी प्रजासत्ताक दिन साजरा न करण्याची भूमिका घेतली होती. हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले, तेंव्हा न्यायालयाने त्यांना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे, बंधनकारक असल्याचे सांगत फटकारले. तरीही त्यांनी सार्वजनिक प्रजासत्ताक दिनाच्या समारंभाला हजेरी लावलेली नाही. तेंव्हा तेलंगणा मुख्यमंत्री केसीआरच्या निर्णय वादग्रस्त मुख्यमंत्री प्रसिध्द आहेत. राज्यातील त्यांनी घेतलेले अनेक निर्णय करणारे समाजात तेढ निर्माण करणारे व देशाच्या हिताच्या विरोधात आहेत. लोकसभा २०२४ च्या निवडणुकीत तेलंगणात, महाराष्ट्रात भारत राष्ट्र समितीने,दिल्ली आणि पंजाबमध्ये आम आदमीचे केजरीवालने तर उत्तर प्रदेशमध्ये अखिलेश यादव यांच्या सपा पक्षाने भाजपा विजयाला ब्रेक लावावा, असे प्रयत्न असावा, अशी रणनीती आहे, असे दिसतेय. आंध्र प्रदेशला इतिहास पहाता! तेलगू भाषिक राज्याच्या मागणीसाठी गांधीवादी नेते पोट्टी श्रीरामुलु यांनी अमरण उपोषण केले. पण ५३ दिवस केले.त्यांचा उपोषण दरम्यान १५ डिसेंबर १९५२ रोजी मृत्यू झाला. दरम्यान त्यानंतर देशात १९५२ मध्ये लोकसभा व विधानसभेची पहिली निवडणूक एकत्रितपणे घेण्यात आली आहे. हैद्राबाद निजाम संस्थानचे भारतात विलीन झाल्यानंतर १९५२ मध्ये हैद्राबाद (स्टेट) राज्याची ही पहिली निवडणूक होती.या राज्यात मराठवाडा व कर्नाटक जिल्हे त्यात होते. विधान सभेच्या १७५ जागात काँग्रेसने सर्वाधिक म्हणजे ९३ जागेवर विजय मिळविला.तर पी.डी.पी.( पीपल्स डेमोक्रटीक पाट्रीने) ४२ जागा जिंकल्या. पण राज्यात बहुसंख्य हिंदु संख्या असून सुध्दा जनसंघाला एकही जागा जिंकता आली नाही. हैद्राबाद स्टेटचे बरगुला रामकृष्णराव हे पहिले मुख्यमंत्री झाले. तेंव्हा मराठवाड्यात सर्वात अधिक जागा काँग्रेसने जिंकल्या तर शे.का. पक्ष दुसऱ्या क्रमांकावर होता. तेंव्हा नांदेड भोकर मतदार संघातून काँग्रेसचे दिंगबराव बिंदू पहिले आमदार निवडून आले.ते हैद्राबाद स्टेट मंत्री होते. पण नांदेडच्या काँग्रेस नेत्यांना त्यांचा विसर पडलेला आहे. त्यानंतर १ नोव्हेंबर १९५६ रोजी भाषावार आंध्रप्रदेश राज्याची निर्मिती झाली. तेंव्हा निलम संजीव रेड्डी मुख्यमंत्री झाले.या राज्यात तेलगू भाषिक तरुणांना नोकरीत, शिक्षणात प्राधान्य मिळत नव्हते. त्यामुळे तेलंगणा राज्याच्या स्वंतत्र निर्मितीची मागणीसाठी १९६९ तरूणांनी आंदोलन केले. तेंव्हा पोलिस गोळीबारात ३६९ तरुणांचा बळी गेला. तत्कालिन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी या प्रश्नाबाबत चर्चेला बोलावले पण हा प्रश्न सोडविला गेला नाही. हैद्राबाद राज्यात१९८२ पर्यंत काँग्रेस पक्षाची एकहाती सत्ता होती. कारण राज्याती धार्मिक चित्रपटात काम करणारे अभिनेता एन.टी. रामाराव यांनी तेलगू देशम पक्षाची स्थापना केली, ते राज्यात सत्तेत आले. राज्यात बिगर काँग्रेसचे पहिले सरकार आले.त्यानंतर तेलगू देशम, काँग्रेस असे सत्तांतर झाले. पण तेंव्हा हैद्राबाद आणि महाराष्ट्र सरकारचे राजकीय सबंध चांगले होते. १९७५ मध्ये महाराष्ट्र व आंध्र सरकारमध्ये गोदावरी पाणी वाटपाबाबतचा करार स्व.शंकरराव चव्हाण यांनी केला होता. यातून आंध्राने महाराष्ट्रातील पुल व लेंडी धरणासाठी वाटा देण्याचे ठरले होते. यातूनच दोन राज्याला जोडणाऱ्या येसगीच्या पुलाचे उदघाटन महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण व आंध्र प्रदेशचे एन. टी. रामाराव यांनी संयुक्तपणे केले होते. आंध्र प्रदेशातील चंद्राबाबू नायडू यांच्याकडे सत्ता आल्यानंतर आंध्र व महाराष्ट्र सरकारमध्ये कटूता निर्माण झाली तेंव्हा आंध्र प्रदेशातील लोकप्रतिनिधींनी बाभळी बांधऱ्याला उभारणीनंतर विरोध केला. केंद्रीय जल आयोज, संसद, सर्वोच्च न्यायालयात पर्यंत पाणी प्रश्नाचा वाद गेला. न्यायालयाने असा निर्णय दिला की, बाभळी बांधऱ्याचा आज फारसा उपयोग होत नाही. आता मात्र केसीआरला पुळका कसा येतोय. महाराष्ट्रातील काँग्रेस सरकारने पुनर्र याचिका दाखल केली नाही. आंध्र प्रदेश सरकार हे महाराष्ट्र व्देष भावनेतून विरोध करत आहे, अशी राज्यातील जनतेत भावना निर्माण झालेली आहे. ज्या प्रमाणे कर्नाटक सरकार सीमा प्रश्नावरून मराठी भाषिक लोकांचा छळ करत व महाराष्ट्राशी जसा व्यवहार करत आहे. तेलगंणा स्वतंत्र राज्याची झाल्यानंतर मुख्यमंत्री 'केसीआर' सुध्दा तीच परंपरा चालवित आहेत. आंध्रातील तीन नेत्यांनी राजकारणाची सुरुवात तेलगू देशम पक्षापासून केली. पण या नेत्यांनी सत्तेसाठी वेगवेगळ्या पक्षाच्याचुली मांडल्या आहेत. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांचे वडील वाय. एस. राजशेखर रेड्डी हे काँग्रेसचे नेते होते. त्यांचे एका अपघातात निधन झाले. पण जगनमोहन रेड्डी यांना काँग्रेसने त्यांना बाजूला सारले व त्यांनी वाई.एस. आर.काँग्रेस हा नवीन पक्ष काढून २०१९ मध्ये नायडू पराभूत आंध्र राज्याची सत्ता मिळविली.तेलंगणा स्वंतत्र राज्य निर्मितीसाठी के.चद्रशेखर राव यांनी आंदोलन व उपोषण केले. काँग्रेसने २०१४ मध्ये निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसने हैद्राबादचे विभाजन करून तेलंगणा राज्याची निर्मीती केली. 'केसीआर'राज्याचे मुख्यमंत्री बनले. त्यांनी तेलंगणा राष्ट्र समिती नावाचा पक्ष निर्माण केला ते संस्थापक आहेत. नंतर २०१४ व २०१९ विधानसभा निवडणुकीत तेलंगणा राष्ट्र समितीने बहुमत मिळाले. त्यांनी ए.आय.एम.आय. एम. औवेसी यांची साथ घेतली आहे. त्यांनी तेलंगणात अनेक महत्वपूर्ण योजना सुरु केल्या आहेत. यात रयुथु बंधू योजनेअतंर्गत शेतकऱ्यांसाठी दोन हंगामासाठी दहा हजार दिले जात आहेत. त्यांनी तेलंगणातील ६५ लाख शेतकीऱ्यांना लाभ दिला आहे, तसेच दलित बंधू योजनेची देशात चर्चा आहे, दलित कुटुंबांना व्यवसायासाठी दहा हजार दिले जात आहेत. दरवर्षी २५ लाख कुटुंबाना लाभ देण्याचे लक्ष आहे. त्यासाठी १२०० कोटी आर्थिक तरतूद केली.राज्यातील लोकप्रतिनीधी व त्यांच्या मृत्यूनंतर पत्नीना निवृत्ती वेतन योजनावर ९ हजार ६०० कोटी रुपये खर्च होत असून यात वेतनात वाढ करण्याची तयारी आहे. २०२३ मध्ये भारत राष्ट्र समिती सत्तेत आल्यास शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचे आश्वसन दिले आहे. पण राज्यावर २००२ मध्ये सुमारे २ लाख ४१ हजार कोटींचे कर्ज आहे. यात आणखी वाढ होत जाणार आहे. मोदी सरकार या लोककल्याण योजनांचा विरोध करत आहेत, असे केसीआरचे म्हणणे आहे. पण वस्तुस्थिती अशी तेलंगणा राज्य शासनाकडे महत्वपूर्ण योजना पुर्णत्वाला नेण्यासाठी पैसा नाही, कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कर्ज काढावे लागत आहे. राज्यात सत्ता मिळविण्यासाठी महसूल उत्पन्न न वाढविता रेवडी वाटप पायंडा केजरीवाल, काँग्रेस, केसीआर, सरकारने सुरु केला आहे. राज्य सरकारला कर्जाच्या बोझ्याखाली टाकल्यानंतर हेच नेते नंतर केंद्राकडे मदतीची मागणी करतील. सत्तेसाठी सवंग योजनांचा, पैश्याचा पाऊस पाडून लोकाचे गरीबीमुक्ती होईल, यासाठी रेवडी वाटपाचा प्रयोग सुरु झालेला आहे त्यातून तेलंगणात केसीआरचे



आसन आजपर्यत मजबूत तरी राहिलेले आहे.दि. २७ जानेवारी २०२३रोजी तेलंगणात केजरीवाल व अखिलेश एकत्रित आले होते. त्यांनी केंद्रातील भाजपाला घालण्यासाठी तिसरी आघाडीचा निर्णय घेतला. पण यात आघाडीपासून शिवसेनेचे दोन्ही गट, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस इतर पक्षाच्या नेत्यांनी अंतर ठेवले आहे. हैद्राबादमहापालिकेच्या २०१६ च्या निवडणुकीत "केसीआर'च्या पक्षाला ५५ तर भाजपाला ४८ तर औवेसीला पक्षाला ४४ जागा मिळविल्या. औवेसी यांचा पक्ष तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला. तेलंगणा राज्यात लोकसभेच्या १७ जागा आहेत. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत केसीआरच्या टी.आर.एस. पक्षाला ११ तर काँग्रैस, भाजपा, वाय.एस.आर. काँग्रेस, टीडीपी, ए.आय. एम.आय. एम. प्रत्येकी एक जागा जिंकली.तर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मात्र टीडीपीला ९ तर भाजपाने ४ तर काँग्रेसने ३ तर ए. आय. एम. आय .एम पक्षाला एक जागा जिंकली. यात भाजपाने आदिलाबाद, करीमनगर, सिंकदराबाद, निजामाबाद या लोकसभेच्या जागेवर विजय मिळविला आहे. तेंव्हा केसीआरचा जनाधार कमी होत चालला आहे. त्यामुळे केसीआरने यांनी पक्षाचे नाव बदलून भारत राष्ट्र समिती असे नामांत्तर केले व राष्ट्रीय राजकारणात उडी घेतली आहे. पण ते तेलंगणाच्या लोकसभेच्या जागेच्या बळावर केंद्रातील भाजपा व मोदी सरकारला सत्तेतून घालण्याची स्वप्न पहात आहेत.त्याचे हे राजकारण 'मुंगेरीलाल के हसीन सपने'या कथेप्रमाणे होईल. महाराष्ट्रात नांदेड पक्षाची मोर्चे बांधणी नव्हे भाजपाच्या विरोधात सभा घेतली. नांदेडात केसीआर च्या स्वागतसाठी गुलाबी झेंडे व चक्र व सजविले गेले होते. सभेसाठी भव्य व्यासपीठ उभारले गेले.पक्षाचा खर्च जालना व पूर्वी नांदेडातील व आता तेलंगाणात स्थायिक झालेले बिडी उद्योजक गोपाल गोरंट्याल यांनी केला आहे, अशी चर्चा आहे.त्यांचे बंधू कैलास गोरंट्याल हे जालना येथे काँग्रेसचे आमदार आहेत. केसीआरच्या सभेला मराठी जनतेचा प्रतिसाद मिळत नाही, असे लक्षात आल्यानंतर आंध्र व तेलगंणा सीमेवरून मोठ्या प्रमाणात लोकांना सभेसाठी आयात केले होते. या सभेत महाराष्ट्रातील मोठे नेते तेलंगणाच्या भारत राष्ट्र समिती या पक्षात नेते प्रवेश करतील, असे सांगितले गेले. पण प्रत्यक्षात जनाधार नसलेल्या काही बोटावर मोजके नेत्यांना प्रवेश देण्याची वेळ आली. "केसीआर'ने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना गुलाबी स्वप्न दाखविले. त्यांनी देशातील नव्हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न निर्माण केला. मग राष्ट्रप्रेमी नेता म्हणणाऱ्या केसीआर तेंव्हा मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबाच्या मदतीला धावून का आले नाहीत. देशाचे शेजारी राष्ट्र कंगाल झाले आहे, तीच तेलंगणा राज्याची आर्थिक अवस्था झाली आहे, त्यांनी हे मात्र लपविले आहे. त्यांनी काँग्रेस व भाजपा सरकारच्या धोरणावर टीका केली. मोदीच्या 'मेक इन इंडिया' या घोषणेला 'जोक इन इंडिया'चा टोमणा मारला आहे. ज्यांनी हैद्राबाद निजाम संस्थान जुलमी राजवटीतून संस्थान मुक्त केले म्हणून 'केसीआर' तेलंगणात सत्तेची फळे चाखत आहेत. त्यांना हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचे नेते स्वामी रामानंद तीर्थ यांचेही स्मरण करावे वाटलेले नाही, हे दुर्देव आहे. महाराष्ट्रातील २८८विधानसभा मतदार संघातर पक्षाच्या समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे सांगितले गेले. तेलंगणा केसीआरच्या महाराष्ट्रातील सभेचा गाजावाजा मोठ्या प्रमाणात केला गेला, पण त्यांचा सभेचा बार फुसका ठरला आहे. देशात तेलगू भाषिकाची संख्या ८ कोटी ११ लाख २७ हजार ७४० एवढी आहे. तर महाराष्ट्रात तेलगू भाषिक ११ लाख असून त्यात दोन लाख वडारी समाज आहेत. या तेलगू भाषिक व भाजपा विरोधी मते आपल्या पक्षाकडे वळविले तर पक्षाला संधी मिळेल, अशी त्यांची रणनीती आहे. तसेच भारत राष्ट्र समिती पक्षाने महाराष्ट्रात २०२४ मध्ये विधानसभेच्या सुमारे दोनशे जागा उमेदवार उभे करण्याच्या तयारीला लागला आहे. पण भाजपा विरोधी आघाडीसाठी देशात प्रयत्न करताना २०१९ मध्ये आंध्र प्रदेशचे चंद्राबाबू नायडू यांची मुख्यमंत्र्यांची खूर्ची गेली व घरी बसण्याची वेळ आली. याचा इतिहास केसीआरने आठवावा! आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी. तेलगू देशमचे चंद्राबाबू नायडू व तेंलगणाचे नेते के. चंद्रशेखर राव हे तिन्ही तेलगू भाषिक नेते असून ते एकमेकाचे राजकीय वैरी आहेत. तरी पण "केसीआर'ने यांनी राष्ट्रीय राजकारणात उडी घेतली आहे. त्यांच्या भारत राष्ट्र पक्षाला महाराष्ट्रातील मतदारांची सहानुभूती मिळणे कठीण आहे. बेडूकाची उडी कुंपणापर्यंत ते राज्यापुरतीच उडी मारू शकतात,त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. देशात लोकशाही, घटना मानणारे प्रादेशिक पक्ष, काँग्रेस पक्षातही घराणेशाही आहे.या विरोधी पक्षाचे नेते मोदी व्देषातून भाजपाला केंद्रातील सत्तेतून घालण्यासाठी आता वाटेल करण्यात तयार आहेत. त्यासाठी विविध कटस्थान रचले जात आहेत. यात त्यासाठी विदेशी राष्ट्रातील कंपन्याच्या अहवालावरून मोदी सरकारला, देशाला बदनाम केले जात आहेत. याचे भान त्यांना राहिलेले नाही. देशात सर्व विरोधी प्रयोग २०१४ व २०१९ मध्ये सर्व विरोधी पक्षांनी आघाडी करून मोदी व भाजपाला पराभूत करण्याचा अटोकाट प्रयत्न केला होता जनतेने अनेक नेत्यांना घरी बसविले तसेच प्रादेशिक पक्षाला राज्यात सत्ता गमवावी लागली. तेंव्हा 'केसीआर' सुध्दा राष्ट्रीय राजकारणात उडी घेवून तोच प्रयोग करू पहात आहेत, त्यांचा हा प्रयोग आत्मघातकी ठरणार आहे. त्यांनी केवळ तेलंगणाची सत्तेची गादी सांभाळता आली तरी बस्स! त्यातच त्याचे भले आहे.



# आनंदाचे दैवी सिद्धांत

आधुनिक केसरी

आनंद ही संकल्पनाच इतकी सुंदर आणि अल्हाददायक आहे ना की आनंद नावातूनच आनंद लहरीच्या संवेदना जाणवतात.

**"आनंदाचे डोही आनंद तरंग"**

या अभंगातून अतिशय तरल शब्दात तुकोबारायांनी अतिशय छान वर्णन करून ठेवलेला आहे. आनंदाच्या भावनेसाठी काही खास तजवीज करावी लागत नाही. आनंद हा निर्भळ असतो. निर्विचार भावनेतून तो प्रकट होतो. विचाराचं रूपांतर आचारनात केलं की आनंदाचा सैलाब येतो. आनंदासाठी खूप सोप्या क्लुप्त्या आहेत. मला आपल्याला आत्मिक आनंद हवा असेल तर ध्यान हा सर्वोत्तम पर्याय आहे. फक्त आपलं आत्मपरीक्षण आणि ध्यानात परमोच्च सुखाचा अनुभव येतो. शांतता आणि निर्विचार भाव खूप आनंद देतो.

आनंदाच्या देवी सिद्धांतात सर्वांसोबत सामोपचाराने वागावे बोलावे त्यामुळे आपल्याला आपल्या सोबतच इतरांना पण आनंदाचे आदान प्रदान होते. माणसाने माणसासाठी माणसासारखे वागावे हे तर नीतीमतेचे तत्व आहे आणि यातून. समाधानाच मिळते म्हणून आपण याचा पाठपुरावा करायला हवा. सामाजिक बांधिलकीचा भाग आणि यातून आपल्या संवेदना जागृत होतात आणि आपण मूल्यधिष्ठित जीवन जगायला पात्र ठरतो.

दैववाद ही मनुष्याला हेच शिकवतो आनंद हा सुखाचा सौख्याचा राजमार्ग आहे. या दग दग आणि धावपळीच्या आयुष्यात आपण सर्वांनी आनंदाच्या दैवी सिद्धांताचा अभ्यास करून आपलं जीवन आनंदी ठेवायला हवे.

**"एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ"**

या म्हणी खूप काही सांगून जातात आनंदाचे द्वार खुले करून जातात आपण एकमेकांना नातेवाईक मित्र अनेक समाजातील घटक यांना समजून आणि सांभाळून घेतले तर एक सामाजिक सामंजस तयार होईल आणि सर्वत्र सलोखा नांदेल आणि आपले नातेसंबंध आणि आपला देश आनंदाच्या दैवी सिद्धांताचा अनुभव घेऊन समृद्ध होईल.

**छाया भोसले, औरंगाबाद.**

# माई सोन्याच्या बांगड्या गहाण ठेवते तेव्हा..!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात माता रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दुःख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दुःखाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दुःखाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दुःख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफडून दगावले. म्हणूनच माईंच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात- रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दुःखाशय होता. ही प्रेरणादायी माहिती श्री. एन. कृष्णकुमार, से.नि.अध्यापक यांच्या शब्दांत.**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब तहानभूक विसरून पुस्तक वाचनात दंग असत. एकदा जेवणाची वेळ झाली असता रमाईंनी त्यांच्यापुढे जेवणाचे ताट ठेवले. साहेबांचे जेवण आटोपले असेल वाटून ताट उचलण्यासाठी त्या खोलीत जरा वेळानेच गेल्या, मात्र ताट तसेच उघडे. न राहून माईंनी त्यातल्या एका पुस्तकाचे पान उघडले आणि म्हणाल्या- या पुस्तकात नवऱ्याने आपल्या बायकोशी कसे वागावे, कुटुंबाशी कसे वागावे हे लिहिले असेल तेवढेच मला वाचून दाखवा. डॉ.बाबासाहेब म्हणतात- अगं वेडे, नवऱ्यानं संसार कसा करायचा, हे काही पुस्तकात लिहिलेल नसतं. विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात माता रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दुःख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दुःखाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दुःखाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दुःख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफडून दगावले. म्हणूनच माईंच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात- रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दुःखाशय होता.



माता रमाई भीमराव आंबेडकर या विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी होत. डॉ.आंबेडकर अनुयायी त्यांना आईची उपमा देत रमाई संबोधतात. माता रमाई आंबेडकर यांचा जन्म दि.७ फेब्रुवारी १८९८ रोजी एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील भिकूजी धुत्रे- वलंगकर व आई रुक्मिणी यांच्यासह रमाई दाभोळजवळील वणदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये राहत. त्यांना ३ बहिणी व एक भाऊ- शंकर अशी चार भावंडे होती. मोठी बहीण दापोलीत दिली होती. भिकूजी दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या बाजारापर्यं पोहचवत असत. त्यांना छातीचा त्रास होता. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे आजारपणाने निधन झाले. आईच्या जाण्याने कोवळ्या रमाईच्या मनावर आघात झाला. धाकटी बहीण गौरा व भाऊ शंकर अजाण होते. काही दिवसात वडील भिकूजी यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपुरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत रहायला गेले. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन घडविण्यात रमाईंचा सिंहाचा वाटा आहे.



रमाई म्हणजे बाबासाहेबांची सावलीच होती. त्यांनी आपले जीवन बाबासाहेबांच्या कार्यांप्रती समर्पित केले नसते तर बाबासाहेबांना शून्यातून जग निर्माण करता आले नसते, हे नाकारता येत नाही. मुंबईतील भायखळा मार्केटमधील मासळी बाजार येथे बुधवार दि.४ एप्रिल १९०६ रोजी त्यांचे भीमरावांसोबत लग्न झाले. त्यांच्या जीवनाच्या अनेक हृदयदायक घटना सांगता येतील. एका प्रसंगी बाबासाहेबांच्या सत्कार समारंभात माईंना नेसायला लुगडे नव्हते. तेव्हा त्यांनी बाबासाहेबांचा फेटा लुगडे म्हणून घातला. गरिबीची केवढी मोठी शोकांतिका! पण रमाईंच्या त्यागामुळे आज देशातील लाखो महिलांचे जीवनच बदलून गेले आहे. माई संसारात रमल्या, परंतु भीमराव पुस्तकांत रमले.

डॉ.बाबासाहेब व माता रमाई राजगृहात राहत असताना बाबासाहेबांना अचानक विदेशात जावे लागत होते. बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे या आपल्या मित्राकडे काही दिवसासाठी माईंना पाठविले. वराळे काका लहान मुलांचे वसतिगृह चालवित होते. त्यांच्या आवारात लहान मुले नेहमी खेळायला येत असत. दोन-चार दिवसांत माईंना त्या लहान मुलांचा लळा लागला. दोन दिवस झाले मुले आवारात दिसली नाहीत, म्हणून माईंनी काकांना विचारले. काका म्हणाले की मुले तीन दिवसांपासून उपाशी आहेत. वसतिगृहाला अन्नधान्यासाठी मिळणारे अनुदान अजून मिळालेले नाही. हे सांगताना वराळे काकाचा कंठ दाटून आला. तत्क्षणी रमाईने कपाटातील डब्यातील सोन्याच्या बांगड्या वराळे काकांना दिल्या आणि म्हणाल्या, या बांगड्या विका किंवा गहाण ठेवा, पण मुलांच्या जेवणाची त्वरित सोय करा. यावर बाबासाहेब काय म्हणतील याचा त्यांनी क्षणभरही विचार केला नाही. सोन्याच्या मूल्यापेक्षा त्यांच्या मनातील मुलांप्रती करुणा मौल्यवान ठरली. अशिक्षित असूनही बाबासाहेबांच्या कर्तृत्वाला साजेशी व स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता माईंत होती. कष्ट, त्याग, संघर्ष, मातृत्व, प्रेम हे सर्व गुण त्यांच्यात असल्यामुळे बाबासाहेबांचे त्यांच्यावर निस्सीम प्रेम होते. माईंच्या त्यागाविषयी डॉ.बाबासाहेब बहिष्कृत भारतमध्ये लिहितात- आपण परदेशी असताना रात्रंदिवस जिने प्रपंचाची काळजी वाहिली व जिला ती अजूनही करावी लागत आहे. मी स्वदेशी परत आल्यावर माझ्या विपन्नावस्थेत गवताचे भारे स्वतःच्या डोक्यावर वाहण्यातही जिने मागेपुढे पाहिले नाही, अशा अत्यंत ममताळू, सुशील व पूज्य स्त्रीच्या सहवासात दिवसाच्या चोवीस तासातून अर्धा तासही मला घालविता येत नाही. बाबासाहेबांनी व्यक्त केलेली ही खंत मन हेलावून टाकते. सन १९४०मध्ये लिहिलेला थॉट्स ऑन पाकिस्तान हा ग्रंथ बाबासाहेबांनी माईंना अर्पण केला आहे. अर्पणपत्रिकेत ते लिहितात- हृदयाचा चांगुलपणा, मनाचा मोठेपणा, चारित्र्याचे शुद्धत्व आणि याशिवाय त्याकाळी कोणी मित्र नसलेल्या दिवसात आमच्या वाट्यास आलेले दारिद्र्य आणि विवंचना मनोधैर्याने व तत्परतेने सहन करण्याची जिने तयारी दर्शाविली त्या रामूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा ग्रंथ मी तिला अर्पण केला आहे.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांच्या जीवनात अत्यंत कठीण काळात रमाईने त्यांना खंबीरपणे साथ दिल्यामुळेच अस्पृश्यांचे कैवारी डॉ.बाबासाहेबांना आपल्या कोट्यवधी अस्पृश्य बांधवांचे जीवन फुलविता आले. दि.२७ मे १९३५ रोजी जगन्माता रमाईंचे मुंबई येथे दुःखद निर्वाण झाले.

!! माता रमाई जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या अपूर्व त्यागाला विनम्र अभिवादन !!

# रमाई बाबासाहेबांची प्रेरणा



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठीमागे एका कर्तृत्ववान स्त्रीचा हात असतो. हे आजच्या जगातच नव्हे तर फार वर्षांपूर्वीच्या स्त्रीच्या कर्तृत्ववान पराक्रमातील इतिहासातच आपल्याला सांगितलेले आहे.स्त्रीचं कर्तृत्व, स्त्रीची महती ही पुरुषांच्या साथीला साथ देऊन तेच जगासमोर आदर्श म्हणून ठरलं जातं.स्त्रीची वानवा, स्त्रीच्या कर्तृत्वाची झलक प्रत्येक जण स्त्री जातीला आदर्श मानणारा आपापल्यापरीने लेखणीतून, कवितातून, पुस्तकांतून विविध वर्तमानपत्रातील लेखांच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न केला जातो. रमाई ही डॉ.बाबासाहेबांची पत्नी होत. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा सुद्धा अभ्यास करणे गरजेचे आहे.**

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकरां सारखा महामानव आपल्या भारत देशात घडला. आपल्या देशातील पीडित शोषित वंचित घटकाला न्याय मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बाबासाहेबांच्या हातून घडले. बाबासाहेबांच्या ज्ञानाच्या बुद्धीवर भारतीय राज्य घटनेचा उदय झाला.सामाजिक परिवर्तनाची लढाई लढत असताना बाबासाहेबांना सुद्धा त्यांचा घर परिवार होता.



रमाईने बाबासाहेबांच्या संसाराला फुलविण्याचे काम केले. महापुरुषांच्या जीवनाबरोबर पत्नी म्हणून जीवन जगत असताना तिला संसारात अनेक अडचणींचा सामना करावा लागला.परंतु बाबासाहेबांचे शिक्षण आणि त्यांच्या कार्यात त्या कधीही अडथळा बनलेल्या नाहीत.त्यांनी स्वतःच्या अडचणीस बाजुला ठेवून संसार त्यांनी चालविला. शेनी गौऱ्या थापून त्या विकून त्यातून घर चालविणाऱ्या रमाई ह्या समस्त स्त्री जातीच्या दृष्टीने प्रेरकच आहेत.संसार कसा चालववा. हे उत्तम उदाहरण म्हणून रमाई कडे पाहिले जाते.जे जीवन आजची स्त्री जगू शकत तेच जीवन माता रमाबाई आंबेडकर यांनी त्यांच्या जीवनात अतिशय कष्ट घेत दुःखालाच सुख मानून बाबासाहेबांच्या साथीने जगल्या. गरिबी, दारिद्र्यात रमाईने बाबासाहेबांना मोलाची साथ दिली.'सामाजिक परिवर्तन' हे एकमेव ध्येय उराशी बाळगून असलेल्या 'बाबासाहेबांच्या साथीला त्यांची पत्नी रमाई खंबीरपणे उभी होती.समाजासाठी शिक्षण घेण्याची बाबासाहेबांची तळमळ आणि त्यात गरिबी, दारिद्र्य असूनसुद्धा हे सर्व पाहून रमाईने कधीही संसारात स्वतःचे हट्ट पुरविण्याचे गाऱ्हाणे मांडले नाही. एखादी सामान्य व्यक्ती ज्यावेळी लोकांसाठी महान बनत जाते, त्यावेळी नक्कीच त्या व्यक्तींबरोबर एका स्त्रीचाही गौरव केला जातो. मग ती त्या महान व्यक्तीची आई किंवा आयुष्याची जोडीदारीण म्हणून पत्नीही असू शकते.डॉ.बाबासाहेबांच्या कार्यात रमाईचा मोलाचा वाटा दिसून येतो.त्या नसत्या तर कदाचित बाबासाहेब घडले असते की नाही असे म्हणावे लागले असते.रमाईच्या साथीने बाबासाहेब विदेशात जाऊन शिक्षण घेऊन आले.त्यामुळे रमाईच्या साथीचे खूप योगदान आहे.

महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी मावळ्यांच्या साथीने मिळविलेल्या स्वराज्याला माँ जिजाऊंकडून छत्रपती शिवाजी महाराज यांना प्रेरणा मिळाली.लहानपणापासून शिकविलेल्या शौर्यगाथांपासून ते स्वराज्याच्या गादीवर बसल्यानंतरची संकटे झेलण्याची हिम्मत एका स्त्रीने म्हणजे माँ जिजाऊंनी दिली. अहिल्याबाई होळकर यांनी पतीच्या निधनानंतर राज्याची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली होती.आजच्या काळात प्रत्येक स्त्री स्वतः समाजात मानसन्मानानं वागत असताना तिचे प्रत्येक पाऊल हे प्रगतीच्या दिशेने पडताना दिसत आहे. काही विकृत नजरांना पावलो पावली उत्तर देण्याची धमक स्त्रीमध्ये निर्माण झाली आहे. कारण पूर्वीच्या स्त्रियांसाठी चांगलं कार्य करणाऱ्या पुरुषत्वाच्या साथीला कर्तृत्ववान साथ समजलेली स्त्रीचा मदतीचा हात मिळत गेला होता. महात्मा जोतीराव फुले यांच्या जोडीला सावित्रीबाई, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जोडीला लक्ष्मीबाई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जोडीला रमाबाई होत्या, म्हणून एका स्त्रीच्या कर्तृत्वाने सर्व मुलींपर्यंत तसेच अस्पृश्य वर्गापर्यंत हळूहळू १८४८ पासून टप्प्याटप्प्याने शिक्षणाची गंगा पोहचत गेली. प्रत्येक स्त्री तसेच अस्पृश्य वर्ग हा शिक्षणाच्या प्रवाहात आल्याने त्यांची प्रगती होऊ लागली.ताठ मानेने जगण्याची मुभा शिक्षणामुळे मिळू लागली. शिक्षण म्हणजेच एकप्रकारे प्रगती करण्याचा एकमेव मार्ग हा स्त्री जातीच्या सहकार्यातून पुरुष जातीला मिळू लागला. म्हणून हे एक स्त्री म्हणून माता रमाई च्या कार्यची सुद्धा आपल्याला दखल घ्यावी लागेल.बाबासाहेबांचा इतिहास हा रमाई शिवाय पूर्ण होऊच शकत नाही. समता प्रस्थापित करण्यासाठी इथल्या माणसा साठी लढला गेलेला लढा हा ऐतिहासिक क्रांति घडविण्यासाठी बाबासाहेबानी प्रयत्न केले.ही क्रांति घडवून आणण्याचा रमाईचा हातभार खूप महत्वाचा आहे.म्हणूनच इथल्या स्त्रीयांना रमाई सुद्धा समजने गरजेचे आहे.जी रमाई समजून घेईल तिला जीवन काय असते याची जाणीव होईल.

७ फेब्रुवारी १८९७ रोजी वणंद, ता.दापोली, जि. रत्नागिरी येथे वडील भिकू धोत्रे आणि आई रुक्मिणी धोत्रे यांच्या पोटी जन्माला आलेली रमाई बाबासाहेबांच्या जीवनात लग्न होऊन आली ती त्यांच्यासाठी, समाजासाठी प्रकाशज्योतीची प्रकाश देणारी वातच बनली. आपले साहेब आपल्या समाजासाठी समाज परिवर्तनाचे कार्य करीत आहेत. याची जाणीव रमाईना झाली होती. समाजाबद्दलची जेवढी तळमळ बाबासाहेबांच्या डोळ्यात होती. तेवढीच तळमळ रमाईच्या डोळ्यात दिसत होती. समाजासाठी झटणारे बाबासाहेब संसारात दुर्लक्षित होत असताना रमाईने संसाराचा गाडा स्वतः 'चालविला. रमाईच्या पाच अपत्यांपैकी चार अपत्ये दगावली असतानासुद्धा अनेक संकटे झेलत होती. खूप त्रास रमाईने जीवनात समाजासाठी सहन केला. शेणी, गोवऱ्या थापून संसाराचा गाडा चालविणाऱ्या रमाईप्रती प्रत्येक महिलेने स्वतःमध्ये आदर्श निर्माण करावा.

बाबासाहेबांनी रमाई लिहिता वाचता ही शिकविले. ज्या महात्मा फुले यांनी सावित्रीबाई फुले याना शिकविले त्यांच्या कार्याबद्दल ही बाबासाहेब रमाईस सांगत असत. सावित्रीबाई फुले यांनी ज्या पद्धतीने महात्मा फुले यांना मोलाची साथ दिली. अशीच साथ रमाईने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना दिला. समाजाला गुलामगिरीच्या चिखलातून बाहेर काढण्यासाठी बाबासाहेब अहोरात्र झटत असताना मी माझ्या रामू साठी काहीच करू शकलो नाही, असे बाबासाहेब म्हणयाचे परंतु रमाई न कधीच तक्रार केली नाही. तुम्ही समाजासाठी काम करा. समाजाला न्याय मिळवून द्या. हीच भूमिका रमाईची असायची. अपत्य दगावून सुद्धा स्वतःच्या संसारात सर्व हाल अपेष्टा सहन करत समाजाच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या बाबासाहेबांसाठी रमाई ने दिलेली साथच आज शोषित वंचित पीडित घटकांच्या आयुष्यात चांगल्या जीवनाचा प्रकाश आणणारी ठरली आहे. रमाईने स्वतःच्या आयुश्यात, संसारात खूप मोठा त्याग केलेला आहे. आजच्या काळात असा त्याग आजच्या स्त्रियांना सुद्धा जमणार नाही. रमाई ही खऱ्या अर्थाने त्याग मूर्ती असून आजच्या महिलांनी रमाईचे चरित्र समजून घेऊन आदर्श घेतला पाहिजे.

# मानवतेची आई : रमाई



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**रमाई भिमराव आंबेडकर हे फक्त नाव नाही माणवता, संघर्ष, संसाराची तडजोड, समजदार पणा व कर्तव्यांची जाणीव असलेली वैचारिक खान म्हणजे रमाई. शिक्षणाने अडाणी आणि पैशाने गरिब असलेल्या या मानवतावादी आईने सर्वोत्तम विद्वान असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आणि आजही समाजाला खुप काही शिकवले आहे. रमाईचा संघर्ष, संकटातून सावरण्याचे मानसिक सामर्थ्य हे सर्व सामान्य महिलेला जमने शक्यच नसताना रमाई ने त्याचा अनुभव पावलो पावली घेतला.**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची पत्नी म्हणून रमाईला तर महत्व आहेच परंतु रमाईचा त्याग आणि कतृत्व बघितले तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून माणसिक बळ देण्याचे महत्वपूर्ण रमाई ने केले म्हणून रमाई अजून जास्त वंदनीय आहेत.

रमाई समजून घेताना प्रत्येकांचे डोळे पानावले जातात कारण जन्मापासून तर मृत्यूपर्यंत रमाईने केला तो फक्त संघर्ष आणि त्याग. आणि हा संघर्ष आणि त्याग स्वहीत साधण्यासाठी, स्वतः साठी बंगले बांधुन महागड्या गाडी मध्ये मेकअप करून फिरण्यासाठी तर मुळीच नव्हता. आज आपण समाजामध्ये बघतो तर दोन पैसे कमवणारा माणूस असला तर बायको वेगळ्याच तोऱ्यात राहते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे तर सर्वश्रेष्ठ विद्वान होते रमाईने तर किती तोऱ्यात रहायला पाहिजे होतं परंतु रमाई ने आपल्या पुर्ण इच्छा मारून समाजाच्या उत्थानासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना साथ दिली. समाजासाठी रमाईचा त्याग काय आहे याची कल्पना देखील करू शकत नाही. कारण स्वतः चे तिन मुलं एक मुलगी रमाईने गमावली. लहानपणापासून आई वडील भावंडे यांचे मृत्यू बघुन रमाई चे मन मेलेच होते परंतु लग्नानंतर पोटचे मुलं, वडीलांसारखे माया लावणारे सासरे, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे भाऊ आनंदराज यांच्या मृत्यू देखील रमाई ने पाहीला. बाबासाहेब परदेशात शिक्षण घेत आहेत त्यांना शिक्षणात कोणत्याही प्रकारचा व्यत्यय येऊ नये म्हणून रमाईचा मुलगा वारतो रमाई स्वतः त्याचा अत्यंविधी करतात, दुखाचे अश्रू पिऊन स्वतःलाच समजवतात परंतु बाबासाहेब आंबेडकर यांना याची कल्पनाही देत नाहीत. केवढे मन असेल या आईचे. आपण मुलाला साधा ताप आला तर सर्व कामे सोडून अगोदर मुलाच्या दवाखान्याच बघतो. परंतु रमाईने मुल गेले तरी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना व्यत्यय आणला नाही म्हणून आज रमाईच्या संघर्षामुळे करोडो मुलं सुरक्षित आहेत हा त्याग रमाईचा आहे आणि याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. लग्नानंतर गौऱ्या थापुन त्या विकुन, एकाच लुगड्यावर राहून मिळालेला पैसा डॉक्टर बाबासाहेब यांना शिक्षणासाठी कामी येईल म्हणून पै पै जमा करून बाबासाहेब आंबेडकर यांना हातभार लावणारी रमाई खऱ्या अर्थाने संसाराची जाणीव असणारी सर्व श्रेष्ठ स्त्रि ठरली.

लग्नानंतर सुरवातीच्या काळात रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची परिस्थिती हलाखीची होती परंतु नंतरच्या काळात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे प्राध्यापक म्हणून रूजू झाले आणि दरमहा साडेचारशे रुपये पगार घरात येऊ लागला. थोडा विचार करा शंभर वर्षा अगोदर साडेचारशे रुपये पगार, जगातील विद्वान माणसाच्या बायकोने कसे रहायला पाहिजे. परंतु आलेला पगार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व रमाई यांनी स्वतः च्या संसारावर खर्च न करता तोच पैसा समाजावर खर्च केला. आणि पुन्हा आपल्य ईच्छा मारल्या. आणि समाजाला जगवण्यासाठी सामाजिक उपाययोजना करण्यासाठी रमाई ने बाबासाहेब आंबेडकर यांना साथ सहयोग केला. पुढे बाबासाहेब मुंबई प्रांताचे आमदार सुद्धां झाले. विचार करा डॉ बाबासाहेब आंबेडकर हे शंभर वर्षाअगोदर आमदार होते, ख्यातनाम वकील व बुद्धीवान प्राध्यापक होते. आता तर त्यांना वैयक्तिक काही अडचण नव्हती. वैयक्तिक संसार करायचा तर अगदी थाटामाटात केला असता परंतु रमाईने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आमदार झाले तरीही कोणत्याही मोहात पडल्या नाही अथवा बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजावरून लक्ष विचलित होईल असे काहीही केले नाही. नाही संसार करताना कोणत्याही गोष्टीचा हट्ट केला नाही, ना दागिने ना कपडे याचा मोह केला नाही. केला तो फक्त नवऱ्यावर विश्वास. दिली ती नवऱ्याला साथ. म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे समाजासाठी खुप काही करू शकले. रमाईच्या मनात थोडा जरी पैशाचा गर्व, पदाचा अंहकार आला असता तर कदाचित डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक चळवळीमध्ये कमी पडले असते. परंतु रमाईच्या संघर्ष व त्यागापुढे डॉक्टर बाबासाहेब हे सुद्धां नतमस्तक झाले होते. कारण बाबासाहेब आंबेडकर



यांचे कोणतेही काम रमाईच्या संघर्षाशिवाय पुर्णच होऊ शकले नसते. एका आमदाराची बायको म्हणून नव्हे तर दबलेल्या, दुर्लक्षित असलेला घटक म्हणून रमाई जगली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना नोकरी लागल्या नंतर रमाई व बाबासाहेब यांना वैयक्तिक कोणत्याही प्रकारची अडचण नसताना रमाई ने समाजासाठी संपूर्ण आयुष्य अडचणी मध्ये काढणे म्हणजे केवढा त्याग आणि समर्पण म्हणावे लागेल. रमाईच्या त्याग संघर्ष आणि समर्पणातुन बरेच काही शिकण्यासारखे आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे स्त्रि चा हात असतो याचे जागतिक उदाहरण म्हणजे फक्त रमाई आहे. आर्थिक आवक येत असताना ही अर्थला अर्थ न देता निद्रावस्थेत असलेल्या समाजाला जागे करण्यासाठी, विषमतेवर आधारित व्यवस्था उलथून टाकून समतावादी व्यवस्था निर्माण करण्यासाठी, कोणतेही हक्क अधिकार नसलेल्या समाजाला हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी रमाई ने बाबासाहेब आंबेडकर यांचे मानसिक खच्चीकरण कधीच केले नाही. म्हणून रमाई एक आदर्श पत्नी, आणि करोडो लोकांची आदर्श आई रमाईला होता आले. संघर्ष व त्यागाचे काय फलीत मिळाले तर आयुष्य भर दहा बाय दहाच्या घरात फाटक्या लुगड्यात दिवस काढणारी रमाई आज करोडो लोकांच्या बंगल्यात आहे. दागिण्याची हाव न केलेली रमाई आज करोडो महिलांच्या ताईत आहे. खऱ्या अर्थाने कर्माचे तेच फळ आहे. रमाईचे आयुष्य फक्त छत्तीस सदुतीस वर्षाचे परंतु वर्षानुवर्षे रमाईचा त्याग, समर्पण, बाबासाहेब आंबेडकर यांना दिलेला साथ सहयोग हा आपण विसरू शकत नाही. रमाईचा संघर्ष डोळे पानावरा जरी असेल तरी आज आपल्याला फक्त डोळे ओले करून चालणार नाही. इच्छा मारून, मुलांना गाडून, दागदागीन्याची अपेक्षा न करता समाजाच्या न्याय हक्कासाठी रमाई ने बाबासाहेब आंबेडकर यांना साथ दिली म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजाला न्याय हक्क अधिकार व स्वातंत्र्य देऊ शकले. परंतु आज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले सर्व काही धोक्यात आहे. म्हणून रमाई जयंती साजरी करताना फक्त रडून फायदा नाही तर रमाईच्या त्याग व संघर्षातून मिळालेल्या गोष्टी वाचण्यासाठी आपल्याला एकत्र येऊन लढावे लागेल. तरच रमाईची जयंती साजरी करून रमाईला नतमस्तक होण्याचे सार्थक होईल.

# संस्कारवल्ली रमाई



भिमराव परघरमोल
मो.नं. 9604056104

आधुनिक केसरी

**ऐतिहासिक महापुरुष आणि महानायकांच्या जीवन विश्लेषणांती किंवा अभ्यासांती कळते की, 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात'. ही म्हण त्यांच्या त्यागी, कष्टी, समर्पित तथा परोपकारी जीवनाला तंतोतंत लागू पडते. तशीच आमची कोटयानुकोटींची आई रमाई. जी संस्कारवल्ली होती. रमाई केवळ व्यक्ती, पात्र किंवा स्त्री नव्हती, तर ती संस्काराचे महाकाव्य होती, सूर्याची सावली, करूणा, त्याग आणि मानवतेचा महासागर,, मातृत्वाची मातृत्वमनाची काळीजकथा, संपूर्ण जीवनाचा दुःखाशय, दुःख म्हणजे जीवन. अशी ती दुःखमय जीवनाची अंतहीन ओवी होती. अशा त्या दुःखाच्या अंतहीन ओवीने कवी, लेखक, साहित्यिक, अभ्यासकांसह मानवी जीवनाला झपाटलं नसेल तर नवलच!**

रमाईचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ ला दाभोळ जवळील वनंदगावात झाला. अस्पृश्यांच्या पाच-पन्नास घरांमध्ये संस्काराची वाणवा नसणारं घर म्हणजे भिकुजी धुत्रे यांचं. वयाच्या आठव्या-नवव्या वर्षीच मुलीचं लग्न व्हावं अशी तात्कालीन प्रथा आणि परंपरा. अल्पवयीन रमाच्या समजूतदार व्यक्तिमत्त्वामध्ये शहाणपण ठासून ठासून भरलेलं होतं. तरीही आई रखमाबाई रमाच्या जीवनात सुखी संसारासह परोपकार कसा करावा यांच्या संस्कारांचं सिंचन करतच होती. त्यामुळे तिचे व्यक्तिमत्व सहनशीलता, त्याग, समर्पण, स्वाभिमान, कष्टाळू वृत्ती, दुसऱ्याचा मानसन्मान करणे, कोणाचाही अपमान न करणे, प्रत्येकाच्या सुखदुःखात सहभागी होणे, या नैतिक मूल्यांनी ओसंडून वाहत होतं.

अशातच विदुल्लतेचा आगडोंब कोसळून संपूर्ण जीवन भस्मसात व्हावं असा आईच्या मृत्यूचा पहिला दुःखरुपी कडेलोट रमाईच्या जीवनात झाला. जीवन एकदम सैरभैर झालं. तरीही त्यामधून सावरत ती स्वतःच वडिलांसह दोन लहान भावंडांची आई झाली. त्या दुःख ज्वालांनी होरपडून होणाऱ्या जखमा भरून निघत नाही तोच वडिलांनीही इहलोकीचा निरोप घेऊन अनाथपणाच दुर्दैवी जीवन पदरी आलं. तो जखमी काळजावर दुसरा असह्य आघात होता. तेव्हा मात्र रामाचं आकाशच फाटलं. अनावर दुःखामुळे अश्रुनीही पाठ फिरवली. काळीज स्थिजलं. आईच्या मृत्यूसमयी दगडालाही पाझर फुटावा असा टोह फोडणारी रमा आज गप्प का? असा प्रश्न प्रत्येकाला पडला होता. तिने रडावं. रडून मन मोकळं करावं. असं प्रत्येकाला वाटत होतं. तसे प्रयत्न सुरु असताना सहा सात वर्षांचा लहानगा जीव फक्त एवढंच बोलून मोकळा होतो की, "लहानपणीच कुणाचेही आई-वडील मरू नये". आणि ती दोन्ही हाताने आपला चेहरा झाकून घेते.

भविष्याने पुढ्यात काय वाढवून ठेवलं होतं? याची कोणालाही कल्पना नसून काहीही सांगता येत नव्हतं. वडिलांच्या अंत्यसंस्कारासाठी आलेल्या काका मामांनी या अनाथाचे नाथ होण्याचा विडा उचलला. म्हणून तीनही भावंड मुंबईला रवाना झाली. तिथेच मग दहा वर्षांच्या रमाचं समाजातील सर्वात जास्त शिकलेल्या दहावीत असणाऱ्या भीमरावांसोबत लग्न झालं. कुठेतरी थोड्या दिवसांसाठी का होईना, परंतु नशिबाने कुस बदलली. सुरुवातीचे दिवस आनंदात गेले रमाने भिमारावाच्या घराला घरपण बहाल केलं. आईच्या संस्कारामुळे ती सर्वांच्या मनावर अधिराज्य करू लागली. त्यामुळे रमा कुटुंबातील प्रत्येकाच्या काळजाचा ताईत, जीव की प्राण झाली. घरात सतत रमाच नाव उच्चारलं जात होतं. तिच्याशिवाय घराचं पानही हलत नव्हतं. ती अडाणी जरूर होती, परंतु सात्विक आणि सुसंस्कृत होती. तिचं स्वतःचं सुख म्हणून असं काहीच नव्हतं. घरातील प्रत्येकाचं सुखच तिनं आपलं म्हणून मान्य केलं होतं.

लग्नानंतर एक दिवस रमानं शिकवं, लिहितं-वाचतं व्हावं, असा विचार भीमरावांना शिवला. त्यांनी तशी साद घातली. परंतु रमा म्हणाली, "आपण एवढं मोठं शिकता, लिहिता, वाचता हे काय कमी आहे? मी कशाला? तेव्हा ते महात्मा ज्योतिराव फुले यांचा दाखला देताना म्हणतात की, "अगदी दहा-वीस वर्षांपूर्वी एका महान व्यक्तीने आपल्या पत्नीला शिकवलं सुशिक्षित, सुसंस्कारित, शिक्षिका, मुख्याध्यापिका, लेखिका केलं. तेच आपले कुलपुरुष आहेत. त्यांचाच आदर्शआपण घ्यावा. हे ऐकून रमाने होकार दर्शविला.

सन १९१२ ला जेव्हा रमा-भिमरावांना पुत्रप्राप्ति होऊन दोघांचेही व्यक्तिमत्व पूर्णत्व साधते, तेव्हा बाळाची वेगवेगळी नावं समोर येतात. पुन्हा बाबासाहेब ज्योतिराव फुलेंचा दाखला देऊन म्हणतात, "आपण आपल्या बाळाचे नाव यशवंत ठेवूया, कारण त्यांनी आपल्या दत्तक पुत्राचे नाव यशवंत ठेवलं होतं". त्यावर दोघांचेही एक मत होते.

सन १९१३ ला जेंव्हा भिमराव शिक्षणासाठी विदेशी जातात, तेव्हापासून इकडे रमाईच्या संसाराला कोणाची तरी नजर लागल्यागत मरणांची झडी लागते. तिचा सासरा, भासरा, मुलगा, मुलगी, मीरा आत्या असे अनेक मरण ती उघड्या डोळ्यांनी पाहते. त्यामुळे ती खंगून आणि खचून जाते. नशीब जणू काही तिची परीक्षाच पाहत होतं. तिला हरवू पाहत होतं. परंतु ती हरत नव्हती.

सन १९१७ ला बाबासाहेब विदेशातून परत आल्यानंतर त्यांना सीडनहॅम कॉलेजमध्ये ४५० रुपये पगाराची नोकरी मिळते. जी दोनच वर्षासाठी असते. पुन्हा शिक्षणासाठी विदेशी जायचं म्हणून काटकसरी जीवन जगावं असा त्यांचा सक्त आदेश होता. त्यामुळे रमाई कधीकधी वैतागून जायची. यशवंताचं संधीवाताचं दुखणं, नवऱ्याचं संसारात लक्ष नाही. त्यामुळे त्यांना वाईट वाटत होतं. रमाईची कधीकधी खूप चिडचिड होई. ती संतापून बोलायची. बाबासाहेब मात्र हसण्यावर न्यायचे. प्रत्यक्ष जेव्हा विदेशी जाण्याची तयारी झाली तेव्हा मात्र दोघांमध्ये कडाक्याचं भांडण झालं. पण शेवटी रमाईनेच माघार घेतली. तिने विचार केला आपला नवरा म्हणजे विद्युतप्रवाह. एक वादळ. तो महासुर्य होऊ पाहतो. त्यामुळे त्यांला संसाराला जुंपू नये. त्या वादळाला थांबवू नये. तुफनाच्या पायात संसाराची बेडी टाकू नये. आता आपण त्या वादळासोबत वाहत जायचं, ते कुठेही नेवो, आपल्याला कितीही कष्ट पडोत, आता जगायचं फक्त सूर्याची सावली होण्यासाठी. त्यानंतर मात्र रमाईने त्यांना कधीच अटकाव करण्याचा किंवा थांबवण्याचा साधा प्रयत्नही केला नाही. संसाराची सुखदुःख, उनी-दुनी, दुखणे-खुपणे, टंचाई कधीच त्यांनी बाबासाहेबांच्या कानावर घातली नाही.

रमाईमध्ये सोशिक आणि स्वाभिमानी वृत्ती लहानपणापासूनच विकसित झालेली होती. ती लहान असताना तिच्या शेजारची एक बाई आजारी होती. जेवण तयार करून खाण्याइतपतही तिच्यात त्राण नव्हता. लहानगी रमा तिच्या घरी जाऊन डाळ-भात शिजवून तिला खाऊ घालते. ती तृप्त झाल्यावर रमाला भल्याआयुष्याच्या खुप साऱ्या आशीर्वादांसह एक ढबु पैसाही देते. परंतु तो पैसा आईच्या नजरेतून सुटत नाही. आईला समजल्यावर ती खूप रागावते आणि म्हणते, "कुणाला मदत करणं अतिशय चांगला आहे. परंतु त्याचा मोबदला घेणं अतिशय वाईट. त्यामुळे उपकाराचे मूल्य संपून जाते. त्याला अर्थ उरत नाही." रमा लगेच तो पैसा त्या शेजारणीला परत करून येते. हे आईचे संस्कारमूल्य ती आयुष्याच्या अखेरपर्यंत जोपसते. बाबासाहेब जेव्हा चार-चार वर्षांसाठी दोन वेळा विदेशात शिक्षणासाठी गेले होते, तेव्हा रमाईला अतिशय हलाखीचे, दुःखी, कष्टी, दारिद्र्यपूर्ण दिवस व्यतीत करावे लागले होते, कारण घरात कमावणारा कोणीच नसतो. घराचा आधारवड ज्यांच्या पेन्शनवर घर चालायचं ते म्हणजे बाबासाहेबांचे वडील आणि दुसरा घराचा हातभार म्हणजे मोठा भाऊ आनंदराव हासुद्धा बवासीरमुळे मरण पावलेला होता. त्यावेळी रमाईच्या होणाऱ्या हाल-अपेष्टा काळीज पीळवटून टाकणाऱ्या होत्या. ती एका बॅरिस्टर ची पत्नी सरपण गोळा करण्यासाठी मैलोंमैल फिरते. मोलमजुरी करण्यासाठी जाते. शेन गोळा करून त्याच्या गोवऱ्या थापून त्या विकते. एवढं करूनही पोटाने पोटभर अन्न मिळत नाही. कधी भिजलेली उडदाची डाळ खावी व पाणी पिऊन झोपून जावं. कधी एका सांजेला जेवावं. कधी अर्धपोटी राहावं तर कधी न जेवता ही झोपावं. रमाई बाजरीच्या चार भाकरी करायची. यशवंत, मुकुंदा आणि शंकर यांना प्रत्येकी एक आणि शेवटची चौथी लक्ष्मी, गौरा आणि स्वतः खायची. भाकरी सोबत भाजी असेलच असे नाही. बऱ्याच वेळा कांदा, मीठ, चटणी यावरच भागवलं जायचं. हे जेव्हा बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांच्या लक्षात आलं तेव्हा सर्वांनी मिळून रमाईच्या संसाराला काही हातभार लावावा म्हणून थोडे पैसे गोळा केले. परंतु त्या सर्व कार्यकर्त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानून रमाईने ते आदरपूर्वक नाकारून पुन्हा आपला स्वाभिमानी बाणा सिद्ध केला.



त्यावेळी शेजारपाजारच्या काही महिलाही रमाईला टोमणे मारत असत. एवढी मोठी बॅरिस्टरची बायको परंतु अंगावर गूंजभर सोनंही नाही. कामावर जावं लागते. सरपण गोळा करावं लागते. गोवऱ्या थापून बिचारी संसार चालवते. काय करावे एवढ्या शिक्षणाचं? रमाई त्यांच्या बोलण्याला कधीही प्रत्युत्तर देत नाहीत. उलट बाबासाहेबांना हे सर्व लिहून पाठवतात. प्रतिउत्तरात बाबासाहेब म्हणतात की, "रामू कुणालाही मिळाला नसेल असा दागिना तुला मिळेल. कदाचित तूच कोट्यावधी लोकांच्या गळ्यातील दागिना होशील. दुःख आणि कष्टानेच जीवन उजळून निघते. तेच आपल्याला मोठं करतात. त्यांचे आपण आभार मानले पाहिजे." पत्र लिहिताना साहेबांच्या आणि वाचताना रमाईच्या डोळ्यांना महापूर आलेले असतात.

रमाईच्या दुःखी, कष्टी, त्यागी, समर्पित जीवनाची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मनोमन जाणीव असते. म्हणूनच ते जेव्हा पहिल्या गोलमेज परिषदेसाठी लंडन येथे जातात तेव्हा तिथून रमाईला ३० डिसेंबर १९३० ला प्रदीर्घ असं पत्र लिहून भरल्या डोळ्यांनी म्हणतात.

रमा तू नसतीस तर?.......

# व्यसन हा एक अपघातच जो आपण टाळू शकतो



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**वरवर मलमपट्टी करण हा मानवी स्वभाव आहे  कोणत्याही विषयात कायमचा उपाय करण्या संदर्भात आपण थोडे आत्म जागृत नसल्याने कमी पडतो. कमी पडल्याने मग वेगवेगळ्या प्रभावात येऊन व्यसनाच्या आहारी जातो हे चक्र थांबल पाहिजे. प्रवास आणि जीवन म्हटलं कि अपघात आलाच अपघातात शिवाय जीवन पुर्ण होत नाही. प्रवास आणि जीवन या मध्ये होणारा अपघात आपल्या सतर्कतेने आपल्याला टाळता आलाच पाहिजे. त्यासाठी आपली संगती, ज्ञान, आजुबाजुचा परिसर दैनंदिन आचर विचार आहार या बाबींचा आपल्या निर्व्यसनी अथवा व्यसनी होण्यासाठी मुख्य प्रभाव असतो. तरी पण वातावरण कसही असल व आपलं स्वतःवर मजबूत नियंत्रण असेलतर कोणाताही प्रभाव निष्क्रिय ठरतो.**

जीवनातील असो अथवा प्रवासातील कोणताही अपघात बहुधा टाळता येऊ शकतो.जीवन मार्गावर आणि प्रवासाच्या मार्गावर काही पथ्य असतात हि पाळावीच लागतात जर हि पथ्य व्यवस्थित पाळली गेली तर मग रस्त्यावरील आणि जीवनातील अपघात हे बर्याच अंशी टाळता येतात. प्रवास आणि मानवी जीवन हे जवळपास सारखंच असतं कधी कोणता खड्डा येईल कधी कोणत घातक वळण येईल हे समोर येईपर्यंत सांगता येत नाही . आशा वेळी आपण नियंत्रित असु तरच अपघात टाळता येईल अन्यथा अपघात होण निश्चित आहे. समोर कोणता धोका आहे हे जरी कोणीही सांगू शकत नसल तरी नियंत्रणा मुळे परिणाम बदलु शकतो एवढं तर निश्चित आहे. प्रवासातील गाडी व आपल्या जीवनावर नियंत्रण मिळवता आलं तर खुप मोठा अपघात टाळता येतो . जीवनातील व्यसन हे असाच एक अपघात आहे तो आपण टाळू शकतो.व्यसनं हे अगोदर आपल्या स्वतःच्या जीवांवर बेतत नंतर त्याचे परिणाम आपल्या कुटुंबाला त्या परिसराला समाजाला भोगावे लागतात.

जीवनातील कोणतही व्यसन एका क्षणात आपल्या वर प्रभाव निर्माण करत नाही . त्या साठी अनेक वेगवेगळे घटक आपल्या आजूबाजूला खुप दिवसांनी कार्यरत असतात.याच दरम्यान आपण अगदी सुरुवातीला सहज एखाद्या विषयाला बळी पडतो. मग त्याच प्रमाण आपल्यावर प्रभाव निर्माण करत. हा प्रभाव निर्माण होताना आपलं नियंत्रण सुटल तर मग मात्र थेट आपलं कधीच भरून निघणार नाही असं नुकसान होत . आपण वेळीच सावध झालो तर मग मात्र निश्चितच आपलं प्रचंड नुकसान टाळता येऊ शकत. असं सृष्टी वर एखादं उदाहरण आहे कि तो व्यक्ति जन्मला येताच व्यसनाधीन आहे. असं होऊच शकत नाही.चांगले वाईट गुण अवगुण आपण जीवनाच्या वाटेवर प्रसंग घटना घडामोडी वेळेनुसार त्याचा प्रभाव अभाव स्वीकारतो. त्याला खूप मोठं गोंडस नाव पण देतो मानसिक तणाव कसला ताण कसला तणाव हे तर मनाचे चोचले वैचारिक अज्ञान आहे.ज्या विषयाची अडचण संकट जीवनात निर्माण होईल त्याच योग्य ज्ञान आपण अर्जित केल पाहिजे

कोणाताही ताण तणाव आपलं कहिच बिघडवु शकत नाही. मुळात आपल्या मनावर आपला ताबा असला पाहिजे. तो ताबा आपल्या आपल्या ज्ञान वृद्धी ने मिळवता आला पाहिजे. संसारात अनंत अडचणी



आहेत दुःख आहेत समस्या आहेत. हे अगदी बरोबर आहे याला कोणीही नाकारू शकत नाही.अथवा अचानक जीवनात काही घडामोडी अशा घडतात कि ज्या आपण विसरू शकत नाहीत.मग आशा वेळी वारंवार उत्पन्न होणार दुःख दुःखांचा डोंगर अथवा आति आनंद अवाजवी संपत्ती यामुळे सुद्धा आपला व्यसनाच्या मार्गावर प्रवेश होतो . सृष्टी वरील सगळ्या दुःखाचं मुळावरील उपाय ज्ञान आहे. ज्या पद्धतीच दुःख त्या पद्धतीच ज्ञान आपल्या कडे असलं पाहिजे अथवा आपण ते अर्जित केल पाहिजे. दुःख आपलं काहिच बिघडवू शकत नाही. आपण कायमचाच प्रभावी उपाय शोधत नाही वरवर मलमपट्टी करतो.  म्हणून व्यसनाधीनतेकडे वळतो. ज्ञान हाच व्यसनाधीनतेवरील कायमचा उपाय आहे. परंतु विद्यमान स्थितीत जे पुर्ण पणे व्यसनाच्या आहारी गेलेले आहेत त्यांना सुद्धा व्यसनाधीनतेच्या बाहेर काढलं पाहिजे. त्यांना बाहेर काढण्यासाठी व्यापक प्रयत्नांची गरज आहे. त्यातील पहिल पाऊल म्हणून मुक्ताई व्यसन मुक्ती केंद्र संभाजीनगर या संस्थेच्या माध्यमातून राज्यव्यापी व्यसन मुक्ती मेळावा आयोजित केला आहे हि अभिनंदनीय बाब आहे. पण असंच काम प्रत्येक जिल्ह्यात होण आवश्यक आहे गरजेचं आहे. घरच्या घर गावच्या गावं उध्वस्त होत आहेत हे उघड्या डोळ्यांनी पाहयच नसेल तर योग्य वेळी जागृत होणं गरजेचं आहे.

# घेणारे तर बरेच असतात पण, वाटणाराच सर्वात श्रेष्ठ असतो !



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**देणे आणि घेणे हा एक प्रकारचा प्रत्येकाच्या  दैनंदिन जीवनातील व्यवहार असतो. सर्वजण ह्या, व्यवहाराशी  चांगल्या प्रकारे जुळून असतात,देणे आणि घेणे आजपर्यंत कोणालाही चुकले नाही. मग तो राजा असो वा रंक, गरीब असो वा श्रीमंत गरज प्रत्येकांना पडतच असते. पण, देणे आणि घेणे यामध्ये सुद्धा जमीन आसमानचा फरक असतो. कारण देणे व घेणे हे, दोन प्रकारचे असतात. पहिला प्रकार तो, म्हणजेच नि:स्वार्थ भावनेने देणे, घेणे व दुसरा प्रकार तो, म्हणजेच मनात कपट, स्वार्थाची भावना ठेवून देणे, घेणे करणे हेही वास्तविकता आहे.  खरं जर. .बघितले तर..अशाही देण्याघेण्याला काहीच अर्थ नाही. त्या पेक्षा असल्या प्रकारचा व्यवहार नाही केला तो एक वेळचा बरा असतो. पण, कोणाचे मन दुखावून असले व्यर्थ धंदे करणे हे योग्य नाही. पण, कोण सांगे कोणाला. .?  त्यामध्ये वाटणाऱ्याने आधी समोरच्या व्यक्तीची परिस्थिती जवळून बघावी, त्या व्यक्तीला वाचावे तो, परिस्थितीने कसा आहे, की, दु:खी आहे, की आजारी आहे किंवा त्याच्या मुलांना शिक्षणासाठी अडचण आहे जर. .अशा प्रकारची व्यक्ती, समाजात आढळून आली असल्यास  माणुसकीच्या नात्याने नक्कीच त्याची मदत करावी.**

तिथेच जर..एखादी व्यक्ती, खोटे, नाटे बोलून आपल्या परिस्थिती विषयी गयावया करून सांगत असेल तर. .मात्र त्या वेळी जरा  आपण सावध रहावे. कारण, बरेचदा अशा प्रकारे वागणारे लोक धोका देत असतात.  अशा लोकांची समाजामध्ये कमी नाही. याचा कदाचित आपल्याला चांगल्याच प्रकारे अनुभव असेलही. .

म्हणून अशा वेळी स्वतः विचार करावे व त्या व्यक्तीला ओळखावे. त्याच प्रमाणे याच समाजामध्ये राहणारे अति श्रीमंत, अति गोर, गरीब, बळीराजा, मोल मजुरी करणारे, विधवा महिला, बेरोजगार, कामगार तसेच भटकी जमात आहेत.   यामध्येच एक गोष्ट खास आहे ती, म्हणजेच अति श्रीमंत असलेले काही लोक इतरांना अजिबात  वाटत नाही, काही श्रीमंत लोक थोडं तरी वाटण्याचा प्रयत्न करत असतात . काही लोकांना दारावर आलेला भिकारी सुद्धा सहन होत नाही. भिकाऱ्याच्या वेषात जरी देव आला तरी ते, विश्वास करत नाही उलट त्याला  हाकलून लावतात कारण, त्यांच्यावर  अभिमानाचा साज चडलेला असतो व गर्वाच्या भोवऱ्यात अडकून पडलेले असतात. म्हणून त्यांना देव सुद्धा  शोधता येत नाही. उलट नको, त्या ठिकाणी मात्र  वाटतात हे,वास्तव सत्य आहे.  अशा लोकां पाशी सर्व काही असून सुद्धा ते, गरीबा पेक्षा गरीब असतात कारण, मनाची श्रीमंती त्यांच्यापाशी नसते हे फार मोठे दुर्भाग्य आहे. अशा अभिमानी, गर्विष्ठ लोकांच्या चुकूनही नादी लागू नये व आपला अपमान करून घेऊ नये.  आणि अशा लोकांचे  जर.. उशीरा  डोळे उघडले असतील तर.. चांगलेच आहे नक्कीच त्यांनी  अशा  ठिकाणी वाटावे जिथे वाटण्याचा काहीतरी  अर्थ लागेल. . समाजामध्ये  सर्व माणसे रंग, रूपाने जरी वेगवेगळे असले तरी सर्वजण शेवटी माणसेच आहेत पण, माणसाला जर.. माणुसकीची जाणीव नसेल किंवा माणूस वेळेत  ओळखता येत नसेल तर मात्र त्या पेक्षा मुके पशू, प्राणी सर्वात चांगले आहेत. कधी,कधी काही लोकांना पैशा,पाण्याची गरज असते,तर.. काही लोकांना आपुलकीच्या दोन शब्दांची आवश्यकता असते, काही लोकांना चांगल्या मार्गदर्शनाची गरज असते तर..काही लोकांना दोन घास  पोट भरण्याची गरज असते. चांगले मार्गदर्शन करणे हे सुद्धा खूप मोठे कार्य आहेत कारण, अशा कार्यामुळे एखाद्याच्या जीवनाला आधार मिळत असतो हे, सुध्दा वाटणे होय. कारण, अशा प्रकारे वाटप करणे पैशाने सुद्धा विकत घेता येत नाही व देताही येत नाही .



त्यासाठी आपल्या  मनात आपुलकी, दया, क्षमा,विश्वास असावा लागतो. त्याच प्रमाणे याच  समाजात राहणारा गरीब माणूस  खूप दुःखी असतो कारण, समाजात पाहिजे त्या प्रकारे  त्याला स्थान मिळत नाही, परिस्थितीही त्याला गांजून सोडते म्हणून तो माणूस कशाचीही व कोणाकडून ही अपेक्षा न ठेवता  ज्या परिस्थितीत जगत असतो तिथेच समाधानी असतो. त्या, माणसाची टिंगल, टवाळी चुकूनही करू नये होऊ शकेल तर..  फुल नाही तर.. फुलाची पाकळी देऊन त्याची मदत केली पाहिजे. अशा व्यक्तीला वाटलेले कधीच वाया जात नाही. त्याच्या चेहऱ्यावर जे हसू असते  तेच हसू खूप काही असते धनसंपत्तीत ते हसू  तोलले तरी  त्या हसूचा व आनंश्रूचा पारडा नेहमीच भारी असतो. त्याच प्रमाणे ह्याच समाजामध्ये असे, कितीतरी बेरोजगार, बळीराजा, विधवा, अनाथ लोक राहत असतात  आणि  आजही आहेत  त्यांची तर..सर्वांनी कदर करायला पाहिजे. कारण बळीराजा हा जगाचा पोशिंदा आहे, आपल्या अफाट कष्टाने जगाला पोसत असतो  मग तो अडचणीत सापडला असेल तर. .त्याची मदत करायला  जायला नको, का. .? आपणच धावुन जायला पाहिजे आज आपल्याकडे सर्व काही आहे या गर्वात न राहता इतरांकडे काय नाही याकडे थोडे लक्ष दिले पाहिजे. सर्वा प्रती आपुलकीची भावना ठेवली पाहिजे,   थोर संत सांगून गेले आहेत  "कोण दिवस येईल कसा कोण जाणतो" म्हणुन  सांगता येत नाही. उदा.आज आपल्या कडे सर्व काही आहे पण, उद्याला कदाचित  नसेल तर. .आपली मदत कोण करणार. ..? म्हणून  घेण्याची जास्त अपेक्षा करू नये आणि थोडेतरी वाटायला विसरू नये. गरजू लोकांना केलेल्या मादतीचा  भंडार कधीही खाली होत नाही. उलट भरलेला असतो  आणि  जे, खाऊन, पिऊन बेहिमान झालेले असतील किंवा होत आहेत  त्यांच्या विषयी  जास्त विचार करू नये, कारण निसर्गाचे डोळे  कधीही झाकले नसतात. म्हणून आपण फक्त, माणुसकीच्या नात्याने, माणुसकी धर्म  ठेवून वाटायला  शिकले पाहिजे.  आपण सर्वजण या भारत भूमीमध्ये जन्माला आलोत हेच आमचे सर्वात मोठे भाग्य आहेत. कारण, ह्याच भारत भूमीमध्ये होऊन गेलेल्या सर्व महा विभूती जन्माला घेऊन आपल्या महान  कार्यामुळे  अजरामर होऊन गेले, ही धरणी माता  पावण झालेली आहे. ते, सर्वजण फक्त, वाटायला शिकले, कोणाकडून घ्यायचे  तर..त्यांना माहीतच नव्हते म्हणुन त्यांनी दाखवलेल्या मार्गावरून चालणे हेच आम्हां सर्वाचे आद्य कर्तव्य आहे.

# सारांश: वेगवेगळ्या विषयांवरील वाचनीय लेखसंग्रह

आधुनिक केसरी

अनेक वर्षांपासून लेखक दिलीप देशपांडे हे वेगवेगळ्या वर्तमानपत्रातून वेगवेगळ्या विषयांवर लेख लिहून  प्रसिद्ध करीत आहेत. त्यामध्ये धार्मिक, सामाजिक, साहित्यिक,राजकीय, शेतीविषयक, सहकारी बँकांविषयी असे वेगवेगळे विषय लेखकाने या पुस्तकात हाताळलेले आहेत. "सारांश" हा अशाच वेगवेगळ्या वर्तमानपत्रात विखुरलेल्या लेखांचा,वेगवेगळ्या विषयांवरील वाचनीय लेख संग्रह आहे.  या लेख संग्रहात एकंदर 21 लेख  आहेत. यातील तीन लेख व्यक्ती विषयक आहेत. त्यामधील कवी  ना.धों.महानोर, कवी आरती प्रभू आणि अशोकजी परांजपे यांच्यावरील लेख,लेखकाने अतिशय आत्मीयतेने लिहिलेले असल्यामुळे अतिशय वाचनीय झालेले आहेत. लेखक स्वतः शेतकरी असल्यामुळे त्या प्रश्नांची त्यांना जाण असल्याने यातील तीन लेख ,जिल्हा बँक आणि शेतकऱ्यांसंबंधीचे आहेत.हे सगळे आत्मप्रचीतीचे बोल असल्याने प्रत्ययकारी झाले आहेत.

शेगाव निवासी गजानन महाराज हे लेखकाचे परम आदराचे स्थान तर पंढरपूर हे परम आदराचे ठिकाण. या दोन्ही विषयांवरचे लेख अति उत्तम झालेले आहेत. लेखकाचा ग्रंथालीमुळे साहित्याशी जवळचा संबंध आला. त्यामुळे पुस्तकांच्या सहवासातील दिवस, मराठीचा सन्मान व्हायला हवा, वाचनालय साहित्य संवादाची केंद्रे व्हावीत, वृत्त माध्यमांचे मनोरंजनीकरण हे आणि यासंबंधीचे सर्वच लेख लेखकाची साहित्य विषयक आवड अधोरेखित करतात.महिला दिन, ज्येष्ठासंबंधीचे लेख, प्रासंगिक पण महत्त्वाचे आहेत. भ्रष्टाचारस स्वच्छता अभियान,




तसेच प्लास्टिकचा वापर यासंबंधी लेखकाने आपले परखड विचार लेखाद्वारे स्पष्टपणे मांडले आहेत. तसेच अनेक अभियान जाहीर होतात परंतु त्याची काही काळानंतर काय परिस्थिती होते आणि ते अपयशी का ठरतात याचीही कारण मिमांसा केलेली आहे.

लेखकाची भाषा ओघोवती आहे. लेख कोणत्याही विषयांच्या वरचा असो,तो आत्मप्रत्ययाचा आनंद देत असल्याने संबंध पुस्तकच वाचनीय झाले आहे. पुस्तकात लेखकाचे मनोगत आहे. श्री प्रसाद दत्त पाठक यांची प्रस्तावना आहे. पुस्तकाला साजेसे मुखपृष्ठ आहे. पुस्तकात अनेक विषय समाविष्ट झालेले असल्यामुळे लेखन वाचन करणारे आणि वाचक यांना हे पुस्तकअतिशय उपयुक्त आहे यात काहीच शंका नाही. एकदा तरी हे पुस्तक नक्की वाचावे एक चांगले काहीतरी वाचल्याचा आनंद आपल्याला नक्कीच मिळेल यात शंका नाही.

**"लेखसंग्रह" दिलीप देशपांडे.**
**शाँपिझेन प्रकाशन.१८४/-**
**संपर्क-८९९९५६६९१७**

**अँड. मिलिंद चिंधडे.**
**नासिक, मोबा.९४२३९६८९६४**

# इक तेरे बिना इस दुनिया की हर चीज अधूरी लगती है !

## संयमाचा परीघ



चित्र : बाबूराव पाटील, भोकर



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : १४

आधुनिक केसरी

*"राजास जी महाली ;*
*सौख्ये कधी मिळाली,*
*ती सर्व प्राप्त झाली ;*
*या झोपडीत माझ्या."*

ही तुकडोजी महाराजांची कविता आम्ही लहानपणी शाळेत शिकलेली आणि प्रसंगा प्रसंगांनी आठवत राहिलेली, विषेशतः तेंव्हा तेंव्हा, जेंव्हा जेंव्हा भवतालात सत्ता आणि संपत्तीचा उन्माद पहातो. लोकांकडं पुर्वसंचिताचं सगळं असूनही, कमावूनही सुखी नाहीत. रहायला घरं आहेत अलीशान, ऐसपैस. जागेवर मिळतं सगळं चुटकीसरशी. नौकर-चाकर एका हाकेवर धावत येतील येवढी आर्थिक ऐपत आहे आणि तरी सुखी नाहीत, समाधानी नाहीत. घरात एकाहून अधीक शासकीय नौकरदार आहेत, अर्थात मिळकतीची साधनंही आहेत. शेती आहे. उद्योगं आहेत. व्यापार आहे. प्लॉटींग्स आहेत, नौक-या आहेत नवरा-बायको सहीत आणि तरी समाधानी मन नाही यांच्या जवळ. गाड्या, बंगले, शेतं, दाग-दागीने, नाही म्हणायला कांहीच नाही आणि तरी कन्हत-कुथंत-कुढंतच रहातात. जळंत रहातात, जळपत रहातात. यांच्या चेह-यावर कधी प्लिजंट स्माईल,अर्थात सुखंद हास्य उमलंत नाही, ना कधी कसली टवटवी दिसली, ना कधी कसला सुगंध दर्वळला त्यांच्या व्यक्तीमत्वातून. हमेशा लांड्या-लबाड्या, हमेशा जळधूप, हमेशा करपट ढेकरं आणि हमेशाचीच मळमळी.यांना कधी कुणाच्या मदतीला धावून जाताना पाहिलं नाही ना कधी कसली सकारात्मक चर्चा येते यांच्या तोंडून कुणाच्या कानी. खरंच काय कल्पना आहेत बरं लोकांच्या सुखाच्या ? हे कशाला म्हणंत असतील सुखं ? जगाच्या दृष्टीनं सगळीच तर समृद्धी आहे यांच्या जवळ परंतू ही माणसं मला कधी नितळ निर्मळ खळखळून हसताना दिसली नाहीत. या माणसांना कधी घाम गाळताना पाहिलेलं नाही.यांना 'त्याग' माहीत नाही ना 'समर्पण'. यांनी कधी वाहून घेतलं नाही ना कधी झोकून दिलं कधी कसल्या कामात. सदाच अंग चोरून काम करणारी ही माणसं सुखा समाधानाच्या यादीत येतीलच कसे ? त्यामुळं एवढा सगळा जिवाचा आटापिटा करुनही आनंदाची झोप येत नसेल, तर काय कामाची ही धन-दौलत आणि काय कामाचं हे वैभव ? मग प्रश्न उरतो...'पैसा म्हणजे सूख असतं का ? दाग-दागिने म्हणजे समाधान असतं का ? ऐशो-आराम म्हणजे शांती असते का ? अवघ्या जगाचं शोषण करुन जमा केलेली माया म्हणजे मोक्ष असतो का ? मग तुकडोजी महाराजांनी सांगीतलं ते खोटं आहे का ?

'हाऊ मच लँड डज अ मॅन नीड ?' -ही लोकप्रिय कथा रशीयन लेखक लिओ टॉलस्टॉयची. टॉलस्टॉय १९ व्या शतकातील कथा कादंबरीकार आणि शांतताप्रिय शिक्षणसुधारक.'अखेर किती लागते जमीन माणसाला ?' हा फार महत्वाचा प्रश्न भौतीक सुखसमृद्धीच्या मागं अंधळेपणानं धावणा-या लोकांसाठी त्यांनी अधाशी, आप्पलपोट्या जगाला विचारला. ही कथा एका असंतुष्ठ मनुष्याची आहे ज्याचं नाव 'पखाम' आहे आणि त्याला भरपूर सुपीक जमीन हवी आहे, भरपूर पिकं घेण्यासाठी, भरपूर कमायी करण्यासाठी. त्याचा सारखा शोध सुरु आहे आणि सारखी धावपळ करतो आहे तो. रशीयातीलच 'बास्खिरस' या डोंगरद-यातील स्वस्त आणि सुपीक जमीनीबद्दल त्याला कळतं आणि तो ती खरेदी करण्याच्या दृष्टीने तिथे पोहोंचतो. माहिती घेतो.सौदा करतो. तिथले संतुष्ठ लोक त्याला सांगतात की बाबा तुझ्या पैशांच्या मोबदल्यात तुला हवी तेवढी जमीन घे. अट एवढीच की तू सुर्योदयाला चालायला, धावायला खुणा करत जाशील आणि सुर्यास्ताला परंत याच जागी येशील. तू चालंत जा नाही तर पळंत जा. तू दिवस मावळण्यापुर्वी याच जागी परतायला हवास. जेवढं अंतर अर्थात वर्तूळ तू कापशील, तेवढी जमीन तुझी. चर्चेअंती सौदा मंजून करुन तो ठरल्या प्रमाणे खुणा करण्यासाठी खोरं घेऊन पळत सुटला, जागोजागी खुणा करत राहीला. दिवसभरात कुठं सुद्धा थांबला नाही.खूप अंतर असं खुणा करंत चालून,पळून झाल्यावर त्याच्या लक्षात आलं की तो फार दूरवर आला आहे आणि आता त्याला परतही जावं लागणार आहे. काम अवघड्यात पडल्यासारखं झालं खरं तर, तरी तो धावत-पळंत परत येताना त्यानं जिवाचं रान केलं. सीमा रेषा आणि सुर्यास्त दोन्ही जवळ येत चालले होते आणि जसाच तो सीमारेषेजवळ आला, धाडकन कोसळला आणि दम दाटून क्षणार्धात मरण पावला.लोक प्रचंड हळहळले, त्याच्या लालसेबद्दलही भले-बुरे बोलले.जे व्हायचं ते झालेलं होतं. त्याच्या सोबत आलेल्या त्याच्या नौकराने तिथंच साडेसहा फुटाचा खड्डा करुन त्याला पुरुन टाकलं. गोष्ट संपली. टॉलस्टॉय प्रश्न विचारतो...'किती जमीन लागते माणसाला ?' ही कथा प्रथम वर्ष बीए, बिकॉम, बी.एस्ससी च्या विद्यार्थ्यांना मागील वर्षापासून आभ्यासाला आहे डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठाच्या आभ्यासक्रमात. खरंच माणसाला किती जमीन लागते ? लिओ टॉलस्टॉयचा हा प्रश्न आपला भवताल...अर्थात हे सगळे लोक जे आपल्या हावरट स्वभावामुळं पैशाच्या मागं, सत्ता, संपत्तीच्या मागं बेभान होवून, सुसाट वेगानं धावताहेत, कधी समजून घेणार आहेत ? ही कथा शिकून किमान आपण तरी त्या 'पखाम' सारखं मरणार नाहीत याची काळजी कुणं घ्यायची ?

'ओड ऑन सॉलिट्यूड' अर्थात 'एकांतवासाला उद्देशून' लिहिलेली आणि 'सुखी मनुष्य' या संकल्पनेवर बेतलेली ही अजून एक जगप्रसिद्ध इंग्रजी कविता जी अलेक्झ्यांडर पोप या कवीनं आठराव्या शतकात लिहिलेली आहे, याचा अर्थ इतकाच की परिस्थिती तेंव्हाही तशीच होती जशी आता आहे. अजूनही मनुष्याला सुखी जीवनाची संकल्पना समजलेली नाही, हेच खरं. जन्मलेलं प्रत्येक मूल सुसंस्कारीत झाल्या शिवाय हे कदापी शक्य नाही, हे ही तितकंच खरं. साडे तीन ओळींचे पाच छोटे छोटे कडवे आहेत या कवितेत आणि छान ताला सुरात वाचता येते. कवी मनुष्याला सुखी होण्यासाठीच्या किमान गरजांबाबत बोलतो आहे.त्याचं म्हणनं इतकंच आहे की मनुष्याला किमान वडीलोपार्जीत एखादा जमीनीचा तुकडा मिळावा ज्यातुन त्याची रोजी-रोटी चालेल. घरच्याच शेळ्यामेंड्यांची लोकर त्याला घोंगडीच्या माध्यमातून अंथरुन-पांघरुन देईल आणि पौष्टिक आहार म्हणून दूध दुभतंही आलंच. श्वासासाठी शिवारातली प्रदूषणरहीत प्राणवायूयुक्त स्वच्छ हवा आणि द-या खो-यायातून पाझर फुटलेल्या झ-यांमधून खळाळणारं शुद्ध, निर्मळ पाणी असेल प्यायला. रानावनातल्याच लाकुडफाट्याचा निवारा अर्थात झोपडी असेल आरामाला, अंग टाकायला. दिवस-रात्र वर्षानुवर्षे त्याला प्रकृतीस्वास्थ्य आणि मनःशांती लाभेल. अशा शांत माहोलात तो कामं करत राहील, वाचन, लेखण, चिंतन करंत राहील. या तुडुंब मानवी गर्दीपासून, गोंगाटापासून, कोलाहलापासून दूर दूर निसर्गाच्या सानिध्यात जगण्या- मरण्याची इच्छा व्यक्त करतो. कशाला हवेत म्हणतो कुणी बांधायला कुणाचे स्मृतीस्तंभ ? हे असंच कांहीसं वस्तुनिष्ठ या अनावश्यक झगमगाटापासून स्वत:ला दूर राहू द्या म्हणणारा अलेक्झ्यांडर पोपही मागच्या वर्षीच्या प्रथम वर्षाच्याच विद्यार्थ्यांच्या आभ्यासक्रमात होता. विद्यार्थ्यांनी ही कविता आणि या कवितेतून समजावून सांगीतलेलं जगणं जर नीट समजून घेऊन छान रम्य एकांतवासाची अर्थात 'सॉलिट्यूड'ची निवड करुन आपल्या आयुष्याची आनंदी जगण्याची दिशा ठरवली तर कुठलंच शेत मशागतीशिवाय पेरलेलं दिसणार नाही. मजूर नाहीत म्हणून ज्या अडचणी रानं सहन करत



आहेत, तो ताणतणावही राहणार नाही. मालक नाही म्हणून गुरंढोरं दावणीला हंबरणार नाहीत. भाकर नाही म्हणून कोणी दोरी टाकणार नाही लिंबाला. आपण आहोत कोण आणि आपल्याला हवं काय आहे याचा उलघडा झाला की माणून अवांतर अपेक्षांचा पदरही धरत नाही आणि उगीच मरमरही करंत नाही. 'मला राहू द्या राव एकट्याला आनंदात नका तुमच्या हावरट माणसांच्या बाहूगर्दीत' म्हणणारा अलेक्झ्यांडर पोप मला याही अर्थानं मौलिक वाटतो.

संत तुकडोजी महाराजांची कविता असो, लिओ टॉलस्टॉयची कथा असो नाही तर अलेक्झ्यांडर पोपची कविता... हे सगळं आठवण्याचं कारण इतकंच की परवा फेसबुकावर अनेकांनी शेअर केलेला एक छोटा व्हीडीओ ज्याला 'रिल्स' म्हणतं हे इंटरनेट जगत, तो बघण्यात, ऐकण्यात आला.अनेकांनी यातल्या कष्टाबद्दल, माय माऊलीच्या निरागस आणि तितक्याच लडीवाळ हावभावांबद्दल, एकून जीवनपद्धतीवर आपला अभिप्राय, मतं अपलोड केली. 'हा निरागस आनंद पहा !' म्हणून एका सज्जन संवेदनशील मनानं हा मुद्दा अधोरेखीत करंत आपण 'संयमाच्या परीघ' या सरदात यावर कांही लिहावं म्हणून आग्रह धरला. हा भवतालही लिहिण्या बोलन्यासारखा आहे. हा व्हीडीओ त्या मी पाहिला नव्हता आणि पाहता क्षणी यावर तर लिहायलाच हवं म्हणून लिहायला घेतलं आणि आजचं हे सदराचं चौदावं पुष्प जन्माला आलं. एक बैलगाडी ऊस भरून कारखान्याला चालली आहे. गडी चालवणारा नवरा ऊसाची भरलेली गाडी हाकतो आहे आणि त्याची बायको आनंदानं कांही खूप छान गुणगुणते आहे. दिवसभराच्या ऊस तोडणी आणि गाडी भरण्याच्या कष्टाचा भाव आहेच त्या दृष्यात आणि त्याहून अधीकचं आहे तो बायकोच्या गुणगुण्यावर लुब्ध झालेला नवरा आहे आणि दिवसभराचं कष्ट चुटकीसरशी दूर करणारा गाण्याचा आनंद त्या गुणगुणना-या माय-माऊलीच्या चेह-यावर.

***" इक तेरे बिना इस दुनिया की***
***हर चीज अधूरी लगती है !***
***तुम पास हो कितनी पास मगर***
***नजदिकीभी दूरी लगती है !***
***प्यार जिन्हे हो जाए उन्हे***
***कुछ और नजर कब आता है !***
***तुमसे मिलकर ना जाने क्यू***
***और भी कुछ याद आता है !"***

हे असं कांही छान गुणगुणंत असताना नव-याच्या चेह-यावरील आनंदाचं ओसंडून वाहणं मोठं मनमोहक आहे. दिवस-रात्रं काबाडकष्ट करुन इतक्या सगळ्या शारिरीक कष्टानंतरही माणसं सुखी कसे राहू शकतात यासाठी तो व्हीडीओ पुन्हा पुन्हा बघीतला गेला अवघ्या नेटक-यांनी आणि बघता बघता ही जोडी 'प्यार झुकता नहीं' या सिनेमातल्या मिथून चक्रवर्ती आणि पद्मिनी कोल्हापुरे या तत्कालीन सुपरहीट नायक-नायिकां इतकीच फेसबुक आणि यू-ट्यूबवर गाजली.

हे आपल्या कष्टकरी माणसांच्या दुःख हलकं करण्याच्या सुंदर जागाच तर होत्या कधीकाळच्या जात्यावरल्या ओव्या, मोटंवरले गाणे, भलकडी, शेतकरी गीतं, भीमगीतं आणि मारोतीच्या मंदीरावरलं थकल्या भागल्या जिवांचे भजनं. मनभरून गुणगुणंत किती मोठ-मोठं ओझं माय-बाप सहज उचलंत आणि आनंदी आयुष्य जगंत, हे दर्शवणारं हे दृष्य आहे. आपण एक तर बघंत नाहीत, आपल्याला कोणी दाखवत नाही किंवा आपण होवून असं कांही करावं एवढं शहानपणंनही नसतं आपल्या गाठी. 'प्यार झुकता नहीं' या सुपहीट सिनेमातलं १९८५ साली प्रदर्शित झालेलं मिथून चक्रवर्ती आणि पद्मिनी कोल्हापुरे यांच्यावर चित्रीत झालेलं हे अर्थपुर्ण गीत लिहिलं होतं शाम शुलुदा बिहारी या गीतकारानं आणि अजरामर केलं होतं लता मंगेशकर आणि शब्बीरकुमारच्या भावस्पर्षी गायकीनं.

बसं !

**प्रेम असावं माणसांचं एकमेकावर !**
**जगणं चुटकीसरशी सोपं होवून जातं !**

**(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आणि इंग्रजी साहित्याचे संशोधन मार्गदर्शक आहेत )**

# गानकोकिळा लता दीदी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**स्वर्गीय लता मंगेशकर यांनी गाण्याच्या ताकदीवर संपूर्ण विश्वाला जिंकले व भारताची मान उंचावली. वयाच्या 5 व्या वर्षांपासून गाणे गाण्याला सुरूवात केली व 13 व्या वर्षी लता दीदीने पहिले गाणे गाइले होते.दु:खाची बातमी म्हणजे लतादीदींच्या वयाच्या 13 व्या वर्षी वडिलांचे निधन झाले या संपूर्ण दु:खात राहुन त्यांनी मागे वळून कधीच पाहिले नाही व गाणं सम्राज्ञी बनली आणि त्यांच्या गाण्याने विश्वाचे संपूर्ण रेकॉर्ड तोडले.**

लता दीदीने आपल्या कारकीर्दीत तब्बल 30 हजार गाणे गाइले तेही 36 वेगवेगळ्या भाषांमध्ये. त्यांनी आपल्या गाण्याच्या माध्यमातून जनजागृती, समाजहित, मनोरंजनात्मक, संस्कृतीक, देशहित, भावनीक, देशभक्ती,धार्मिक अशा अनेक मिश्रणाने 30 हजार गाणे गाइले त्यामुळेच त्यांना आपण गाणं सम्राज्ञी म्हणतो.

1962 मध्ये चीन सोबत युद्ध संपल्यानंतर काही दिवसांतच 26 जानेवारी आली. 26 जानेवारी 1963 ला "हे मेरे वतन के लोगो" या गाण्याने संपूर्ण भारतीयांच्या डोळ्यात अश्रू आले व संपूर्ण भारत देशाला एकसुत्रीत ठेवण्यासाठी मोलाची भूमिका लता दीदीने बजावली. यावरून आपण समजू शकतो की त्यांच्या गाण्यात व आवाजात मोठी ताकद व दैवी शक्ती होती. त्याचप्रमाणे त्या साक्षात सरस्वतीचे रूप सुध्दा होत्या. परंतु 6 फेब्रुवारी 2022 ला 92 व्या वर्षी त्यांचे निधन झाले. हा दिवस फिल्म जगत, कला, साहित्य, संगीतजगत व सर्वांसाठी दुःखद ठरला



व जणूकाय संगीत दुनियाचा अंत झाला की काय असे वाटले. लता दिदी कुटुंबात मोठी होती व संपूर्ण जीवन संघर्षमय रहाले. परंतु त्यांच्या गाण्याने संपूर्ण विश्व जिंकून गाणं सम्राज्ञी झाली. संघर्षमय जिवनात संगीताच्या फुलांनी नेहमीच त्यांचे स्वागत केले. आपण गाण्यातील चमकता तारा गमविला आहे. जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत त्यांचे नाव अमर राहील. आवाजाचे दुसरे नावच लता दीदी आहे. लता दीदींच्या गाण्यानेच फिल्म जगत शिखरावर पोहोचले. लता दीदींची संगीताची व गाण्याची प्रेरणा अनेक युगापर्यंत जीवीत राहिल. आज त्यांच्या पुण्यतिथी निमित्त संपूर्ण जग त्याचे स्मरण करीत आहे. लता दिदीला पुण्यतिथी निमित्त कोटी कोटी प्रणाम.

# सुसंस्कृत पिढी घडविण्याचे केंद्र

आधुनिक केसरी

भारतातील महाविद्यालयांतून शिक्षण घेत असलेल्या युवक-युवतींना ग्रामीण परिसराची जाणीव व्हावी, त्यांची सामाजिक कार्यात रुची वाढावी, श्रमदानाचे महत्त्व समजावे, सांस्कृतिक आदान-प्रदान होत असताना गतिक्षम नेतृत्व निर्माण व्हावे, या उद्देशाने महात्मा गांधी जन्मशताब्दी वर्षाचे निमित्त साधून 24 सप्टेंबर 1969 पासून राष्ट्रीय सेवा योजना स्थापण्यात आली. युवक हा राष्ट्रीय सेवा योजनेचा केंद्रबिंदू असून, युवाशक्ती ही राष्ट्रीय संपत्ती आहे. युवकांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजना करीत आहे. देशाला सर्वोच्च स्थानावर नेणारा सुसंस्कारित युवक घडला नाही, तर देशाची अधोगती झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे युवाशक्तीकडे राष्ट्रीय संसाधन म्हणून पाहण्याची गरज आहे. थोर समाजसेवक बाबा आमटे म्हणत, तरुणांचे हात उगारण्यासाठी नसून, देश उभारण्यासाठी आहेत. या तरुणांच्या शक्तीचा उपयोग ग्रामीण जनतेच्या विधायक कार्यासाठी करून घ्यायला हवा. युवकांमध्ये नैतिक व सामाजिक मूल्ये रुजवली पाहिजेत. वाढत्या आत्महत्या, पैशांची लालसा वाढत चालल्याने गरज भागविण्यासाठी धुंडाळलेला वाममार्ग, वाढती व्यसनाधीनता, आदी समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालय पातळीवर व्हायला हवे. सुदृढ युवक हा सुदृढ समाजाची निर्मिती करू शकतो, हे लक्षात घेऊन या योजनेला सर्व स्तरांतून सहकार्य मिळण्याची अपेक्षा आहे. महाविद्यालयीन शिबिरे, विद्यापीठस्तरीय शिबिरे, मेगा कॅम्प शिबिरे, राज्यस्तरीय शिबिरे, आदींच्या माध्यमांतून व्यक्तिमत्त्व विकास, राष्ट्रप्रेम, युवक नीतिमूल्ये, सामाजिक संस्कार, अंधर्शद्धा निर्मूलन, पर्यावरण संतुलन, वृक्षलागवड, मूल्यशिक्षण, साक्षरता यांसारख्या मूल्यांचा या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून प्रसार सुरू आहे. तरुण हाच खरा देशाचा आधारस्तंभ आहे.

**मच्छिंद्र ऐनापुरे, जत जि. सांगली**






# पुणे-बारामती व नागपूर-चंद्रपूर-गोंदियास संयुक्त विजेतेपद

## महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचा शानदार समारोप

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** महावितरणच्या आंतरपरिमंडलीय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत पुणे-बारामती व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया परिमंडलांच्या संघांनी संयुक्तरीत्या सर्वसाधारण विजेतेपदाचा मान मिळविला.

येथील एकलव्य क्रीडा संकुलावर रविवारी (५ फेब्रुवारी) चारदिवसीय स्पर्धेचा समारोप झाला. सर्वाधिक ६२ गुण मिळविणाऱ्या पुणे-बारामती व नागपूर-चंद्रपूर-गोंदिया परिमंडलांच्या संघांना सर्वसाधारण विजेतेपद विभागून देण्यात आले. महावितरणच्या कोकण प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक चंद्रकांत डांगे यांच्या हस्ते विजेत्यांना करंडक प्रदान करण्यात आला. यावेळी इतर संघ व उपस्थितांनीही टाळ्यांचा गजर व जल्लोष करीत विजेत्या संघांचे कौतुक केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले, कार्यकारी संचालक (वितरण/मानव संसाधन) अरविंद भादीकर, स्पर्धेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष व मुख्य अभियंता कैलास हुमणे (जळगाव), भुजंग खंदारे (मुख्यालय), राजेंद्र पवार (पुणे), मुख्य जनसंपर्क अधिकारी अनिल कांबळे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) राजेंद्र पांडे, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड यांची उपस्थिती होती. यावेळी अधीक्षक अभियंता राजेंद्र मार्के (जळगाव), अनिल बोरसे (नंदुरबार), कैलास जमदडे (अहमदनगर), सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) नेमीलाल राठोड, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) देवेंद्र कासार, अमित सोनवणे, कार्यकारी अभियंता अनिरुद्ध नाईकवाडे, रमेशकुमार पवार, प्रदीप सोरटे, राम चव्हाण, एकलव्य क्रीडा संकुलाचे संचालक श्रीकृष्ण बेलोरकर, अनुभूती शाळेचे क्रीडा संचालक अरविंद देशपांडे हेही मंचावर होते. सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर यांनी बक्षीस वितरणाचे सूत्रसंचालन केले. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अरुण शेलकर यांनी आभार मानले.

पाहुण्यांच्या हस्ते सांघिक व वैयक्तिक खेळातील विजेते व उपविजेत्यांना सुवर्ण व रौप्यपदक तसेच प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. राज्यातील १६ परिमंडलांचे नाशिक-जळगाव, औरंगाबाद-लातूर-नांदेड, कल्याण-रत्नागिरी, सांघिक कार्यालय-भांडूप, नागपूर-चंद्रपूर-गोंदिया, अकोला-अमरावती, पुणे-बारामती व कोल्हापूर अशा ८ संयुक्त संघांतील ७३० पुरुष व ३५३ महिला असे एकूण १०८३ खेळाडू स्पर्धेत सहभागी झाले होते.




# ९६ व्या साहित्य संमेलनात रज्जाक शेख यांच्या कवितेने रसिक मंत्रमुग्ध

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** ९६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन वर्धा कविकट्टा येथे अहमदनगर जिल्ह्यातील साहित्यिक रज्जाक शेख यांच्या कविता सादरीकरणाने कविकट्टा गाजवला.वर्धा येथील प्रसिद्ध साहित्यिक प्रा. देविदास सोटे सभामंडपात कविवर्य राजन लाखे यांच्या अध्यक्षतेखाली आणि सोबत मुख्य संयोजक प्रदीप दाते, समनव्यक प्रसाद देशपांडे , नोंदणी सदस्य डॉ. रत्ना नागरे, प्रशांत ढोले, पुणे आकाशवाणी निवेदिका मॅडम,व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत रज्जाक शेख यांच्या "बुद्ध यावा "या वैचारिक आणि समाजप्रबोधनपर ऐतिहासिक संदर्भ असलेली कवितेचे बहारदार सादरीकरण झाले. आपल्या नेहमीच्या शैलीतून शेख यांनी शब्दफेक करून रसिकांना खिळवून ठेवले. सादरीकरण चालू असताना प्रा. देविदास सोटे सभामंडपात खुर्च्या पूर्ण भरून अनेक रसिक श्रोते मंडपाबाहेर उभे होते.प्रत्येक कडव्यानंतर रसिकांनी टाळ्या आणि 'वाहवा' यांची दाद दिली. सद्याचे माणसाचे ढळलेले मानसिक संतुलन,सामाजिक संवेदनशून्यता, मनातील इगो आणि श्रीमंतीचा गर्व या सर्व बाबीवर रामबाण उपाय तथागत गौतम बुद्ध यांच्या स्तुतीपर कवितेतून शेख यांनी मांडले. यावेळी भव्यदिव्य व्यासपीठावर रज्जाक शेख यांना आकर्षक सन्मानपत्र, विदर्भ साहित्य सेवा संघाचे आकर्षक सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. मंचावरून खाली आल्यावर अनेक रसिकांनी प्रत्यक्ष भेटून कवितेचे मनभरून कौतुक केले.उपस्थित असलेल्या शाळेतील शाळकरी मुलींनी स्वाक्षरी आणि सेल्फीचा आग्रह धरला.ग्रामीण भागातील ग्रामीण संस्कृती आणि समाजहित जपणाऱ्या ' बुद्ध यावा' कवितेने ९६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात लक्षवेधक कामगिरी केल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# सभापती भागीनाथ मगर सेनेच्या वाटेवर

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** तालुक्यातील मराठवाड्याचे प्रवेशद्वार समझल्या जाणार्या तलवाडा येथील वैजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे डोंगर थडी भागातील जेष्ठ नेते भागीनाथ मगर हे बाळासाहेबांच्या शिवसेना या पक्षात प्रवेश घेणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मोठी उलथापालथ झाली आहे. अनेकांनी राष्ट्रवादी सोडून माजी आमदार भाऊसाहेब चिकटगावकर यांच्या सोबत उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षात जाणे पसंत केले असताना भागीनाथ मगर यांनी आमदार रमेश बोरनारे यांच्या नेतृत्वावर विश्वास टाकत शिंदे गटात जायचे ठरवले आहे. कार्यकर्त्यांच्या भावना जाणून घेण्यासाठी त्यांनी काल तातडीने बैठक घेऊन हा निर्णय घेतला आहे. दरम्यान पंकज ठोंबरे यांचे डोंगर थडी भागातील कट्टर समर्थक तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संतोष सुर्यवंशी यांनी राष्ट्रवादी मध्ये न जाता काँग्रेस सोबत राहणे पसंत केले होते मात्र ते सुद्धा शिंदे गटात सामील होतील असे चित्र आहे. सभापती भागीनाथ मगर दांडगा अनुभव जनसंपर्क या मुळे सर्व तालुक्यात परिचित आहे याचा फायदा शिवसेना शिंदे गटाला होईल दरम्यान जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक अगोदर मोठ्या प्रमाणात पक्षतर होत असल्याने याचा फायदा कुणाला होतो आणी कुणाचे पारडे जड भरते हे निवडणूक झाल्यानंतर कळेल.यावेळी गावातील सर्व ग्रामपंचायत सदस्य वि.वि.कार्यकारी सोसायटीचे चेअरमन व्हाईस चेअरमन विविध संघटनाचे पदाधिकारी तसेच परिसरातील विविध पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भावी पिढीचे गुन्हेगार होणार का? 'वसुंधरा'च्या फलकांनी वेधले लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** लातूर जिल्ह्यात वनांचे क्षेत्र अत्यल्प आहे. महाराष्ट्रात सर्वात कमी वनक्षेत्र असणारा जिल्हा म्हणून लातूरची ओळख आहे. ही ओळख पुसून काढण्यासाठी लातूर येथील वसुंधरा प्रतिष्ठान ही सामाजिक संस्था गत सात वर्षांपासून पर्यावरण क्षेत्रात भरीव योगदान देत आहे. वृक्ष लागवड अन संवर्धन ही लोकचळवळ व्हावी यासाठी "माझा श्वास...माझं झाड" हे अभियान हाती घेऊन जनजागृती सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, या उपक्रम अंतर्गत शहरातील नाना-नानी पार्क येथे 'भावी पिढीचे गुन्हेगार होणार का?' असा प्रश्न उपस्थित करीत आपल्यासह भावी पिढीला सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून संवर्धन करावे असे आवाहन या माध्यमातून करण्यात आले.

वसुंधरा प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून गेल्या ७ वर्षांपासून लातूर शहर आणि जिल्ह्यात वृक्ष लागवड आणि संवर्धन केले जात आहे. ही चळवळ लोकचळवळ व्हावी यासाठी आजवर नानाविध उपक्रम राबवित जनजागृती करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने झाडाचा गणपती, सेल्फी विथ ट्री, एक विद्यार्थीःएक वृक्ष, झाडांचे वाढदिवस, पर्यावरण पूरक सणोत्सव, ३० सेकंद पर्यावरणसाठी, प्रदूषणमुक्त लातूर, एक गणेश मंडळः११ वृक्ष उपक्रम आदी उपक्रम राबविण्यात आले आहेत. मानवाला जगण्यासाठी ऑक्सिजनची गरज असते. आपला श्वास हा ऑक्सिजनवर अवलंबून आहे. झाडे मानवाला जगण्यासाठी मोफत ऑक्सिजन देतात. त्यामुळे मानव श्वास घेऊ शकतो. परंतु, वृक्ष लागवड आणि संवर्धन करायचे सोडून मानवाकडून खुलेआम वृक्षतोड केली जाते आहे. "माझा श्वास...माझं झाड" हे अभियान लातुरात सुरू करून झाडांचे संवर्धन ही प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे असा संदेश फलकातून दिला जातो आहे. सदर फलक झाडांना बांधून जनजागृती केली



जाते आहे. या फलकावर माझा श्वास, माझे झाड.... जगण्यासाठी हवे आहे ना ऑक्सिजन मग चला लावू झाडे आणि करू त्यांचे संवर्धन असा मजकूर लिहण्यात आला आहे. शिवाय भावी पिढीचे गुन्हेगार होणार का? असा प्रश्न फलकातून विचारण्यात आला आहे. सदर फलक लातूर शहरातील नाना-नानी पार्कवर झाडांवर दोरीच्या साह्याने डकविण्यात आले आहेत. या उपक्रमात वसुंधरा प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा प्रा.योगेश शर्मा, जिल्हाध्यक्ष उमाकांत मुंडलीक, कार्याध्यक्ष अमोल आप्पा स्वामी, कोअर कमिटी सदस्य शिवाजी निरमनाळे, सदस्य रोहन शिंदे आदींनी सहभाग नोंदवला. लातूरकरांनी सदर फलक वाचून या अभिनव उपक्रमाचे कौतुक आणि स्वागत केले.

**झाडांना इजा होऊ नये म्हणून दोरीने बांधले फलक : प्रा .योगेश शर्मा**

लातूर शहरात अनेक व्यावसायिक आपल्या व्यवसायाच्या जाहिराती लावण्यासाठी झाडांना खिळे ठोकतात आणि त्यावर जाहिरातीचे फलक (बॅनर) लावतात . झाडेही सजीव आहेत . त्यांना खिळे ठोकल्याने त्यांनाही वेदना होतात . यासाठी वसुंधरा प्रतिष्ठान तर्फे 'खिळेमुक्त झाड अभियान' उपक्रम राबविला जातो आहे . शिवाय, नाना–नानी पार्क येथे जनजागृती फलक लावताना दोरीच्या साह्याने फलक बांधण्यात आले आहेत . जे जे व्यावसायिक झाडांना खिळे मारतात त्यांनी खिळे मारू नयेत, असे आवाहन वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा .योगेश शर्मा यांनी केले आहे .



# 'टीम तरुणाई'ची स्वच्छता मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद** : शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्न असलेल्या बौध्द लेणी परिसर व गोगाबाबा डोंगर या परिसरात स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली होती. या मोहिमेची सुरवात बौध्द लेणी परिसर ते गोगाबाबा डोंगर परिसर या ठिकाणापर्यंत करण्यात आली होती. या मोहिमेत ३० स्वयंसेवकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला. व त्या वेळी परिसरातील मोठ्या मोठ्याप्रमाणात कचरा गोळा करण्यात आला. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेची गरज असल्याचे लक्षात घेत तरुनांनी विविध संसर्गजन्य आजार रोखण्यासाठी स्वच्छतेवर भर द्यायला हवा, अशी अपेक्षा व्यक्त करत अस्वच्छ वातावरणामुळे लेणी परिसरात प्रदूषण होते. अशा अस्वच्छतेमुळे आपल्या शहराला कचऱ्याचे शहर असे बोलले जाऊ नये म्हणून. हे सर्व टाळण्यासाठी जमा होणारा कचरा निर्धारीत केलेल्या जागी नेऊन टाकला पाहिजे. व ओल्या व सुका कचऱ्याचे वर्गीकरण केले पाहिजे. प्लास्टिकचा कमीतकमी वापर केला पाहिजे, असा संदेश देत टिम तरुणाईच्या नावाने चांगभल असे म्हणत घोषणा देखिल दिल्या टिम तरूणाई संस्था मागिल सहा वर्षापासून आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि युवक या क्षेत्रात काम करत आहे. एक चांगला समाज निर्माण करण्यासाठी तरुणांना सक्षम करण्यासाठी देखील काम करत आहे. रविंद्र कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविलेल्या स्वच्छता मोहिमेमुळे लेणी परिसर, गोगाबाबा परिसर काही प्रमाणात स्वच्छ झाला. कॉलेजच्या विद्यार्थींनी स्वयंसेवकांनी केलेल्या स्वच्छतेमुळे परिसर स्वच्छ होण्यास मदत झाली.

टिम तरूणा ईप्रतिष्ठान यांच्यातर्फे ही स्वच्छता मोहीम रविवार सकाळी राबविण्यात आली. सकाळी सात ते दहावाजेपर्यंत ही मोहीम राबविण्यात आली. लेणी परिसर व गोगाबाबा डोंगर या ठिकाणी स्वच्छता करण्यात आली.

# अजितदादा पवार यांच्या हस्ते ऋता हिचे कौतुक


आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** लोणी काळभोरमध्ये आयोजित सत्कार सोहळ्यामध्ये अजित दादांनी केले ऋताचे कौतुक ज्या वयात धड बोलताही येत नाही त्या वयात एका चिमुकलीने विश्वविक्रम करून दाखवला आहे हे खरच कौतुकाची आणि गौरवाची अभिमानास्पद गोष्ट आहे ऋता अनुप ढम वय वर्षे फक्त दोन या वयात ती चिमुकली स्वतःचे संपूर्ण नाव, फळे, भाजीपाला, प्राणी, पक्षी, मराठी मुळाक्षरे, ए टू झेड, वन टू ट्वेंटी नंबर्स ,असंख्य कविता, शुभंकरोती ,लक्ष्मी स्तोत्र असे एक ना अनेक गोष्टी ती म्हणून दाखवते .प्रत्येक गाण्यावर डान्स करणे, गाणं म्हणणे, अनेक गाणे तिचे पाठ आहेत जसे की, 'एकटी एकटी घाबरलीस ना!' एखाद्याचे हुबेहूब नक्कल करणे अशा अनेक लीला ती करून दाखवते . तीचे जन्मगाव सातारा आणि सध्या ती पुणे शहरांमधील लोणी काळभोर या ठिकाणी राहते. याच तिच्या सर्व गोष्टींसाठी तिची निवड वर्ल्ड वाइल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे. याच गोष्टीची दखल घेत 3 फेब्रुवारी रोजी ग्रुप ग्रामपंचायत लोणी काळभोर यांच्या वतीने अजित दादा पवार यांच्या हस्ते सुद्धा तिला गौरविण्यात आले दादांनी सुद्धा चिमुकलीचे खूप कौतुक केले आणि तिच्या या यशाची खरच त्यांनी दाद दिली. यावेळी अशोक बापू पवार आमदार शिरूर हवेली पंचायत समितीचे माजी उपसभापती, लोणी काळभोर सरपंच माधुरीताई काळभोर. ग्रामपंचायत सदस्य नागेश काळभोर ग्रामपंचायत भरत काळभोर.युगंधर उर्फ सनी काळभोर माजी उपसभापती पंचायत समिती हवेली तालुका . आदी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



# सचिवपदी प्रशांत रघुनाथराव साळुंके यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज



**लातूर :** अखिल भारतीय सोमवंशी आर्य क्षत्रिय समाजाच्या राज्य संघटन समिती सचिवपदी प्रशांत रघुनाथराव साळुंके यांची निवड करण्यात आली आहे. सदर नियुक्ती पत्राव्दारे अखिल भारतीय सोमवंशी आर्य क्षत्रिय समाजाचे अध्यक्ष प्रमोद सोपानराव बागलाणे यांनी निवड केली आहे. अखिल भारतीय सोमवंशी आर्य क्षत्रिय समाजाचे अध्यक्ष प्रमोद सोपानराव बागलाणे यांनी सांगितले.

नवनियुक्त अखिल भारतीय सोमवंशी आर्य क्षत्रिय समाजाच्या राज्य संघटन समितीच्या सचिवपदी प्रशांत रघुनाथराव साळुंके यांची नियुक्ती झाल्यानंतर बोलताना त्यांनी समाजाच्या संघटन बांधणी हाच यशाचा नवामंत्र असल्याचे सांगितले. तसेच यापुढे संघटनात्मक बांधणी, दिशादर्शक आणि समाजोपयोगी कामांसाठी तयार असल्याचेही त्यांनी सांगितले. अध्यक्ष किशोर जवळकर, उपाध्यक्ष मनोज भिंड, कार्याध्यक्ष निखिल पाटोले,राजीव काकडे यांनी सांगताना, प्रशांत साळुंके एक होतकरू तरूण संघटन कौशल्य वाढीसाठी त्यांच्याकडे पाहिले जाते म्हणून त्यांना राज्य संघटन समितीच्या सचिवपदाची जबाबदारी देण्यात आल्याचे सांगितले. या निवडीच्या अभिनंदनात विजय उबाळे, प्रविण भालेराव, अंबादास दिल्लीकर, त्र्यंबक सोनवळकर, राम सोनवळकर, भिकाजी वाघमारे, रामहारी कांबळे, सुनिल साळुंके, सतिश साळुंके, शामसुंदर साळुंके, संतोष वाघमारे, अजय ठालपवार, विठ्ठल वाघमारे, ज्ञानोबा वाघमारे, अशोक साळुंके, सौ.सुषमा प्रशांत साळुंके, शरद साळुंके,प्रणव साळुंके, सागर उमरानकर,विजय देशमुख, पंकज कुलकर्णी, राजकुमार सोनी,बाळकृष्ण डांगे, अंकुश कवडे आदींनी केले.

# लातूर मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटीने अल्पावधीत केलेली प्रगती कौतुकास्पद : माजी मंत्री आ. अमित देशमुख

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** लातूर मल्टीस्टेट को-ऑप क्रेडीट सोसायटीने अल्पावधीत केलेली प्रगती कौतुकास्पद असून या संस्थेच्या माध्यमातून लातूर शहर व जिल्ह्यातील उद्योग, व्यवसायांना चालना मिळेल शिवाय राज्य पातळीवर संस्थेच्या शाखाचा विस्तार होईल, असा विश्वास यावेळी बोलताना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला.

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते शनिवार दि. ४ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी लातूर मल्टीस्टेट को-ऑप क्रेडीट सोसायटीच्या लातूर शहरातील राजीव गांधी चौक परिसरातील मुख्य कार्यालयाच्या इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले. आमदार देशमुख यांनी लातूर मल्टीस्टेट को.ऑप क्रेडिट सोसायटीच्या दशकपूर्ती महोत्सवास शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी राज्यमंत्री आमदार संजय बनसोडे, माजी आमदार पाशा पटेल, माजी आमदार धर्माजी सोनकवडे, लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस मोइज शेख, सचिव अभय साळुंखे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, डी.एन. शेळके, समद पटेल, अभिजीत देशमुख, लातूर मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष जे.जी सगरे, चेअरमन इसरार सगरे, टवेन्टिवन शुगर ली.चे व्हा.चेअरमन विजय देशमुख, व्हा.चेअरमन रवींद्र काळे, विजय निटुरे, चांदपाशा इनामदार, प्रभाकर बंडगर, दगडूसाहेब पडीले, चंद्रकांत धायगुडे, रामदास पवार, सचिन दाताल, सोनू डगवाले, विष्णुदास धायगुडे, आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी लातूर मल्टीस्टेट को. ऑप क्रेडिट सोसायटीचे सर्व अधिकारी कर्मचारी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर मल्टीस्टेट क्रेडिट को. ऑफ सोसायटीने १ कोटी ठेवी पासून सुरुवात करून १०० कोटीच्या पुढे ठेवी या संस्थेने निर्माण केले आहे. कालच्या विधान परिषदेच्या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना अपेक्षित यश मिळाले नाही, सेना भाजप सरकार जनतेला पटलेल नाही. सरकारचा



निर्णय कोर्टात होणार आहे. सुप्रीम कोर्टही लवकरच निर्णयही देत नाही, याबद्दल आमदार देशमुख यांनी खंत व्यक्त करून लातूर मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष जे.जी सगरे व चेअरमन इसरार सगरे यांच्या कामाचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी राज्यमंत्री आमदार संजय बनसोडे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव अभय साळुंखे, लातूर क्रेडिट सोसायटी संस्थापक अध्यक्ष जे.जी. सगरे, माजी आमदार पाशा पटेल आदींनी आपले मनोगत व्यक्त करून लातूर मल्टीस्टेट को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटीच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या प्रास्ताविक लातूर मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटीचे चेअरमन इसरार सगरे यांनी करून क्रेडिट सोसायटीच्या कार्याची सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी सुळ व तनुजा शिंदे यांनी केले तर शेवटी आभार पी.एन बंडगर यांनी मानले.

# धुळे 'सीसीटीव्ही'च्या निगराणीखाली; पालकमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील नागरिकांची सुरक्षितता अबाधित राखणे, धार्मिक कार्यक्रम व मिरवणुकांवर नियंत्रण ठेवणे, वाहतुकीचे नियंत्रण तसेच शहरातील संवदेनशील भागावर नियंत्रण ठेवण्यासाठी धुळे पोलीस दलास आता सीसीटीव्ही ची मदत मिळणार आहे. शहरातील सहा पोलीस स्टेशन अंतर्गत लावण्यात आलेल्या 116 ठिकाणच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे व पोलीस अधिक्षक कार्यालयातील नियंत्रण कक्षाचे लोकार्पण आज राज्याचे ग्रामविकास, वैद्यकिय शिक्षण, क्रीडा व युवककल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अश्विनी पाटील, खासदार डॉ सुभाष भामरे, आमदार अमरिशभाई पटेल, आ. जयकुमार रावल, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक बी. जी. शेखर पाटील, पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपमहापौर नागसेन बोरसे, उपविभागीय पोलीस अधिकारी एस.ऋषीकेश रेड्डी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

धुळे शहराच्या सुरक्षिततेसाठी शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत सन 2020-21 मध्ये 5 कोटी 36 लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन 2 कोटी 65 लाख रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला होता. या निधीतून शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले. तर सप्टेंबर 2022 मध्ये फायबर नेटवर्क तयार करुन सर्व कॅमेरे नियंत्रण कक्षात कनेक्ट करण्यात आली आहे. यांचे लोकार्पण आज पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. पुढील काळात जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे यावेळी पालकमंत्री महाजन यांनी सांगितले. धुळे शहर पोलीस स्टेशन हद्दीत 33, आझादनगर 20, देवपूर 31, देवपूर पश्चिम 14, चाळीसगाव रोड 10, मोहाडी पोलीस स्टेशन हद्दीत 8 असे एकूण 116 ठिकाणी कॅमेरे बसविण्यात आले आहे. तर या आर्थिक वर्षात साक्री, शिरपूर, दोंडाईचा, शिंदखेडा या शहरांमध्येही सीसीटीव्ही सनिरिक्षण यंत्रणा बसविण्याचे काम सुरु करण्यात येणार असून यामुळे गुन्हेगारांवर वचक ठेवण्यास मदत होणार असल्याचे पोलीस अधीक्षक बारकुंड यांनी यावेळी सांगितले.



# धुळे मॅरेथॉनला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## निरोगी शरीरासाठी नियमितपणे व्यायाम आवश्यक : पालकमंत्री गिरीश महाजन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारत हा तरुणांचा देश आहे. देशातील तरुण सुदृढ राहिला तर देश बलवान होतो. याकरीता प्रत्येक तरुणाने आपले शरीर निरोगी ठेवण्यासाठी नियमितपणे व्यायाम करणे आवश्यक आहे.
धुळे पोलीस दल तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद प्रशासन, महापालिका व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित धुळे मॅरेथॉनचा उपक्रम कौतुकास्पद आणि अनुकरणीय आहे, असे प्रतिपादन धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे वैद्यकीय शिक्षण, ग्रामविकास व पंचायत राज आणि क्रीडा व युवक कल्याण मंत्री गिरीश महाजन यांनी येथे केले.

जिल्हा पोलीस दल, जिल्हाधिकारी कार्यालय, महानगरपालिका, जिल्हा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मॅरेथॉन स्पर्धा 2023 च्या सिझन 1 "फिट धुळे, हिट धुळे" ही थीम घेऊन शहरात प्रथमच आयोजित करण्यात आली होती. शहरातील पोलीस कवायत मैदान येथून मॅरेथॉन स्पर्धेला सुरुवात झाली, येथील पोलीस कवायत मैदानावर आज सकाळी धुळे मॅरेथॉनचे उद्‌घाटन पालकमंत्री श्री. महाजन यांच्या हस्ते झेंडी दाखवून करण्यात आले. याप्रसंगी आमदार जयकुमार रावल, आमदार कुणाल पाटील, आमदार मंजुळाताई गावीत, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक बी. जी. शेखर पाटील, जिल्हाधिकारी जलज शर्मा, उपमहापौर नागसेन बोरसे, पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, महापालिका आयुक्त देविदास टेकाळे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, सहायक जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, उपविभागीय पोलीस अधिकारी एस.ऋषीकेश रेड्डी, ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजेते विजय चौधरी, धुळे महानगरपालिकेच्या ब्रँड अँबेसिडर मृणाल




गायकवाड यांच्यासह विविध प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, नागरीक व खेळाडू उपस्थित होते.

पालकमंत्री महाजन पुढे म्हणाले, रोजच्या जीवनात व्यायामाला महत्त्व असून नियमित व्यायामाने शरीर सुदृढत तर होतेचे शिवाय आरोग्य देखील सुदृढ राहते. आपल्याला नवीन पिढी घडवायची असून यासाठी तरुणांनी व्यसनापासून दूर राहणे गरजेचे असल्याचेही ते म्हणाले.

या स्पर्धेत 21 किलोमीटर फुल मॅरेथॉन, 10 किलोमीटर हाफ मॅरेथॉन, 5 किलोमीटर ड्रीम रन आणि 3 किलोमीटर फॅमिली रन चार विभागात आयोजन करण्यात आले होते. या मॅरेथॉन स्पर्धेस पहाटे पाच वाजेपासूनच नागरीकांनी पोलीस कवायत मैदान येथे गर्दी करण्यास सुरुवात केली होती, युवक, युवती, महिला, गृहिणी, तरुण, मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. पोलीस कवायत मैदानापासून सुरू झालेली मॅरेथॉन स्पर्धेचा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, आग्रा रोड, पाच कंदील, कराची वाला खुंट, गांधी पुतळा, नेहरू चौक, दत्त मंदिर चौक, स्टेडियम तसेच मेहरगाव पासून पुन्हा पोलीस कवायत मैदान असा मार्ग निश्चित करण्यात आला होता. या मॅरेथॉन स्पर्धेत धुळे जिल्ह्यासह जळगाव, नाशिक, नंदुरबार, नगर, अमरावती, मुंबई आदि जिल्ह्यातील स्पर्धकही मोठ्या संख्येने सहभागी झाले.



# कंत्राटी सेविकांवर अन्याय करणे बंद करा

आधुनिक केसरी न्यूज

**परभणी :** संपूर्ण महाराष्ट्रासह परभणी जिल्ह्यात देखील आरोग्य प्रशासनाकडून कोविड काळात जिवावर उध्दार होऊन कर्तव्य बजावलेल्या व नियमीत कंत्राटी आरोग्य सेविका आणि आरोग्य सहायिका यांच्यावर सातत्याने अन्याय केला जात असूनया संदर्भात राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी दि.२४ जानेवारी २०२३ रोजी राज्यातील कंत्राटी आरोग्य सेविका आणि आरोग्य सहायिका यांना या प्रश्नावर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करुन कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी पंधरा दिवसाचा कालावधी मागीतला होता परंतु कालावधी उलटल्या नंतर देखील आरोग्य सेविका आणि आरोग्य सहायिका यांना सेवेत कायम करण्याच्या प्रश्नावर अद्यापही कुठलाच तोडगा निघला नाही त्यामुळे आरोग्य सेविका आणि आरोग्य सहायिका पुन्हा एकदा आंदोलनाच्या पावित्र्यात असल्याचे निदर्शनास येत आहे. महाराष्ट्रातील नियमित आरोग्य सेविकांच्या रिक्त पदावर कंत्राटी आरोग्य सेविका/सहायिका यांना कायम नेमणूक देण्यात येईल शासनाकडून असा निर्णय तात्काळ न झाल्यास पुन्हा बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा राज्यासह परभणी जिल्ह्यातील देखीलकंत्राटी आरोग्य सेविका आणि आरोग्य सहायिका यांनी दिलेला आहे.

कारण आता कंत्राटी आरोग्य सेविका आणि आरोग्य सहायिका यांची हा त्यांच्यावर सातत्याने होणारा अन्याय सहन करण्याची सहनशीलता संपलेली आहे. कंत्राटी आरोग्य सेविका आणि आरोग्य सहायिका यांच्या मनात शासनाविषयी प्रचंड आक्रोश निर्माण झालेला असून कंत्राटी आरोग्य सेविका आणि आरोग्य सहायिकांनी ' एकच नारा कंत्राटी आरोग्य सेविका आणि आरोग्य सहायिका यांना कायम करा' करा अशी गर्जना केली असून नर्सेस संघटनेचे राज्य समन्वयक, श्री संजय देशमुख, रेखा टर्के,संगीता रेवडे,अंजली राठोड यांनी आंदोलनाचा इशारा दिला.

# सावळेद्वार येथे लाखो भाविकांनी घेतले श्री चक्रधर स्वामी (जाळीचा देव) यांचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील कलीयुगातील परब्रम्ह परमेश्वर अवतार भगवान श्री चक्रधर स्वामी भव्य यात्रा भरण्यात आली आहे. सह्याद्रीच्या पर्वतरांगेत वसलेली चक्रधर स्वामींची दोन मंदिरे अर्थातच जाळीचा देव या नावाने प्रसिद्ध असुन दरवर्षी दांडी पौर्णिमेला येथे भव्य यात्रा भरते. आठवडाभर चालणाऱ्या या यात्रा महोत्सवासाठी लाखो भाविक भक्त मोठ्या संख्येने येथे येतात. तसेच जवळपासच्या संपूर्ण महाराष्ट्रातून भाविक भक्त या सावळेद्वार ठिकाणी दर्शन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात येतात. दि. ३ फेब्रुवारी पासून यात्रेला सुरुवात झाली आहे. दि. ३ फेब्रुवारी पासून सावळदबारा येथील चक्रधर स्वामी मंदिर व याच मंदिरापासून काही अंतरावर असलेल्या जाळीचा देव मंदिर आहेत या दोन्ही ठिकाणी भाविक भक्त दर्शन घेण्यासाठी येतात. सोयगांव तालुक्यातील सावळदबारा येथे चक्रधर स्वामींचे भव्य मंदिर आहे. या ठिकाणी दांडी पौर्णिमेच्या दिवशी मोठ्या संख्येने



भाविक भक्त दर्शन घेण्यासाठी विविध राज्यांतील भाविक भक्त येतात सह्याद्री च्या पर्वतरांगेत डोंगराच्या पायथ्याशी सावळदबारा या गावी चक्रधर स्वामींचे ( जाळीचा देव ) अतिप्राचीन मंदिर आहे. याच मंदिरापासुन सह्याद्रीच्या पहाडाच्या माथ्यावर चक्रधर स्वामींचे (जाळीचा देव) दुसरे मंदिर आहे श्रीक्षेत्र जाळीचा देव म्हणून दोन्ही मंदिरे राज्यात प्रसिद्ध आहेत. चक्रधर स्वामींना महानुभाव पंथाचे आद्य संस्थापक म्हणून ओळखले जाते. सावळदबारा येथे डोंगरा च्या पायथ्याशी चक्रधर स्वामीचे एक मंदिर व डोंगर माथ्यावर दुसरे मंदिर अशी दोन मंदिरे आहेत. भाविक भक्त दोन्ही मंदिरात एकाच दिवशी दर्शन घेतात. भाविकांच्या मनोकामना पूर्ण होतात. दोन्हीही मंदिरांमध्ये पंचधातूपासुन बनविलेल्या चक्रधर स्वामी म्हणजेच जाळीचा देवाच्या अतिभव्य व प्राचीन मूर्त्या आहेत. तसेच अजिंठा पहाडात अनेक लहान मोठी मंदिरे आहेत. सावळदबारा येथे चक्रधर स्वामींचे दर्शन घेण्यासाठी विविध राज्यातील भाविक भक्त या ठिकाणी मोठ्या संख्येने येतात दरम्यान, रा.प. महामंडळाने भाविकासाठी जादा बस सोडण्यात यावे, अशी मागणी सुद्धा मधूकर पुजारी यांनी एका निवेदनाद्वारे आगार प्रमुख यांच्याकडे केली आहे.

# भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळनेर :** कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य व कै.अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय पिंपळनेर येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 'मराठी भाषा संवर्धन काळाची गरज', या विषयावर मराठी निबंध स्पर्धा व ' आईची थोरवी', आणि 'आई', या विषयावर काव्यलेखन स्पर्धा घेण्यात आल्या. सदर निबंध स्पर्धेत मुलींच्या गटातून प्रथम क्रमांक -उर्मिला भोये, द्वितीय क्रमांक-कु.गायत्री पंडित चौरे, तृतीय क्रमांक -अनुसया पोपट चौरे यांनी मिळविला. तसेच 'मराठी भाषा संवर्धन काळाची गरज'या विषयावर प्रथम क्रमांक-भावेश विनायक कुवर, द्वितीय क्रमांक-देसाई बाबुराव माने व तृतीय क्रमांक-सपना मुरलीधर पवार हे विजेते ठरले. तसेच'आई'या विषयावरील काव्यलेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक- कु.गावित चंद्रकला उत्तम, द्वितीय क्रमांक-देसाई बाबुराव मान्या हे विजेते ठरले. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त या स्पर्धेचे आयोजन मराठी विभाग प्रमुख डॉ.सतीश मस्के व प्रा.एल.जे.गवळी यांनी केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. के.डी कदम यांनी केले.



# कवी योगिराज माने यांना जगद्‌गुरु तुकोबाराय 'जीवनगौरव पुरस्कार'

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** शारदोपासक शिक्षण संस्था व जगद्‌गुरु तुकोबाराय साहित्य परिषद महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने विश्ववंदनीय जगद्‌गुरु तुकोबाराय यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. महाराष्ट्र आणि महाराष्ट्रा बाहेरील वैचारिक चळवळ असलेल्या मराठा सेवा संघ प्रणीत जगद्‌गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेच्या वतीने तुकोबारायांच्या जन्मदिनी दरवर्षी दिला जाणारा 'जगद्‌गुरु तुकोबाराय जीवनगौरव पुरस्कार' यावर्षी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी, गीतकार योगीराज माने यांना अत्यंत सन्मानाने प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्र. प्राचार्य डॉ. प्रदीप पाटील हे होते. प्रमुख अतिथी म्हणून मराठीतील सुप्रसिद्ध ज्येष्ठ साहित्यिक फ.म.शहाजिंदे, शारदोपासक शिक्षण संस्थेचे संचालक दगडू गिरबने, पुरस्कारार्थी कवी योगीराज माने, जगद्‌गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे महासचिव तथा तुकोबावाणीचे संपादक बालाजी जाधव, जगद्‌गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे प्रदेश संघटक सतीश हानेगावे, जगद्‌गुरु तुकोबाराय साहित्य परिषद मराठवाड्याचे कोषाध्यक्ष ज्ञानदेव बरमदे, प्राचार्य डॉ. व्यंकट अनिगुंटे, कवयित्री शांता गिरबने यांची उपस्थिती होती. जगद्‌गुरु तुकोबाराय यांच्या प्रतिमेस अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्ताविक करताना, ज्ञानदेव बरमदे यांनी तुकोबारायांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

तुकोबारायांच्या जयंती बद्दल बोलत असताना, सतीश हानेगावे यांनी महाराष्ट्र शासनाने महापुरुषांच्या जयंती उत्सवाच्या यादीत जगद्‌गुरु तुकोबाराय यांचे नाव कसे काय आले नाही? यावर प्रश्नचिन्ह निर्माण केले. समाज



व्यवस्थेतल्या काही तथाकथित साहित्यिकांने तुकोबारायांची प्रतिमा अंधश्रद्धाळू, दैववादी, चमत्कारी, भोळाभाबडा, व्यवहारशून्य अशी रंगवून तुकोबारायांच्या बुद्धीप्रामाण्यवादी, विवेकवादी, विज्ञानवादी, प्रयत्नवादी, मानवतावादी विचारांचा खून अशा मारेकऱ्यांनी केला याचे प्रतिपादन केले.

बालाजी जाधव यांनी महापुरुषांचे जीवन चरित्र वाचून त्यांचे विज्ञानवादी, विवेकवादी, चिकित्सक विचार शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवण्याची नितांत गरज निर्माण झाल्याचे सांगितले. ही परिषद परिवर्तनाच्या चळवळीसाठी समर्पित असून विवेकाचा जागर घडवून आणण्यासाठी वाचणारी, लिहिणारी, बोलणारी व कृती करणारी पिढी घडली पाहिजे असा आशावाद व्यक्त केला.

पुरस्काराला उत्तर देताना अभंग आणि कवितेच्या माध्यमातून कवी योगीराज माने यांनी युवकांच्या व गावकऱ्यांच्या मनाची मशागत केली. गेल्या पंचवीस वर्षापासून मी कविता लिहितो व सादरीकरण करतो. या माझ्या तपश्चर्येला खऱ्या अर्थाने या पुरस्कारामुळे अर्थ प्राप्त झाला आहे. पुन्हा अजून अधिक उर्मीने काम करण्याची प्रेरणा या पुरस्कारामुळे मला मिळाली. तुकोबारायांच्या नावाने मिळालेला हा पुरस्कार माझ्यासाठी चिरस्थायी,अविस्मरणीय, अक्षय ठेवा असून तो विचारांच्या रूपाने मी जतन करेन अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. किल्लारीच्या महाभयानक भूकंपामध्ये माझे कुटुंबीय, नातेवाईक बेचिराख झाले. त्या वेदनेतून मुक्त होण्यासाठी खऱ्या अर्थाने मी कवितेकडे वळलो. विविध प्रकारच्या कविता सादर करून, कविता हा माझा अंतिम श्वास आहे, मी कविता जगणारा माणूस असून शेवटच्या श्वासापर्यंत मी कविता जगत राहीन, असे प्रतिपादन त्यांनी केले.



# डॉ. प्रभाकर मांडे यांचे कार्य दीपस्तंभासारखे : प्रा.डॉ. खांडगे

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉ.प्रभाकर मांडे यांचे काम दीपस्तंभा सारखे असून या क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या संशोधक व अभ्यासकांना यापुढेही त्यांचे मार्गदर्शन मिळत राहो व लोक साहित्य व लोक संस्कृती पुढे नेण्याचे काम त्यांच्या हातून आणखी पुढे जावे असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या शाहीर अमर शेख अध्यासन केंद्राचे प्रमुख प्रा.डॉ. प्रकाश खांडगे यांनी केली.

डॉ. प्रभाकर मांडे यांना पद्मश्री पुरस्कार व चतुरंग पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांच्या निवासस्थानी झालेल्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, चे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे पद्मगंधा फाउंडेशनचे डॉ. धोंडीराम वाडकर, लोकसाहित्य संशोधन मंडळाचे सदस्य प्राध्यापक मच्छिंद्र मालूजकर, श्रीगोंदा कोविड सेंटरचे समन्वयक डॉ. बाळासाहेब बळे डॉ. वर्षा कीर्तने, सुचित्रा डावरे, कवयित्री ऋता ठाकूर शब्दगंधचे खजिनदार भगवान राऊत, संशोधक डॉ. रमेश खेळतकर डॉ.मांडे यांच्या श्णूशा वृषाली मांडे, लोककला अकादमीचे पराग कुलकर्णी आधी यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ.प्रकाश खांडगे म्हणाले डॉ. प्रभाकर मांडे म्हणजे लोकसाहित्य व लोक संस्कृती क्षेत्रातील एक महान तपस्वी, ऋषितुल्य व्यक्तीमत्व व कल्पवृक्ष आहेत. त्यांनी लावलेल्या लोकसाहित्याच्या रोपट्याचा आज वटवृक्ष झाला आहे.आणि या वटवृक्षाच्या छायेत महाराष्ट्रातील अनेक नामवंत साहित्यिक व संशोधक घडले. त्यामुळे त्यांचे योगदान अद्वितीय आहे.

डॉ. अनिल सहस्रबुद्धे म्हणाले डॉ. प्रभाकर मांडे म्हणजे लोकसाहित्यातील दधिची ऋषी आहेत.त्यांनी अनेक अभ्यासकांना प्रेरणा व प्रोत्साहन दिले. लोकसाहित्याचा अभ्यास लोकसंस्कृती म्हणून करायचा असतो. हे त्यांनी शिकवले लोकसाहित्य व लोक संस्कृतीचा हा नवा शिपाई दुर्दम्य अशावादाने आपल्याकडे बघतोय त्यांची हीच दुर्दम्य आशा घेऊन नवीन मुले मुली पुढे जातील असा विचार ते आजही करतात. ज्ञानाचा हा वटवृक्ष अजाण वृक्षासारखा मोठा होत जावो व त्यांच्या कार्याचा सुगंध मोगऱ्यासारखा दरवळत राहो हीच यानिमित्त सदिच्छा.

यावेळी डॉ.धोंडीराम वाडकर ,डॉ. मच्छिंद्र मालुंजकर, डॉ, वृशाली मांडे ,कवित्री ऋता ठाकूर व भगवान राऊत यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

# प्रत्येक क्षेत्रात कठोर परिश्रमाची गरज; यु-ग्रुप्सचे संचालक डॉ. संजीव चित्रे

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** 'विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊन पुढे नोकरीबरोबरच उद्योग धंद्यामध्ये करिअर करावे. उद्योग- व्यवसाय करण्यासाठी बुद्धीची जोड द्यावी लागते. अभियांत्रिकी शिक्षणाच्या माध्यमातून बौद्धिक उर्जा अधिक प्रमाणात मिळते. व्यावसायिक पार्श्वभूमीवर अभियांत्रिकीचे शिक्षण हे सर्वात सरस असून या ज्ञानाचा व्यवहारात विशेष उपयोग होतो. नोकरी व उद्योगाच्या प्रत्येक क्षेत्रात अभियांत्रिकी शिक्षणाचा फायदा होतो. अभियांत्रिकी शिक्षणातून अनेक अडचणी सुटू शकतात. यासाठी आपल्यामध्ये असलेल्या गुणवत्तेला प्रथम प्राधान्य द्या. करिअर करताना अडचणी आल्यानंतर त्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करा आणि हे करत असताना प्रत्येक क्षेत्रामध्ये कठोर परिश्रम करा.' असे प्रतिपादन डॉ.संजीव चित्रे यांनी केले

स्वेरीमध्ये 'प्रोजेक्ट टू प्रॉडक्ट अँड प्रॉडक्ट टू स्टार्टअप' या विषयावर अमेरिकेच्या लॉस गॅटोस, कॅलिफोर्निया येथील यु ग्रुप्सचे संचालक डॉ.संजीव चित्रे हे स्वेरी अंतर्गत असलेल्या इंजिनिअरिंग, फार्मसी एमबीए व एमसीए मधील विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्राध्यापकांना मार्गदर्शन करत होते. संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांनी पाहुण्यांचे स्वागत करून 'विद्यार्थ्यांना या उपक्रमाची का आवश्यकता आहे? हे स्पष्ट करून स्वेरीच्या वाटचालीतील महत्वाचे टप्पे, मिळालेला निधी, महत्वपूर्ण मानांकने, शिक्षणात राबविण्यात येणारे विविध उपक्रम, संशोधन विभागाची गरुड झेप याबाबत सविस्तर माहिती दिली. डॉ.संजीव चित्रे म्हणाले की, 'भारतातून अमेरिकेत गेल्यानंतर माणसाचा रोजच्या जीवनात लागणाऱ्या अनेक गोष्टींच्या उत्पादनाचा मी अभ्यास केला. त्या अनुषंगाने माणसे गोळा करून नवी उत्पादने व बाजारपेठा निर्माण केल्या. यावेळी पार्थ पॅक्वेलचे संचालक व सीए अजय अधिकारी, सौ. नेहा अधिकारी, वास्तुतज्ज्ञ प्रदीप वढावकर, सौ. मीना वढावकर तसेच स्वेरी अंतर्गत असलेल्या बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतिश मांडवे यांच्यासह इंजिनिअरिंग व फार्मसीचे प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ यांनी आभार मानले.





आधुनिक केसरी न्यूज

मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे नवनिर्वाचित आ. विक्रम काळे साहेब विक्रमी मतांनी निवडून आल्याबद्दल महाविकास आघाडीच्या वतीने मुकुंदवाडी बस स्टॉप येथे सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक भाऊसाहेब जगताप मोतीलाल जगताप भाऊसाहेब वाघ कमलाकर जगताप मोहन नाना साळवे ज्ञानेश्वर डांगे सुभाष पाटील पांडभरे, दीपक मस्के, दशरथ मानवतकर, जिल्हा परिषद निमंत्रित सदस्य कल्याण चव्हाण पाटील इत्यादी मोठ्या संख्येने नागरिक कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# संत रविदास महाराज जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** चौधरी कॉलनी, चिकलठाणा येथील सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब रामटेके यांच्या घरी संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची 646 वी जंयती उत्साहात साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी माजी उपमहापौर भाऊसाहेब वाघ यांच्या हस्ते संत रविदास महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. या कार्यक्रमास माजी नगरसेवक संजयभाऊ चौधरी, गंगाधर ढाकणे, श्रीमंती भागुबाई सिरसाट, शिवसेना शहर संघटक गोरखनाथ सातपुते, भाऊसाहेब रामटेके, सोनाजी गायकवाड, हृषिकेश ढाकणे, प्रशांत चाबुंकस्वार, समाधान अढाव, कमलेश रामटेके, प्रेम रामटेके,



सुर्यप्रकाश रामटेके, गणेश रामटेके, कोमलताई गायकवाड, रंजनाताई रामटेके, मंगलाताई सातपुते आदी मान्यवरांची उपस्थिती होती. बाळासाहेब रामटेके यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.



# श्री संत रविदास महाराज जयंतीनिमित्त खर्डी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** श्री संत गुरु रविदास महाराज यांच्या 646 व्या जयंतीनिमित्त खर्डी येथे सालाबाद प्रमाणे याही वर्षी चर्मकार समाजाच्या वतीने भजन कीर्तन नामस्मरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता खर्डी येथे चर्मकार समाज मोठ्या संख्येने असून दरवर्षी गुरु रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त समाजाच्या वतीने अनेक उपक्रम राबविले जातात कांबळे मळा या ठिकाणी जयंतीनिमित्त ह.भ.प.कवडे महाराज यांच्या कीर्तनाचा व उपरी भजनी मंडळ यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गुरु रविदास महाराज यांचे विचार कीर्तनाच्या माध्यमातून समाजापुढे मांडण्यात आले. कीर्तनाच्या कार्यक्रमानंतर गुरु रविदास महाराज यांचे विचार अनेक मान्यवरांनी उपस्थितांपुढे मांडले. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी स्वेरी कॉलेजचे अध्यक्ष डॉ. बी.पी. रोंगे सर प्राचार्य एम.एम.पवार सर मुकुंद मालक परिचारक, बहुजन समाज पार्टीचे राष्ट्रीय नेते अशोक आगवणे, खर्डी येथील विविध कार्यकारी सोसायटी एक व दोन चे चेअरमन व्हाईस चेअरमन, ग्रामपंचायत आजी-माजी पदाधिकारी व खर्डी येथील ग्रामस्थ तसेच चर्मकार समाजातील महिला भगिनी युवक मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट



महावीर
घर संसार

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# वंचिततर्फे रोहिदास महाराज यांची जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** वंचित बहुजन आघाडी तर्फे संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी वंचित बहुजन आघाडी चे तालुका अध्यक्ष राजू दादा प्रधान व शहराध्यक्ष भगवान गंगावणे तालुका उपाध्यक्ष संजय सरोदे कडूबा पतमे सर प्रसाद सर राजू जाधव संतोष सरोदे प्रकाश घोडके मोहन सरोदे, सुरेश घोडके आकाश सुभाष गंगावणे बाबासाहेब गंगावणे आकाश भीमराव गंगावणे सचिन ढोले संतोष ढोले नागेश खरे गौतम दादा गंगावणे सुरेश प्रधान बबन गायकवाड मंगेश गुंजाळ सुषमेश प्रधान चंपालाल बडोदे बाबासाहेब गंगावणे राजू जाधव आप्पा सीमंत प्रसाद सर पद्मे सर कारभारी सुरभय्ये सुरेश घोडके मोहन भाऊ सरोदे, अमोल गंगावणे व असंख्य वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.



## मोटारीच्या धडकेने नौदल अधिकाऱ्याचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** भरधाव मोटारीच्या धडकेने निवृत्त नौदल अधिकाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना येरवड्यातील शास्त्रीनगर रस्त्यावर घडली. या प्रकरणी एका मोटारचालक महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रकाशचंद्र लक्ष्मणराव तेलंग (वय ७३, रा. शास्त्रीनगर, येरवडा) असे मृत्युमुखी पडलेल्या निवृत्त नौदल अधिकाऱ्याचे नाव आहे. तेलंग यांची सून प्रज्ञा (वय ३३) यांनी या संदर्भात येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तेलंग नौदलातून निवृत्त झाले होते. तेलंग हे रविवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास येरवड्यातील शास्त्रीनगर रस्त्याने निघाले होते. त्या वेळी भरधाव मोटारीने तेलंग यांना धडक दिली. अपघातानंतर जखमी झालेल्या तेलंग यांना मोटारचालक महिलेने रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणी मोटार चालक महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पोलिसांनी दिली.



## विविध विकास कामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील बाबरा जिल्हा परिषद गटात माजी जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र जैस्वाल यांच्या हस्ते (दि५) रविवारी विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.बाबरा, निधोना व बोधेगाव या गावात विविध कामांचा शुभारंभ करण्यात आला. बाबरा येथील केंद्रीय प्राथमिक शाळेत पेव्हर ब्लॉक बसविणे ३लक्ष रुपये, निधोना येथील जिल्हा परिषद शाळेत पेव्हर ब्लॉक बसवणे ३ लक्ष रुपये, तर बोधेगाव येथील जिल्हा परिषद शाळेला संरक्षण भिंत ३लक्ष्य या तीन ठिकाणी एकूण ९ लक्ष रुपये किंमतीच्या विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र जैस्वाल म्हणाले की,ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावं व विद्यार्थ्यांचा जिल्हा परिषद शाळेकडे कल वाढवा त्यांना शाळेत दैनंदिन परिपाठ व खेळण्यासाठी चांगले पटांगण असावे हा या मागचा मुख्य हेतू आहे. या वेळी सरपंच वाल्हाबाई कैलास पवार, उपसरपंच रामकृष्ण मैंद, सीमाबाई अंकुश बनसोड, कौतीकराव पवार, प्रवीण वाघ, व्यंकटेश काथार, पंढरीनाथ मैंद, बाळू पवार, विनोद बोलकर, शिवाजी पवार, भाऊसाहेब पवार,रावसाहेब बर्डे,बाळू जाधव, लतीफ पठाण, विष्णू पवार, मुकीम शेख, निधोना गावचे उपसरपंच सुभाष राऊतराय, अशोक गाडेकर, तंटामुक्ती अध्यक्ष संतोष गाडेकर, सुनील गाडेकर, कौतिक राऊतराय, रामकृष्ण गाडेकर, ज्ञानेश्वर गाडेकर, शरद गाडेकर, संतोष राऊतराय, प्रकाश आप्पा, सुनील दुलोद, अशोक गाडेकर, नितीन राऊतराय, नामदेव गाडेकर, काकासाहेब राऊतराय आदींसह बाबरा व निधोना येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## सॉफ्ट बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त गोळेगाव येथे नाईट शॉप नाईट सॉफ्ट बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त वीर योद्धा क्रीडा मंडळ यांच्यातर्फे गोळेगाव येथे नाइट सॉफ्ट बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आज दि. 3 फेब्रुवारी रोजी बक्षीस वितरणाचा कार्यक्रम पार पडला 1) प्रथम क्रमांक सिद्धिविनायक C.C.(11000) 2) द्वितीय क्रमांक 7 स्टार गोळेगाव C.C.(7000) 3) तृतीय क्रमांक रुबाब C.C. (5000) 4) वीर योद्धा क्रिडा मंडळ गोळेगाव संघ विजयी झाले विजयी संघांना प्रकाश भाऊ वाकळे ता. अध्यक्ष भाजपा रत्नपूर, श्रीमती ताराबाई औटे, सरपंच गोळेगाव, संतोष भाऊ जोशी उपसरपंच गोळेगाव, याच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास अजिनाथ रखमाजी जाधव पोलीस पाटील गोळेगाव, रघुनाथ नामदेव चव्हाण तंटामुक्ती अध्यक्ष गोळेगाव, उत्तम मामा गायकवाड ग्रा. पं. सदस्य, अर्जुन भारत व्यवहारे ग्रा.पं. सदस्य, निवृत्ती भाऊ जिते शालेय समिती अध्यक्ष, तसेच ओम जिते दीपक जोशी, शुभम जोरे, अक्षय साळुंके विकी गायकवाड, सागर कोल्हे संदीप व्यवहारे, हेमंत गोसावी,विशाल शिंदे, अनिल चव्हान, तुषार आदमाने, अक्षय गोसावी, सोनू शिंदे खेळाडू उपस्थित होते व सोपान शिंदे, अंकुश त्रिभुवन, बापुमामा त्रिंबके व समस्त गावकरी गोळेगाव यांचे सहकार्य लाभले.

## ममुराबादमध्ये जरा दूध संकलन केंद्राचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** मुमराबाद येथे बुधवारी सकाळी 7:30 वाजता विजय तुकाराम वेताळ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी अफसर शेख बोलत होते प्रत्येक शेतकऱ्याला जोड धंद्याची गरज आहे प्रत्येक शेतकऱ्यांनी सकाळी उठून गाय मातेचे दर्शन घेऊनच सगळे कामे केले पाहिजे प्रत्येक शेतकऱ्याची तेथे एक गाय,दोन शेळ्या, पाच कोंबड्या त्यांनी पालन केल्याच पाहिजे. शेतकऱ्यावर दरवर्षी पिकावर वेगवेगळे आजार रोग आल्यामुळे पिके खराब होतात या मुळे खूपच नुकसानाचा सामना करावा लागतो. शेतकऱ्याचा उदरनिर्वाह फक्त शेतीवर होऊ शकत नाही मुलीचे शिक्षण खर्च, दवाखाना खर्च, नंतर लग्नाचे खर्च,असे वेगवेगळ्या समस्या शेतकऱ्यांच्या समोर येते म्हणून आता शेतकरी वर्ग हुशार व्हा असे ज्ञानेश्वर वेताळ बापू यांनी सांगितले. याप्रसंगी गफ्फार शेख, जावेद शेख, कैसरशेख, सोमीनाथ खिल्लारे, सुधाकर जेठे, शाहरुख शेख, बाळू वेताळ, ताहेर शेख, खलील शेख, संदीप घायाळ, ज्ञानेश्वर पांडुरंग वेताळ, नबाब शेख, दीपक वेताळ आदी होते.



काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in